सोलापूर तरुण भारत
आसमंत



# महाराष्ट्र निवडणुका निकालांचा अर्थ...

सत्ताकारण
चन्द्रशेखर टिळक
भ्र. ९८२०२९२३७६

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले आहेत. या निकालाचे अनेक अर्थ काढले जात आहेत. नवीन सरकारचा शपथविधीही आता लवकरच आहे. तरीही या निकालांचा अर्थ नीट समजून घेणे अत्यावश्यक आहे.**

या विधानसभा निवडणुकीचा किंवा निवडणूक निकालाचा सगळ्यात मोठा अर्थ हा आहे की मनोज जरांगे पाटील त्यांचे आंदोलन आणि त्याचा भाग म्हणून उपोषण हे मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून करत नाहीत; तर महायुतीला, त्यातही भाजपाला आणि त्यातही देवेंद्र फडणवीस यांना असणारा विरोध म्हणून करतात. अन्यथा ही निवडणूक लढवण्यावरून, त्यात उमेदवार पाडण्याचे विचार बोलून दाखवन्यावरून इतक्या उलट सुलट भूमिका घेणारे जरांगे पाटील भाजपाचा सर्वार्थाने प्रचंड प्रभाव असणारे सरकार महाराष्ट्रात सत्तारुढ असणार हे स्पष्ट होताच उपोषणाची नवीन तारीख नवीन सरकारचा शपथविधी पार पडताच जाहीर करेन अशी स्पष्ट व ठाम भूमिका कशी काय घेतात? आता त्यांचा बोलविता धनी असणाऱ्या मंडळींना पुष्कळ वेळ हाती उरला असावा असा या निकालांचा महत्त्वाचा अर्थ आहे. त्यामुळे जरांगे पाटील यांचे मराठा आरक्षण आंदोलन ही सामजिक चळवळ नसून राजकारणात सक्रिय नसलेला पण राजकारण्यांनी सक्रिय ठेवलेला एक अंकित असा छत्र्ज आहे हे स्पष्ट होत आहे हा या महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालाचा खरा अर्थ आहे.(आता असे अनेक प्रश्न एकाचवेळी पुरोगामी महाराष्ट्रात प्रज्वलित झाले तर आश्चर्य वाटायला नको.)

या निवडणूक निकालाचा दुसरा अर्थ असा आहे की गेली काही वर्षे डबल इंजिनचा धोशा लावत भाजपा अनेक निवडणुकीत मत मागत आली आहे. जर काही किंवा काहीही किंवा काहीच काम झाले नाही तर आघाडी सरकारात असल्याने काही बंधने पडतात असा सोयीस्कर पवित्रा घेतल्याचीही उदाहरणे आहेत. या निवडणुकीत महायुतीला दोन तृतीयांश बहुमताच्या जवळपास जागा देत आणि त्यातही एकट्या भाजपाला १३० पेक्षा जास्त जागा देत आता हा पवित्रा घेण्याची संधी मतदारांनी महाराष्ट्रात भाजपाला शिल्लक ठेवलेली नाही. त्यातही शिंदे समूह आणि पवार गटातून निवडणूक जिंकलेल्या उमेदवारात भाजपाचे १०१२ आमदार आहेत हेही लक्षात घ्यावे लागेल. महाराष्ट्र विधानसभेत बहुमताचा जादुई आकडा १४५ आमदार संख्या हा आहे हे लक्षात घेतले तर आता भाजपाने आपला अजेंडा एकट्याच्या बळावर रेटता येणे सहजशक्य आहे हा महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांचा व त्याच्या निकालाचा खरा अर्थ आहे. या डबल इंजिन फायद्याची महाराष्ट्रातील जनता आतुरतेने वाट पाहत आहे.

महाराष्ट्र विधानसभेसाठी झालेल्या या निवडणुकांचा निकाल अजून एक वेगळा संकेत देतात आणि तो म्हणजे आजही आणि अजूनही आपल्या देशात आर्थिक विकासकामे आणि त्याचे दृश्य किंवा अदृश्य परिणाम हा निवडणुकीचा मुद्दा करत निवडणूक लढली जात नाही. आणि त्यामुळे कदाचित जिंकलीसुद्धा जात नाही. यात नेमके कारण कोण आणि परिणाम कोण हा स्वतंत्र लेखाचा विषय होईल. पण याही निवडणुकीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा अपवाद वगळला तर निवडणूक लढवणाऱ्या सहा महत्वाच्या पक्षांपैकी एकही नेत्याने विकास कामे हा मुद्दा ना प्रचारात घेतला, ना निकालानंतरच्या श्रेय नामावलीत समाविष्ट केला. हा निव्वळ योगायोग नसतो हा या निकालाचा अर्थ आहे. गंमत म्हणजे, महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या जाहीरनाम्याची तुलना केली तर त्यात तत्व आणि तपशील यात मूलभूत फरक फारसा आढळत नाही. काही किरकोळ रकमाचा काय तो अपवाद! आता लाडकी बहीण योजना याला विकास प्रकल्प म्हणायचे असले, शासन तुमच्या दारी या प्रशासकीय संरचनात्मक घटनेला विकासकाम म्हणायचे असले तर हा मुद्दा मुळातच निकालात निघतो हे मात्र एकदम मान्य! हे म्हणत असताना स्वतंत्र भारतातील निवडणुकीच्या इतिहासात निवडणूक कधीच आर्थिक मुद्द्यांवर लढणे आणि जिंकणे झालेले नाही हेही लक्षात घेतले पाहिजे. याला असणारा एकमेव अपवाद म्हणजे २००४ साली तत्कालीन पंतप्रधान आदरणीय अटलबिहारी वाजपेयी यांनी डहळपळपस खपवळर च्या घोषणेवर लढविलेली लोकसभेची निवडणूक. हे धाडस त्यावेळी त्यांच्या अंगलट आल्याचा धसका आजही सर्वच राजकीय पक्ष बाळगून आहेत हा या महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालाचा खरा अर्थ आहे. अगदी प्रागतिक, पुरोगामी, विकसित महाराष्ट्रातसुद्धा!

या निवडणूक निकालाचा एक अर्थ असा आहे की गेल्या विधानसभा निवडणूक मतदानाच्या तुलनेत या निवडणुकीत मतदानाचे प्रमाण सुमारे साडेपाच ते सहा टक्के वाढले आहे. तरीही त्याचवेळी झालेल्या झारखंड विधानसभा निवडणुकीत झालेल्या मतदानाची टक्केवारी किंवा प्रमाण लक्षात घेतले तर आपल्या महाराष्ट्रातील मतदान केलेल्या मतदारांची संख्या जरी जास्त असली तरी आपली टक्केवारी आत्ताही झारखंड मतदानाच्या तुलनेत कमी आहे. हाच या निकालाचा खरा मतितार्थ आहे.

एकंदरीतच, राज्याचा भौगोलिक आकार जितका आटोपशीर असतो तितके केवळ प्रचार करणे आणि निवडणुकांचे आयोजन नियोजन करणे सोपे जाते असे नव्हे तर मतदारांना प्रत्यक्षात मतदान करायला लावणे सोयीचे जाते हा आधीच्या निवडणुकांचा अनुभव याहीवेळी अबाधित राहीला हा या निकालाचा एक महत्वाचा अर्थ आहे. कोणताही वादळी किंवा लाटेच्या स्वरूपाचा मुद्दा नसला की असे होणे ही केवळ एक संख्याशास्त्रीय शक्यता नसते तर ती एक राजकीय व सामाजिक समजशक्ती आणि सहनशक्तीची शोकांतिका असते हा या निवडणुकीचा आणि पर्यायाने निकालाचा महत्त्वाचा अर्थ आहे. त्यातही जर सकारात्मक कल शोधायचा झाला तर प्रत्यक्ष मतदान केलेल्या पुरुष मतदारांची संख्या आणि स्त्री मतदारांची संख्या यात असणारी तफावत या निवडणुकीत कमालीची कमी झाली आहे. मुळातच मतदार यादीत पुरुष मतदारांची संख्या तुलनेने जास्त असते हे लक्षात घेतले तर याचे महत्व आणखीन वाढते. लाडकी बहीण योजना फक्त स्त्रियांसाठी होती आणि ती फक्त घोषणेच्या स्वरूपात व कागदावर न राहता प्रत्यक्षात त्या योजनेची रक्कम स्त्रियांच्या बँक खात्यात जमा झाली.

हा सूर्य, हा जयद्रथ असा हा प्रकार झाल्याने ही योजना सुरू ठेवेल असेच सरकार निवडून देण्याची खबरदारी स्त्री मतदारांनी घेतली हा या निकालाचा अर्थ आहे.

उळीशलीं इशपशषळीं ढीरपीषशी नेमके कोणी कोणाला केले असा प्रश्न पडावा अशी ही घटना आहे.

सरकारने स्त्रियांना? की स्त्रियांनी सरकारला?

इरव एलेपोळली लरप लश त्रेत्र श्रिळींळली चे हे आधुनिक उदाहरण ठरेल हा या निकालाचा अर्थ आहे.

या निकालाचा अजून एक अर्थ असाही आहे की महाराष्ट्रात सर्वच्या सर्व २८८ विधानसभा मतदारसंघात एकाचवेळी, एकाच दिवशी मतदान घेणे सर्वांनाच सोयीचे जाते. मतदानाची तारीख आणि निकालाची तारीख यात कमीत कमी अंतर ठेवणे राजकीय सामाजिक प्रशासकीय समंजसपणचे ठरते. त्यातही असे मतदान शनिवार, रविवार किंवा एखाद्या सुटीच्या दिवसाला जोडून घेतले किंवा ठेवले नाही तर सुशिक्षित मतदार, विशेषत: शहरी नोकरदार मध्यमवर्गीय मतदार जास्त प्रमाणात मतदान करतो आणि त्या प्रमाणात बोगस मतदानाची शक्यता कमी होते. यातून एक राष्ट्र, एक निवडणूक ही संकल्पना लवकरात लवकर अंमलात आणलीच पाहिजे हा या निकालाचा एक महत्वाचा अर्थ आहे.

असा विचार करत असताना सहज मनात येत की विधानसभेच्या बरोबरच गेली दोन अडीच वर्षे राज्यपाल राजवटीत असणाऱ्या महानगर पालिका नगरपालिका, जिल्हा परिषदा यांच्याही निवडणुका घेतल्या गेल्या असत्या तर! नांदेड लोकसभा पोट निवडणूक त्याच दिवशी घेतली तशी! या विधानसभा निवडणुका निकालाचा अर्थ असाही आहे की, प्रत्यक्ष मतदान करताना मतदार अनिश्चितता या घटकाचा फारसा गांभीर्याने करतोच असे नाही!

कदाचित अलिकडच्या काळात आपल्या सगळ्यांचाच शेअर बाजाराशी असणारा संबंध सततच वाढता आहे. त्या शेअर बाजाराचा अनिश्चितता हा स्थायीभाव आहे.

आता हेच बघा ना !


आत्ता पार पडलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यात, टप्प्यावर, टप्प्याबाबत अनिश्चितता होती. आधी शेवटच्या क्षणापर्यंत या निवडणुकीच्या तारखा जाहीर होत नव्हत्या. त्याचा घुंगट तर केंव्हाच घेऊन मात्र ठेवला होता! नंतर त्याच्या निकालाबाबत एक अनिश्चितता होती. निकालानंतर नेमके कोण कोणाबरोबर जाऊन सरकार बनवेल याबाबत तर कोणीच काहीच बोलत नव्हते. अगदी शरद पवार आणि देवेंद्र फडणवीस एकत्र येऊन सरकार बनवण्याची शक्यता सुद्धा खाजगीत काही काही जण नाकारत नव्हते.

(पान ४ वर)

**विधानसभा निवडणुकीच्या काळात असंख्य कार्यकर्त्यांचे पाय चक्राप्रमाणे फिरले. विचारांची चक्रे गतिमान झाली होती. 'मतदार जागृती'चे अभिमान चक्रासम गतिमान होते. सारा महाराष्ट्र पिंजून निघाला.'संघे शक्ति: कलौ युगे' असा जो उल्लेख केला जातो, ती समाजातील 'संघशक्ती-अर्थात सांघिक शक्ती' कार्यरत झाली आणि तिने सद्विचारी नेतृत्वाला ऐन युद्धात दिशा दिली, बळ दिले. जणू अर्जुनासाठी हाती 'सुदर्शन' घेणाऱ्या श्रीकृष्णाचेच दर्शन समाजातील सज्जनशक्तीने पुन्हा एकदा घडविले.**

लक्ष्यवेध
प्रा. श्रीकांत काशीकर

# 'चक्र' गतिमान राहावं!



एकदिलाची सिंहगर्जना, दिशादिशांतून घुमते
रे परचक्राची भीती कशाची,
चक्र सुदर्शन फिरते रे।।धृ।।


परचक्र किंवा सुदर्शन यांची फारशी माहिती नसतानाच्या वयात हे गीत अनेकदा कानावर आले. म्हटले, पाठही केले गेले. याचे कारण मी शिशुकालापासून संघ स्वयंसेवक आहे. अभिमन्यूला जसा 'चक्रव्यूह भेद' समजला, तसाच काहीसा मला 'संघ विचार' परिचित झाला. कारण, कुटुंबातच तो वारसा होता. मी भाग्यवान आहे की, माझ्या पालकांकडून न मागता, न भांडता मिळणारी ही 'सद्विचारांची संपत्ती' मला भरभरून मिळाली. आज हे सारे आठवायचे कारण म्हणजे विधानसभेचा निकाल.

आग्रही हिंदुत्व, लाडकी बहीण, सवलतींचा वर्षाव, स्टार प्रचारकांचा प्रभाव, वाढत्या मतदान टक्केवारीचा लाभ, कुशल नेतृत्वाची योग्य व्यूहरचना, ही भाजपवाल्यांची भक्कम बाजू तर, योग्य नेतृत्वाचा अभाव, आघाडीतली विसंगती, मुस्लिमांबाबतचे लाचार धोरण, त्यासाठी त्यांचे मागणी पत्र मान्य करणे, हिंदुत्वावर टीका करणे, आरक्षणाचा आधार घेत समाजात भेदनीतीची भाषा या साऱ्या विरोधकांच्या उणिवा. 'संघबंदीची केवळ मागणी केवळ विचारात घेणे ही किती घातक आहे. यामुळे हे निकाल सर्वांनाच अनपेक्षित धक्का देणारे वाटले तर गैर नाही. पण, प्रत्यक्ष वस्तुस्थिती याहून वेगळी आहे.

महाविकास आघाडीतल्या पक्षनेत्यांनी आत्मपरीक्षण करायला हवे, हे जितके खरे तितकेच महायुतीतील पक्षनेत्यांनी आत्मभान राखत स्वयंपरीक्षण करणे, ही आवश्यक आहे. भरघोस मिळालेला हा विजय शंभर टक्के महायुतीचाच आहे. पण, या यशात आपल्या नियोजनाचा-कार्यकर्त्यांचा सहभाग किती? आपण दिलेल्या सवलतींचा लाभांश किती? आपल्या विकास कामामुळे प्रभावित मतदारांचा सहभाग किती? याचा विचार घटक पक्षांच्या नेतृत्वाने स्वतंत्रपणे आपापल्या बैठकीत करणे आवश्यक आहेच. पण, त्याही पलीकडे मतदानाच्या वाढत्या टक्केवारीचा जो लाभ मिळाला त्यामागे कोण होते, याचाही विचार प्रामाणिकपणे करणे गरजेचे आहे. महाभारतात महर्षी व्यासांनी जे जे लिहिले, तेच आज जगात सर्वत्र आहे. अर्जुनाला हनुमंतांचे साहाय्य मिळवून देण्यासाठी अर्जुनाने बांधलेल्या 'शरसेतू' खाली श्रीकृष्णांनी सुदर्शन चक्र ठेवले. जयद्रथ वध व्हावा म्हणून काही काळ सुदर्शनाआड सूर्य झाकून सूर्यास्ताचा भास निर्माण केला. अर्जुन मनापासून, योग्य पद्धतीने लढत नाही, हे लक्षात येताच 'न धरी शस्त्र करी मी' ही प्रतिज्ञा मोडत सुदर्शन धारण करीत पितामह भीष्मांवर चालून जाण्यास श्रीकृष्ण सज्ज झाले. या सार्या द्वापारयुगातल्या कथा. पण, त्या आज कलियुगात पुन्हा घडत आहेत. आताच्या विधानसभेचे रण हे त्याचे प्रत्यक्षदर्शी आहे.

या विधानसभा निवडणुकीत विविध समाजातील काही सामाजिक संस्थांचे कार्यकर्ते 'प्रबोधन मंच' या बॅनरखाली एकत्रित आले. त्यांनी विचारवंत, साधुसंत, कीर्तन-प्रवचनकार, साहित्यिक यांच्या भेटी घेतल्या. ही निवडणूक 'नीती विरुद्ध अनीती' यांची आहे. भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्याच्या नादात विरोधक उघडपणे मूर्तीभंजकांची मदत करीत आहेत. स्वार्थासाठी सारे एकत्र येताना देशहित विसरत आहेत. परिणामी, महाराष्ट्रात पूर्वांचल, केरळ, बंगाल, काश्मीर यासारखी स्थिती होईल. मंदिरेच नसतील, तर प्रवचनकारांचे काम काय? विचार म्हणजे काय हे माहीत नसणाऱ्या समाजात विचारवंतांना कोण विचारेल? मूर्तीभंजकांचा प्रभाव असेल, तर गणेशोत्सवाची परंपरा कशी टिकणार? प्रश्न सत्तेवर कोण असेल यापेक्षा संस्कृती, परंपरा, मानवता पर्यायाने धर्मरक्षणाचा आहे. त्यासाठी धर्म मानणारी मंडळी सत्तेत यायला हवीत.

(पान ४ वर)



# भ्रमाचा भोपळा फुटला

वेधक
कौस्तुभ वीरकर

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांचे निकाल लागले आहेत. महायुतीच्या पारड्यात जनतेने भरभरून मतांचे दान टाकले आहे. पाच वर्षांपूर्वी दगाफटका करुन जनतेच्या आदेशाचा ज्यांनी अपमान केला होता, त्यांना खऱ्या अर्थाने आज जनताजनार्दनाने न्याय मिळवून दिला. मात्र, पराभवाबाबत चिंतन करून, त्यातून काही बोध घ्यावा इतकेही शहाणपण विरोधकांकडे उरलेले दिसत नाही.

सातत्याने आम्ही म्हणजे असामान्य नेतृत्व अशी शेखी मिरवण्यात विरोधी पक्षातील नेत्यांची हयात गेल्याने, त्यांच्याकडे बाप पुण्याई वगळता आप पुण्याईची वानवाच. त्यामुळेच झालेल्या दारूण पराभावाबाबत आत्मचिंतन करावे या विचाराने विरोधी पक्षातील नेत्यांच्या मनाला स्पर्शदेखील केला आहे, असे सध्या तरी वाटत नाही. याउलट माध्यमांमध्ये चमकण्यासाठी उथळ विधाने करण्याची चढाओढच मविआच्या नेत्यांमध्ये दिसून येते आहे. मविआच्या नेत्यांनी यावेळीही ईव्हीएमला दोष दिला आहेच. तसेच भाजपला एवढ्या जागा मिळतातच कशा? असा प्रश्न काँग्रेसचे पवन खेरा यांनी उपस्थित केला आहे. संजय राऊत यांनी कहर करत, माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांना या पराभवाचे कारक मानले आहे. विजयाच्या अशा एक ना अनेक थेअरी तयार करण्यात मविआचे नेते एकमेकांशी स्पर्धा करण्यात गुंतले आहेत. वास्तविक पाहता फुटलेला भ्रमाचा भोपळा त्यांना सहन होत नाही आहे. जनता काय विचार करते? तिचे सुख कशात आहे? या सगळ्यापासून मविआचे नेते कोसो दूर आहेत. त्यात असीम सरोदेसारखे मविआचे हितचिंतक तुम्ही हरुच शकत नाही, न्यायालयात प्रत्येक उमेदवाराने स्वतंत्र याचिका करण्याची शक्कल मविआला शिकवत आहेत. मात्र, सरोदे यांच्यासारख्या लोकांमुळे आधीच मर्कट, त्यात मद्य प्याला अशीच

(पान ४ वर)

राष्ट्ररक्षा

ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

# डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्हाईट हाऊसमधील पुनरागमनाचा भारतावर सकारात्मक परिणाम

भारतासमवेत संबंध भक्कम करण्यासाठी बायडेन प्रशासनाला अभिमान आहे, असे अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याचे प्रवक्ते १० नोव्हेंबरला म्हणाले. 'क्वाड'च्या (अमेरिका, भारत, ऑस्ट्रेलिया आणि जपान यांची संघटना) माध्यमातून आमचे वाढते सहकार्य आणि अनेक सामायिक प्राधान्यक्रमांमुळे दोन्ही देशांमधील संबंध दृढ झाले आहेत. आम्ही पहिल्या दिवसापासून लक्ष केंद्रित केले आणि आता आम्ही पद सोडण्याच्या सिद्धतेत असताना त्याकडे एक मोठे यश म्हणून पाहतो. हा बायडेन सरकारचा दावा खरा आहे का? नाही. 'भारतविरोधी कारवाया करणे, म्हणजे भारताशी चांगले संबंध ठेवणे' असे बायडेन सरकारला वाटते का? जर बायडेन सरकारला भारताशी खरेच चांगले संबंध ठेवायचे असते, तर सरकारने आतंकवादी पन्नू याला अटक करून भारताच्या स्वाधीन केले असते. बांगलादेशात हस्तक्षेप करून भारतविरोधी धर्मांधांना सत्तेवर बसवले नसते.

ट्रम्प सरकारच्या काळात भारताशी चांगले संबंध वर्ष २०१६ मध्ये डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्ष झाले तेव्हाही त्यांनी भारताशी असलेल्या संबंधांना प्राधान्य दिले होते. त्यामुळे ट्रम्प सत्तेत परतल्यानंतर दोन्ही देशांमधील संबंध चांगले राहतील, अशी अपेक्षा डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्हाईट हाऊसमधील पुनरागमनाविषयी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. ट्रम्प यांच्या फ्लोरिडातील विजयाच्या भाषणानंतर लगेचच 'माझे मित्र' म्हणून ट्रम्प यांचे अभिनंदन करणाऱ्या नेत्यांपैकी मोदी हे पहिले नेते होते. 'एक्स' या समाजमाध्यमावरील त्यांच्या लिखाणामध्ये वर्ष २०२० मध्ये झालेल्या ट्रम्प यांच्या भारत दौऱ्यासह त्यांच्याशी भूतकाळातील परस्पर संवाद दर्शविणारी छायाचित्रे होती. डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे राष्ट्रपती म्हणून निवडून आले, तेव्हा ट्रम्प प्रशासनाने विविध क्षेत्रांमध्ये सामरिक, आर्थिक आणि संरक्षणात्मक संबंधांची वृद्धी करण्यावर लक्ष केंद्रित केले; ज्यामुळे भारताला अनेक फायदे झाले. अमेरिकेशी सामरिक संबंध सुधारतील ट्रम्प प्रशासनाने भारताला एक महत्त्वपूर्ण सामरिक भागीदार मानले आहे. चीनच्या वाढत्या प्रभावामुळे आणि आशिया-झरलळषळल क्षेत्रातील अस्थिरतेमुळे, अमेरिकेने भारताशी सहकार्य वाढविण्याचा निर्णय घेतला होता. या सामरिक संबंधांच्या वाढीमुळे भारताला आंतरराष्ट्रीय मंचावर अधिक शक्ती आणि प्रतिष्ठा मिळाली होती. ट्रम्प यांच्यामुळे भारताला अत्याधुनिक शस्त्रास्त्रे आणि तंत्रज्ञान मिळविण्यासाठी अधिक संधी उपलब्ध झाल्या. या सहकार्यामुळे भारताची संरक्षण क्षमता वाढली; ज्यामुळे त्याला आपल्याला अधिक सुरक्षा मिळाली. 'डीप स्टेट'चा पराभव आजच्या परिस्थितीत ट्रम्प यांच्या विजयाचे अनेक अन्वयार्थ आहेत. ट्रम्प यांच्या पराभवासाठी 'डीप स्टेट'ची यंत्रणा कामाला लागली होती. यामुळेच चार वर्षांपूर्वी त्यांचा पराभव झाला होता. 'डीप स्टेट' ही यंत्रणा उदारमतवाद, साम्यवाद आणि भांडवलशाही यांचे कर्ते-धर्ते हाकतात. शीतयुद्धानंतर अमेरिकेचे जागतिक वर्चस्व टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने कायमस्वरूपी कार्यकारी, राजकीय सहयोगी आणि 'कॉर्पोरेट' (व्यावसायिक) समर्थकांचा समावेश आहे. त्यामुळे यंदा हॅरिस यांचा पराभव, म्हणजेच 'डीप स्टेट'चा सपशेल पराभव होय. गेल्या तीन-चार महिन्यांच्या कालावधीत ट्रम्प यांच्यावर दोनदा झालेल्या आक्रमणांमागे कोण होते? अमेरिकेमधील डीप स्टेट यामध्ये जॉर्ज सोरोस आणि तिथली नोकरशाही सामील आहे; जी भारताच्या विरोधात आहे. आशा करूया की, या डीप स्टेटवरसुद्धा डोनाल्ड ट्रम्प यांचा हातोडा पडेल. चीनच्या विरोधात अमेरिका जास्त आक्रमक बनेल ट्रम्प यांच्या अध्यक्षपदाच्या काळात भारत आणि अमेरिका यांनी अनेक महत्त्वाच्या सूत्रांवर, विशेषतः आतंकवादविरोधी अन् 'इंडो-पॅसिफिक' प्रदेशातील चिनी आक्रमकतेला संबोधित करण्यासाठी समान भूमिका घेतली होती. याच काळात 'क्वाड' (म्हणजे भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया या चार देशांचा गट) संघटनेला महत्त्वपूर्ण स्तरावर बढती देण्यात आली आणि काही प्रमुख लष्करी करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. त्यामुळे चीनच्या विस्तारवादी धोरणांचा धोरणात्मक प्रतिकार झाला. अमेरिकेचा प्रतिद्वंद्वी असलेल्या चीनला शह देण्यासाठी ट्रम्प आता प्रयत्नशील राहतील. 'क्वाड'ला सक्षम करण्यासह तैवानला समर्थन देणे आणि भारताची घनिष्ठता वाढविणे हे ट्रम्प यांच्या प्राधान्यात वरच्या क्रमांकावर असेल.



चीनसोबतच्या संघर्षाचा भारताला फायदा डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनला विरोध केल्याने भारताला विशेषतः व्यापाराच्या दृष्टीने फायदा होऊ शकतो. चिनी उत्पादनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी त्याच्या प्रशासनाच्या प्रयत्नांमुळे अमेरिकन कंपन्यांना त्यांच्या पुरवठा साखळ्यांमध्ये विविधता आणण्यास प्रोत्साहन मिळू शकते. अनुकूल धोरणांसह भारत या कंपन्यांना आकर्षित करू शकतो, पर्यायी उत्पादन केंद्र म्हणून स्वतःला स्थापित करू शकतो आणि संभाव्य आर्थिक विकासाला देऊ शकतो. अमेरिकन तेल अन् वायू निर्यातीत वाढ होण्याची अपेक्षा अमेरिकेच्या उत्पादनांवर भारताकडून लावण्यात येणारा अतिरिक्त आयात शुल्क न्यून करण्यासाठी निवडणूक प्रचाराच्या कालावधीत ट्रम्प यांनी भारताला 'टॅरिफ किंग' संबोधले होते.

अमेरिकेत सुबत्ता आणण्यासाठी ट्रम्प भारतासह जगभरात प्रयत्न करणार आहेत. त्यांच्या पहिल्या कार्यकाळापासून चीन, भारत आणि युरोप यांसारख्या प्रमुख बाजारपेठांमध्ये अमेरिकन तेल अन् वायू निर्यातीत वाढ होण्याची अपेक्षा आहे. ट्रम्प यांनी अमेरिकेच्या कच्च्या तेलाच्या निर्यातीवर भर दिल्यामुळे भारताला कमी किमतीत तेल मिळू शकते. डोनाल्ड ट्रम्प यांची चीनवर ६० टक्के टॅरिफ लावण्याची योजना आहे आणि भारतावर फक्त १० टक्के टॅरिफ असेल. यामुळे भारताला प्रचंड फायदा होईल आणि चीनऐवजी आपण अमेरिकेचे एक महत्त्वाचे पुरवठा करणारे राष्ट्र बनू शकतो.

अनेक अत्याधुनिक शस्त्रे अमेरिकेकडून भारताला ट्रम्प प्रशासनाने भारताला अत्याधुनिक शस्त्रे विकण्याच्या प्रक्रियेला गती दिली. या अंतर्गत भारताला हेलिकॉप्टर्स, ड्रोन आणि अन्य सैन्य उपकरणे मिळाली. यामुळे भारतीय सैन्याच्या क्षमतेत सुधार झाला आणि भारताची आत्मनिर्भरता वाढली. भारताच्या तेजस मार्क-२ फायटरकरिता ऋ्‍ए-ऋ४१४ एरो-इंजिन; याशिवाय ३१ शस्त्रयुक्त चट-९इ'झीशवरीं' ड्रोन आता वेगाने पुढे जाईल. आता असे मानले जाते की, अमेरिका दोन मोठ्या करारांना होकार देईल. एक आहे ३.५ बिलियन डॉलर एवढ्या किमतीचे २४ चक-६० 'रोमियो' बहुमिशन नौदल हेलिकॉप्टर आणि सहा AH64E अपाचे अटॅक हेलिकॉप्टर. यामुळे भारताची युद्ध क्षमता वाढेल.

### गुप्तहेर माहितीचे आदान-प्रदान वाढेल

गुप्तहेर माहितीच्या आदान-प्रदानात वाढ होण्याची शक्यता आहे. अमेरिकेने भारताला दहशतवाद आणि अन्य सुरक्षा आव्हानांविरुद्ध लढण्यासाठी आवश्यक माहिती प्रदान केली. यामुळे भारताची सुरक्षा यंत्रणा अधिक सक्षम बनली. आता पण तेच होणार आहे. पाकिस्तानवर नियंत्रण डोनाल्ड ट्रम्प यांच्या दक्षिण आशिया धोरणांचा भारताच्या प्रादेशिक हितांवर परिणाम होऊ शकतो. ट्रम्प यांच्या नेतृत्वाखालील अमेरिका दहशतवादी कारवाया थांबविण्यासाठी पाकिस्तानवर अधिक दबाव आणू शकते; ज्यामुळे भारताच्या सुरक्षेत वाढ होईल.

अमेरिकेच्या परराष्ट्र नीतीमध्ये संभाव्य बदल डोनाल्ड ट्रम्प यांनी बांगलादेशमधील हिंदू आणि इतर अल्पसंख्यकाविरोधात होणाऱ्या हिंसेची निंदा केली होती. ट्रम्प यांचा संदेश दक्षिण आशियामधील अल्पसंख्यकांची सुरक्षा आणि सन्मान कायम राहण्याच्या प्रयत्नांना अधोरेखित करतो. बांगलादेशच्या प्रश्नावर डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीरपणे भारताला पाठिंबा दिला आहे, हे भारताकरिता फायद्याचे असेल. खलिस्तानवादाशी दोन हात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील जवळीक जगजाहीर आहे. त्याचा लाभ भारताला खलिस्तानवादाशी दोन हात करण्यासाठी होऊ शकतो. मोदी यांनी ट्रम्प यांच्यावर दबाव आणला, तर त्यातून भारताचे हित साधले जाईल. ट्रम्प यांच्या विजयामुळे भारतासाठी राजनैतिक संवादही सोपे होऊ शकतात. ट्रम्प आणि मोदी यांच्यातील प्रस्थापित द्विपक्षीय समस्या सोडविण्यासाठी अन् परस्पर हितसंबंध पुढे नेण्यासाठी एक सुगम मार्ग प्रदान करू शकतात. निष्कर्ष आता अमेरिकेचे भारताशी संबंध दृढ राहतील. याचे कारण चिनी वाढत्या प्रभावाला सामोरे जाण्याकरिता भारताची जरूरी. ट्रम्प हे दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष होणार असून भारताचे अमेरिकेसोबतच्या भविष्यातील संबंधांना नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे. भारतासोबतचे संबंध वाढविण्यात आस्था दाखवणाऱ्या ट्रम्प यांनी दोन्ही देशांमधील भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठी जाहीर वचनबद्धता व्यक्त केली आहे. यामुळे भारत- अमेरिकन संबंधांमध्ये एक नवीन अध्याय चालू होईल. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)


---

संत प्रबोधन

प्रा. डॉ. हरिदास आखरे

# जे का रंजले गांजले !

**हे विश्वची माझे घर। ऐसी मती जयाची थोर।। किंबहुना चराचर। आपणची जाहला।।** अशी विश्वात्मक दृष्टी ज्या संतांची होती, त्या संतांना समाजातील प्रत्येक घटकाबद्दल आपलेपणा होता. जिव्हाळा होता. त्यांना हे सर्व विश्व आपले कुटुंबच वाटत होते. विश्वबंधुत्वाची कल्पना त्यांच्या हृदयामध्ये होती. म्हणूनच संतांना समाजातील लोकांविषयी कळवळा होता. समाजातील दुःखी लोक पाहून त्यांचे अंतःकरण करुणेने भरून जात असे. आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून ते भोळ्याभाबड्या लोकांना दुःखाचे कारण आसक्ती आहे, असे सांगत. दुःखाची निवृत्ती व परम सुखाची प्राप्ती करण्यासाठी सदाचार आवश्यक आहे, अशी शिकवण ते समाजाला देत असत.



**बुडती हे जन न देखवे डोळा । म्हणूनही कळवळा येत असे ।।**

लोकांना सन्मार्ग दाखविणे हेच आपल्या जीवनाचे परम कर्तव्य आहे, असे संत सांगत. आपल्या जन्माचे ध्येय काय? या जगामध्ये येण्याचे कारण काय? याबद्दल ते सांगतात, लोककल्याण व लोकांना सन्मार्ग दाखविणे हेच जीवनाचे ध्येय आहे. या संसारातील जीव कसे अज्ञान, अंधकाराच्या दुःखात बुडून गेले आहे. ते पाहून सहृदयी संतांचे मन हेलावून जाते. लोकांना मोलाचा संदेश देताना ते सांगतात- **उपकारासाठी बोलो हे उपाय। येणेंविण काय आम्हां चाड।। बुडती हे जन न देखवे डोळा। म्हणवुनी कळवळा येतसे।। तुका म्हणे माझे देखतिल डोळे। भोग देते वेळे येईल कळो ।।** (तु. गा. ९४२) समाजामध्ये जीवन जगताना परोपकार करा, तोच खरा मानवधर्म आहे, अशी शिकवण त्यांनी समाजाला दिली. पाप आणि पुण्याची अगदी साधी व्याख्या त्यांनी सांगितली आहे. **पुण्य परोपकार पाप ते परपीडा। आणिक नाही जोडा दुजा यासी।। सत्य तोचि धर्म असत्य ते अकर्म। आणिक हे वर्म नाही दुजे।। गति तेचि मुखीं नामाचे स्मरण। अधोगती जाण विन्मुखता ।। संतांचा संग तोचि स्वर्गवास। नरक तो उदास अनर्गळा।। तुका म्हणे उघडे आहे हित घात। जया जे उचित खरा तैसे।।** सामान्य माणसांना कठीण वाटणारी पाप आणि पुण्याची संकल्पना त्यांनी इतक्या सोप्या पद्धतीने मांडली व एवढे गहन असे तत्त्वज्ञान अगदी साध्या शब्दात लोकांसमोर मांडले.

परोपकाराने वागा यासारखे दुसरे पुण्य नाही. परोपकारी वृत्तीच तुमचे पुण्य वाढवेल. त्यासाठी कर्मकांड, पूजा-अर्चा करण्याची गरज नाही, असे तुकोबा म्हणतात. संतांनी आपल्या पारमार्थिक जीवनसाधनेमध्ये परोपकारी वृत्तीला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले आहे. देहभान विसरून ते सर्वांशी परोपकारी वृत्तीने वागतात. त्यासाठी त्यांनी 'सर्वांभूती भगवंत' या दिव्य अनुभवाचा आनंद प्राप्त केला. हेच त्यांच्या भक्तिसाधनेचे परमोच्च शिखर आहे. परोपकारही असा की, ज्याचा आपल्याशी अर्थार्थी काहीही संबंध नाही. अशा व्यक्तींवरही दया दाखवून उपकार करणे होय. धन्यवादाच्या साध्या दोन शब्दांचीही त्यांनी अपेक्षा न ठेवता गरजवंताची काया-वाचा-मनाने सेवा करणे होय, असा दया व परोपकार या जीवनमूल्यांचा संदेश ते आपल्या कृतीतून अभंगाद्वारे देतात. **तुज व्हावा आहे देव । तरि हा सुलभ उपाव ।। तुका म्हणे फार। थोडा तरी परउपकार ।।** परोपकारासाठी संतांनी आपला देह चंदनाप्रमाणे झिजवला. परोपकारासाठी त्यांनी कधीही स्वतःच्या कुटुंब आणि स्वार्थाचा विचार केला नाही.

भूतदयेच्या उज्ज्वल भावनेत त्यांनी एका अनाथ बाईला स्वतःच्या पत्नीचे एकुलते एक असणारे लुगडेही देऊन टाकले. स्वतःच्या मुलांकरिता मळ्यातून डोक्यावर आणलेले ऊस त्यांनी गावातील मुलांनी मागताच सर्वांना वाटून दिले. जेव्हा पत्नी जिजाबाईने याबाबत विचारणा केली, तेव्हा ते उत्तर देतात ते मोठे मार्मिक आहे. ते म्हणतात, 'अगं! ती सर्व मुले आपलीच आहेत.' संतांचा आपपरभाव मावळला होता. भूतदया हेच त्यांचे भांडवल होते. भूतात्मा तोच परमात्मा या शास्त्रवचनावर आधारित त्यांची वर्तणूक आहे. याच परमार्थ साधनेतून त्यांनी सर्वात्मक ईश्वराची परम सेवा साधली आहे. संत एकनाथांनीसुद्धा जीवनात आवश्यक असणाऱ्या भूतदया व परमार्थाचा समन्वय मांडला आहे.

**सद्भावो जोडल्या सर्वभूती । तेणे प्रगटे माझी चौथी भक्ती। जीच्या पोची चारी मुक्ती। सदा लागती स्वानंदे ।।** सर्व संतांनी सर्वाभूती भगवद्भाव ठेवून परोपकार सेवेतून चौथ्या भक्तीची साधना साध्य केली होती. म्हणूनच त्यांची सामाजिक जीवनातील वाटचाल ही सामान्याकडून असामान्याकडे झाली होती. या परोपकाराच्या साधनेमुळेच ते सामाजिक जीवनात संतत्वाला पोहोचले होते. सामान्य माणसाला, संसारामध्ये गुरफटलेल्या स्वार्थी जिवाला ते कदापि शक्य नसते. त्यासाठी त्यांचा स्वार्थ आडवा येतो. त्यामुळे आज जी स्वार्थी वृत्ती समाजामध्ये बोकाळलेली आहे, त्यावर संत तुकोबांची कृती व त्यानंतर त्यांनी केलेली अभंग वाङ्मयाची उक्ती समाजामध्ये परोपकार धर्म जीवनमूल्य रुजविण्यासाठी एक आदर्श जीवनमार्ग आहे. महिपतबाबांनी संत तुकारामांच्या परोपकारी वृत्तीचा अधिक खुलासा केला आहे,

**तुक्याची ती निष्काम वृत्ती । प्राप्त व्हावया रुक्मिणीपति।। परोपकारी वेंचितसे शक्ती। कैशा रीती ते ऐका ।। कोणी पांथस्थ वाटेकरी। अकस्मात गाठ पडली जरी।। त्याचे ओझे घेऊनी शिरी। विसावा क्षणभरी त्यास द्यावा।। पर्जन्य मार्गी लागता सबळ। पांथस्थ गावात पाहती स्थळ। तयांसि दाखवी चावडी देऊळ। नातरी तात्काळ ने घरा।। पंथ क्रमितांचि लवलाहे । यात्रेकऱ्याचे सुजले पाय ।। मग उष्ण पाणी करोनि पाहे। रगडित देह निजांगे।। गायी वृषभांसी निर्बलपणी। मोकलोनि देती निर्दय धनी ।। तयासी हाते कुरवाळोनी। चारा-पाणी घालीतसे ।। मैदा साखर आणि घृत । एके जागा करोनी ठेवित ।। मुंगीयांच्या धावी घालीत । ईश्वर प्रीत्यर्थ नित्यकाळी ।। अणुरेणुपर्यंत जाणा । भूतमात्री धरितसे करुणा ।। हिंसा घडे ते कर्म जाणा । सहसाही मना नावडे।। उष्णकाळी झालीया उबारा। कीर्तनामाजी घालीतसे वारा ।। अन्न न मिळता क्षुधातुरा। प्रयत्ने मेळवूनी दे त्यासी ।। उषःकाळी जीवन वाटेवर । नसता उपाय करीतसे थोर ।। घागर भरोनी सत्वर। मार्गावर ने तेथे ।। पांथस्थासि व्याधी मार्गी होत । जवळी नसता सुहृद आप्त।। तयासि राहवोनि देउळात । औषध पथ्य करवीतसे ।।** (तुकाराम चरित्र - महिपतबाबा ब्रह्ममूर्ती संत ज्ञानदेव तुकाराम पृ. ३८६) संतांचा परोपकार सेवेचा नामनिर्देश त्यांच्या अभंगातून दिसत नाही.

(पान ६ वर)

---


सिनेजगत

देवेंद्र प्रभुणे

## 'लो मैं बन गया थानेदार...'

# ...रंग खाकीचे, चित्रपटातील!

'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रीद अंगीकारलेला पोलिस विभाग सभ्य समाजाचा प्रहरी. संपूर्ण भारतात एकसंध पोलिस सेवा प्रारंभ करण्याचे श्रेय ब्रिटिशांकडे जाते. भारतीय पोलिस कायदा, १८६१ अन्वये कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेली एकमात्र केंद्रीय यंत्रणा म्हणून पोलिस विभागाची स्थापना झाली. अर्थात, भारतीय न्यायव्यवस्थेचे सहयोगी म्हणून पोलिस विभाग मूलतः कार्य करतो. परंतु समाजात सुव्यवस्था राखण्याचे अतिशय महत्त्वपूर्ण कार्य पोलिस विभाग करतो, हे निर्विवाद! गमतीचा भाग म्हणजे, भारतात लहान मुलांना भीती दाखवण्यासाठी प्रत्यही बागुलबुवा व पोलिस यांचा सदैव वापर केला जातो. ब्रिटिशांनी आपल्या दडपशाही व दमन नीतीसाठी पोलिस विभागाचा प्रच्छन्न वापर केला.



विशेषतः १९२० ते १९४७ या कालावधीत पोलिस विभाग म्हणजे जुलूमाचे पर्यायवाची नामानिधानच होते. स्वातंत्र्योत्तर कालावधीत मात्र पोलिस विभागाच्या दृष्टिकोनात आमूलाग्र बदल झाला आणि पोलिस विभाग सभ्य व सुसंस्कृत समाजाचा जागृत रखवालदार म्हणून उदयास आला. पोलिस खलनायकाच्या भूमिकेतून नायकाच्या भूमिकेत आले. हिंदी चित्रपटांमध्येदेखील याचे लखलखीत प्रतिबिंब उमटले. १९५० च्या दशकात पोलिस व्यक्तिरेखांना महत्त्वपूर्ण स्थान देणारे हिंदी चित्रपट येऊ लागले. पोलिस व्यक्तिरेखेसाठी जनमानसात आदराची व आपुलकीची भावना रुजवणारा पहिला लक्षणीय चित्रपट म्हणजे, 'सीआयडी' (१९५६). देव आनंदने साकारलेली इन्स्पेक्टर शेखर ही भूमिका वर्षानुवर्षे पोलिस अधिकाऱ्याचे प्रारूप म्हणून चिरस्मरणीय ठरली. देव आनंद यांनी पोलिस अधिकाऱ्याचा रुबाब, अधिकार व वावर पडद्यावर अप्रतिम साकारला होता. विशेष म्हणजे, सर्वाधिक चित्रपटांत पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारून 'विक्रम पुस्तकां'मध्ये स्थान मिळविणारे जगदीशराज खुराणा यांचा हा पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेतील पदार्पणाचा चित्रपट! देव आनंद यांनी नंतरही जाली नोट, जॉनी मेरा नाम, शरीफ बदमाश, छुपा रुस्तम, बुलेट, अव्वल नंबर, सौ करोड या चित्रपटांमध्ये पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारली.

परिस्थितीमुळे डाकू बनलेल्या सख्ख्या मोठ्या भावाला गोळी घालणारा पोलिस निरीक्षक जमुना, नासीर खानने (दिलीपकुमार यांचे कनिष्ठ बंधू) समरसून वठवला होता तो 'गंगा जमुना' (१९६१) या चित्रपटात. अजूनही ही कथाकल्पना चित्रपट निर्मात्यांना भुरळ घालते. १९६० च्या दशकात, संजीवकुमार यांनी साकारलेला 'शिकार' (१९६८) चित्रपटातील पोलिस अधिकारी लक्षणीय होता. गमतीचा भाग म्हणजे संजीवकुमार यांनी कारकीर्दीचा प्रारंभ 'हम हिंदुस्तानी' (१९६०) चित्रपटात पोलिस निरीक्षकाची छोटी भूमिका साकारून केला होता. १९७० च्या दशकात, वेडाचे सोंग पांघरलेला इन्स्पेक्टर सुनील संजीवकुमार यांनी साकारला होता तो 'अनहोनी' (१९७३) चित्रपटात तर सुडाने पेटलेला व हात गमावलेला इन्स्पेक्टर बलदेवसिंग ही संजीवकुमारने साकारलेली पोलिस अधिकाऱ्याची उत्तम भूमिका 'शोले' (१९७५) चित्रपटाचे बलस्थान होते. 'मनोरंजन' (१९७४) चित्रपटातील संजीवकुमारने साकारलेला, रंगीन-मिजाज कॉन्स्टेबल रतन लाजवाब..! 'फरार' (१९७५), 'उलझन' (१९७५), 'धोती लोटा और चौपाटी' (१९७५) या हास्यास्पद चित्रपटातील इन्स्पेक्टर वागळे, 'मुकद्दर' (१९७८) चित्रपटातील इन्स्पेक्टर विजय सक्सेना तर १९७० च्या दशकात लोकप्रिय असलेल्या रहस्य कथांवर आधारित 'इन्स्पेक्टर ईगल' (१९७८) चित्रपटातील शीर्षक भूमिका, 'बेरहम' (१९८०) चित्रपटातील करारी पोलिस कमिश्नर कुमार आनंद, 'हीरो' (१९८३) चित्रपटातील वेशांतर करणारा इन्स्पेक्टर दामोदर माथुर या पोलिस अधिकाऱ्यांच्या भूमिका संजीवकुमारने आपल्या अभिनय सामर्थ्याने गाजवल्या. पण पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेला सर्वोच्च स्थानी घेऊन जाणारा अभिनेता म्हणजे अमिताभ बच्चन. 'जंजीर' (१९७३) चित्रपटात त्याने साकारलेला अंतर्मुख व धुमसणारा पोलिस निरीक्षक विजय खन्ना म्हणजे क्या कहने,. केवळ अप्रतिम..! या तोडीची, पोलिस अधिकाऱ्याची भूमिका नंतर हिंदी चित्रपटात आली ती म्हणजे 'अर्धसत्य' (१९८३) चित्रपटातील पोलिस उपनिरीक्षक अनंत वेलणकर ही ओम पुरीने अक्षरशः जगलेली भूमिका. आपल्या भारदस्त आवाज व अवाक करणाऱ्या देहबोलीने ओम पुरीने चिरस्मरणीय प्रस्तुती दिली. १९८२ साली आलेल्या पिता-पुत्र संघर्षावरील सर्वोत्तम चित्रपटात म्हणजे 'शक्ती'मध्ये दिलीपकुमार यांनी डीसीपी अश्विनीकुमार ही भूमिका ज्या संवेदनशील पद्धतीने साकारली ती केवळ अद्भुत होती.

अर्थात, १९८० च्या दशकात पोलिस दलात शिरलेल्या अनिष्ट प्रवृत्ती हिंदी चित्रपटातही दृष्टिगोचर झाल्या. हे चित्रण अतिशय एकांगी व विपर्यस्त होते, हे मात्र तेवढेच खरे. याही कालखंडात कर्तव्य परमोच्च ध्येय मानणाऱ्या काही पोलिस अधिकाऱ्यांच्या भूमिका हिंदी चित्रपटात आल्याच. १९७६ साली आलेल्या 'कालीचरण' चित्रपटातील शत्रुघ्न सिन्हा यांनी साकारलेली डीएसपी प्रभाकर ही भूमिका. १९८७ साली आलेल्या 'सत्यमेव जयते' चित्रपटात विनोद खन्नाने साकारलेली इन्स्पेक्टर अर्जुनसिंग ही भूमिका याच पठडीतील. याच चित्रपटात, विनोद मेहराने साकारलेला प्रामाणिक इन्स्पेक्टर मिर्झा तर संधिसाधू इन्स्पेक्टर रवी वर्मा साकारणारा भरत कपूर पोलिस दलातील विचारधारांचे प्रातिनिधिक स्वरूप..! १९७० च्या व १९८० च्या दशकातील पोलिस अधिकाऱ्यांच्या भूमिकांवर अमिताभ बच्चन यांचा सर्वंकष प्रभाव होता. त्यांनी साकारलेल्या पोलिस अधिकाऱ्यांच्या भूमिकांमध्ये आक्रमकता आणि कोणाचीही गय न करण्याची वृत्ती आढळून येते. 'द ग्रेट गॅम्बलर' (१९७९) चित्रपटातील इन्स्पेक्टर विजय, 'दोस्ताना' (१९८०) मधील विजय वर्मा, 'राम बलराम'मधील बलराम, 'बरसात की एक रात' (१९८१) चित्रपटातील एसीपी अभिजित राय, 'महान' (१९८३) चित्रपटातील इन्स्पेक्टर शंकर तर 'इन्कलाब' (१९८४) चित्रपटातील तडफदार इन्स्पेक्टर अमरनाथ (या चित्रपटात जगदीश राज यांनी पोलिस दल प्रमुखाची भूमिका केली होती), 'गिरफ्तार' (१९८५) चित्रपटातील इन्स्पेक्टर करणकुमार खन्ना, 'शहेनशाह' (१९८८) चित्रपटातील अर्जुनसिंग या भूमिका मूलतः अमिताभ बच्चन यांच्या 'संतप्त नवयुवक' प्रतिमेचे विस्तारण होते. १९७० च्या दशकात, शशी कपूर यांनी 'दीवार' चित्रपटात कर्तव्यापुढे नाते दुय्यम मानणाऱ्या इन्स्पेक्टर रवी वर्माची भूमिका समरसून वठवली होती.

(पान ६ वर)

यशासाठी

डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

# हम होंगे कामयाब...!



१. दक्षिण अमेरिकेतील उरुग्वे देशातील रग्बी खेळाडू आपल्या नातेवाईक आणि मित्रांच्या सोबत एका खास विमानाने, १२ ऑक्टोबर १९७२ रोजी चिली देशातील सँटियागो या शहराकडे निघाले होते. प्रवास तीन तासांचा होता. एकूण ४५ प्रवासी होते. अचानक वातावरण खराब झाले.

वादळात विमान पुढे नेणे धोक्याचे ठरेल म्हणून पायलटने जवळच्या अर्जेन्टिना देशातील मेंडोजा विमान उतरविले. १३ ऑक्टोबरच्या दुपारी पुन्हा विमान पुढच्या प्रवासाला निघाले. सँटियागो शहराच्या जवळ पोचले म्हणून पायलटने विमान खाली आणायला सुरुवात केली. पण अचानक पुन्हा मोसम बदलला, टर्ब्युलन्समध्ये विमान ढगांनी वेढले गेले. पायलटला स्पष्ट दिसत नव्हते. खाली बर्फाच्छादित अँडीज पर्वताच्या रांगा पसरल्या होत्या. पर्वताच्या दोन सुळक्यांच्या मधून विमान वर नेताना विमानाच्या शेपटीचा भाग पर्वतावर आदळून तुटला. विमान वेगात खाली झेपावले. त्याचे दोन्ही पंख तुटले. काही प्रवासी बाहेर फेकले गेले. विमानाचा उरलेला भाग एका ठिकाणी आदळला व एकदाचा थांबला. त्या अपघातात दोन्ही पायलट ठार झाले. आश्चर्य म्हणजे एवढा जबरदस्त अपघात होऊनही ४५ पैकी ३३ प्रवासी जिवंत होते; पण अनेकांची प्रकृती गंभीर होती.

चिली देशातील विमान नियंत्रण कक्षाला या विमानाला अपघात झाल्याचे लक्षात आले. चार हेलिकॉप्टर विमानाचा शोध घेऊ लागले. प्रवाश्यांनी ते हेलिकॉप्टर पाहिले. त्यांनी आरसा चमकवून, ओरडून, उड्या मारून, हातवारे करून हेलिकॉप्टरमधील लोकांचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला; पण त्या डोंगराळ भागात सर्वदूर पांढरे बर्फ पसरलेले होते. त्यात हे अपघातग्रस्त विमान पांढरे असल्यामुळे मदतीसाठी आलेल्या कुणालाच दिसले नाही. फक्त आजची रात्र तेवढी काढायची आहे. उद्या पुन्हा हेलिकॉप्टर शोधायला येईल व आपली संकटातून सुटका होईल, अशी आशा सर्वांना वाटली. डोंगराळ भाग उणे ३० चे तापमान आणि पुरेसा आडोसा नाही. मग जे हालचाल करू शकत होते त्यांनी अपघाताने पसरलेले सामान, तुटलेले भाग याचा उपयोग करून तुटलेल्या विमानातच निवारा तयार केला. कुणीही झोपू शकले नाही. पाच प्रवाशांचा रात्रीत मृत्यू झाला. आता २८ प्रवासी उरले.

अर्जेन्टिना, चिली आणि उरुग्वे या तिन्ही देशांनी शोधकार्य चालू ठेवले; पण त्यांना यश मिळाले नाही. दिसावे म्हणून प्रवाश्यांनी विमानाच्या टपावर लिपस्टिकने खुणा केल्या, पर्वतावर बॅग रांगेत ठेवून क्रॉसचे मोठे चिन्ह तयार केले, पण त्याचाही उपयोग झाला नाही. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी चमकदार पत्रे वापरून सूर्यप्रकाशाच्या मदतीने बर्फ वितळवून त्यांनी दारूच्या रिकाम्या बाटल्यांमध्ये पाणी तयार करायला सुरुवात केली. विमानात जेवढेही अन्नपदार्थ सापडलेत त्याचा काटकसरीने वापर सुरू केला. थंडीपासून रक्षण करण्यासाठी निरुपयोगी सीट्सचे कापड व फोम काढून वापरले. मेंदूच्या दुखापतीमुळे तीन दिवस कोमात असलेला फर्नांडो नावाचा तरुण शुद्धीवर आला. तेव्हा त्याला कळले की, त्याच्या आईचा मृत्यू झाला असून १८ वर्षांची बहीण गंभीर जखमी आहे. त्याने आपल्या बहिणीला वाचवण्याचा खूप प्रयत्न केला, पण शेवटी तीसुद्धा दगावली.

रात्री हाडं गोठवणारी प्रचंड थंडी आणि दिवसा बर्फावरून परावर्तित होणारा, डोळ्यांना इजा पोहोचवून अंध करणारा प्रकाश, भूक, तहान, असुरक्षित वातावरण, झालेल्या जखमा, तुटलेली हाडे, दुखापती, दु:खाने कण्हणे, डोळ्यांसमोर जवळच्या नातेवाईकांचा, मित्रांचा झालेला मृत्यू असह्यपणे पाहणे... अशा अनेक दृष्टीने प्रतिकूल परिस्थितीत सगळे एकमेकाला धीर द्यायचा प्रयत्न करत होते. आपण वाचू अशी त्यांना आशा होती. अपघातानंतर आठ दिवसांनी आता कुणीही त्या वातावरणात जगू शकत नाही, असा विचार करून मदतीसाठी शोधकार्य पूर्ण थांबविण्यात आले.

प्रवाश्यांना एक ट्रान्झिस्टर सापडला; तो सुरू केला, पण त्यात फक्त ऐकू येत होते. संदेश पाठवता येत नव्हता. त्यामुळे शोधकार्य थांबवल्याचे त्यांना कळले. ११ दिवसांनी त्यांचे सर्व अन्न पूर्णपणे संपले. मग एकाने उपाय नसल्यामुळे ज्यांचा मृत्यू झाला आहे त्यांच्या शरीराचे मांस खाणे हाच एकमेव मार्ग आता उरल्याचे सांगितले. पण हे अनेकांना अशक्य होते. कारण मृत्यू पावलेले सगळे जवळचे नातेवाईक किंवा मित्रच होते. पण तीन दिवसांनी सगळ्यांना जीव वाचवण्यासाठी तोच मार्ग होता. पुढच्या दहा दिवसात तो साठासुद्धा संपला. दोन दिवसांनी तिथला हिमकडा कोसळला व त्या विमानाच्या पोकळीत म्हणजे त्यांच्या घरात पूर्ण बर्फ ठासून भरला गेला. त्यात आठ जणांचा मृत्यू झाला. हवेचा मार्ग बंद झाला होता. छोट्या जागेत १९ जण कसेबसे जिवंत होते. एकाने धातूचा पाईप वापरून बर्फातून हवा येण्याचा मार्ग तयार केला. नंतर कॉकपिटमधून बाहेर निघण्याचा मार्ग तयार केला.

बाहेर डोकावल्यावर कळले की, बाहेर प्रचंड हि वादळ सुरू आहे. म्हणून पुन्हा त्याच अडचणीच्या जागेत त्यांना तीन दिवस बसावे लागले. नुसते वाट पाहून मरण्यापेक्षा मदत मिळवायला बाहेर जावे, असा विचार करून तिघे तेथून बाहेर पडले. सोबत त्यांनी जास्त ऊबदार कपडे, पाणी व अन्न घेतले. विचार करून एक दिशा पक्की करून त्यांनी पर्वतावर चढून तो ओलांडण्याचा प्रयत्न केला. तीन दिवसांनी ते पर्वत शिखरावर पोहोचल्यावर आपली दिशा चुकल्याचे त्यांना कळले. पण वाटेत त्यांना त्यांच्या विमानाचा तुटलेला शेपटीचा भाग दिसला. तेथे त्यांना अनेक बॅग व चॉकलेट्स, दारूच्या बाटल्या व अन्नपदार्थ मिळाले. चढणे कठीण असले, तरी घसरपट्टी वापरून उतरणे सोपे होते. मग त्यातील एक जण अन्नाचा सापडलेला खजिना व ऊबदार कपडे घेऊन बर्फावर घसरून वापस गेला. त्याला परतायला फक्त एक तास लागला. त्यांच्या मागे ११ डिसेंबरला पुन्हा हिमस्खलन होऊन तिघांचे जीव गेल्यावर एकूण १६ जण उरले. फराडो आणि कनेसा मात्र पुढे निघाले.

पुढे गेल्यावर त्यांना पुन्हा दूरदूरपर्यंत बर्फाने झाकलेले पर्वतच दिसले. तेथून दिसणाऱ्या पर्वतांचे निरीक्षण केल्यावर दूर एक हिरवा पर्वत त्यांना दिसला. मग त्या दिशेने तीन दिवस ते चालत राहिले आणि प्रथमच त्यांना गाय दिसली. नंतर एक नदी दिसली. आधी नदीवर जाऊन दोघेही पोटभर पाणी प्यायले. दोघेही खूप थकलेले होते. तेवढ्यात नदीच्या पलीकडे त्यांना एक माणूस दिसला. त्यांनी त्याला खूप आवाज दिलेत, पण नदीच्या पाण्याचा एवढा आवाज होता की, त्या माणसाला ऐकू गेले नाही.

तेवढ्यात त्या माणसाचे यांच्याकडे लक्ष गेले. यांनी खुणेने त्याला समजावून सांगितले. तो माणूस हुशार होता. त्या भागात विमान पडल्याचे त्याला माहीत होते. नदीचे पात्र मोठे होते. त्याने यांना खुणेने सांगितले की, 'मी उद्या मदत आणतो; तुम्ही इथेच थांबा.' दुसऱ्या दिवशी तो माणूस घोड्यांवर बसून अजून तीन लोकांना घेऊन आला. तेथून घोड्यावर बसूनसुद्धा गावाकडे पोहोचायला त्यांना दहा तास लागले. शेवटी सँटियागो सैनिकी अधिकाऱ्यांपर्यंत ते पोहोचले. हेलिकॉप्टरमध्ये बसून हे दोघे त्यांना योग्य ठिकाणी घेऊन गेले. शेवटी अथक प्रयत्नांनी केवळ मनातील आशेच्या बळावर दोघांनी अपघाताच्या ७२ दिवसांनी का होईना, पण उरलेल्या १६ लोकांचा जीव वाचवला. नंतर त्यांना कळले की, त्या दोघांनी १० दिवसात बर्फाळ डोंगरातून ६१ किलोमीटर अंतर पार केले होते. दोघांचेही वजन अर्धे झाले होते. काय शिकायचे? : अशा अनेक घटना आपल्याला हेच शिकवतात की, कितीही प्रतिकूल परिस्थिती असली, भोवताली वाईट व मनाविरुद्ध दु:खद घटना घडत असल्या, तरी मनातील आशा सोडायची नाही. प्रयत्न चालूच ठेवायचे. क्रूरतेची परिसीमा गाठणाऱ्या हिंसक घटना घडल्यात तरी विचलित न होता धैर्याने एकजूट करून शत्रूचा प्रतिकार करायचा.

देशविरोधी लोक हात संविधानाच्या कोऱ्या प्रती घेऊन लोकांच्या मनात मोदीजींच्या विरोधात भीती भरविण्याचा प्रयत्न करीत आहेत; पण आपण आशा सोडायची नाही. १९०० साली I shall overcome someday म्हणजे मी एक दिवशी विजयी होईन... हे एक आशावादी गीत चार्ल्स अल्बर्ट टिंडले याने प्रकाशित केले आणि ते इतके लोकप्रिय झाले की, ते अमेरिकेतील 'नागरिक अधिकार आंदोलन गीत' बनले. नंतर त्यात थोडा फरक करून आम्ही एक दिवस जिंकू! म्हणून मार्टिन ल्युथर किंगने त्या गीताला आपले प्रमुख गीत म्हणून वापरले. त्यांच्या मृत्यूच्या दिवशी लाखो लोकांनी हेच गीत गाऊन त्यांना श्रद्धांजली दिली. याच अतिप्रसिद्ध गीताचा हिंदी अनुवाद आकाशवाणीतील साहित्यकार गिरिजाप्रसाद माथुर यांनी 'हम होंगे कामयाब' या स्वरूपात करून १९४१ मध्ये त्यांच्या 'मंजीर' या काव्यसंग्रहात प्रकाशित केला. नंतर १९७० साली दिल्ली दूरदर्शन केंद्राने सतीश भाटिया यांच्या भारतीय संगीत निर्देशनात सादर केले.

एक अजरामर हिंदी देशभक्ती गीत म्हणून आजही ते भारतात लोकप्रिय आहे. हे गीत कोणत्याही काळात समर्पक आहे. गेल्या सव्वाशे वर्षांत या गीताची तीच जुनी चाल पूर्ण जगात विविध अजूनही कायम आहे. गेली सव्वाशे वर्षे हे गीत जगात लोकप्रिय आहे. कारण या गीतामुळे मनात आशा स्थिर ठेवून लोकांना लढायची शक्ती मिळते. हम होंगे कामयाब, हम होंगे कामयाब, हम होंगे कामयाब, एक दिन मन में है विश्वास, पूरा है विश्वास हम होंगे कामयाब एक दिन...


होगी शांति चारों ओर, होगी शांति चारों ओर होगी शांति चारों ओर, एक दिन मन में है विश्वा, पूरा है विश्वास होगी शांति चारों ओर एक दिन...

हम चलेंगे साथ-साथ डाल हाथों में हाथ हम चलेंगे साथ-साथ, एक दिन मन में है विश्वास, पूरा है विश्वास हम चलेंगे साथ-साथ एक दिन...

नहीं डर किसी का आज नहीं डर किसी का आज, एक दिन मन में है विश्वास, पूरा है विश्वास नहीं डर किसी का आज एक दिन. संस्कृतमध्ये आशेची महती सांगणारे खूप छान सुभाषित आहे...

'आशा नाम मनुष्याणां काचिदाश्चर्यशृंखला । यया बद्धाः प्रधावन्ति मुक्तास्तिष्टन्ति पंगुवत् ।।' म्हणजे 'आशा मनुष्यासाठी एक अशी आश्चर्यकारक बेडी आहे की, ज्यामुळे आशेने बांधलेल्या व्यक्ती धावू लागतात आणि आशेच्या बंधनातून मुक्त असलेल्या व्यक्ती अपंग व्यक्तीसारख्या एकाच ठिकाणी बांधल्या जातात. तेव्हा आशेने बांधलेलेच राहा व ध्येयाकडे वाटचाल सुरू ठेवा.

कितीही कठीण काळ असला, तरी धीर सोडू नका. नवीन उत्साहाने व विश्वासाने कामाला लागा. शेवटी विजय आपलाच आहे. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## आत्म्यास हरिचा । लळा लागो ।।

सात्त्विक आहार । सेवावा त्रिकाळ ।।
रुजे सर्वकाळ । सत्वगुण ।।१।।

तामस आहारी । तमोगुण नांदे ।।
विषयांचे वांदे । यात करी ।।२।।

फलाहार देई । उत्तम ते फळ ।।
निरोगी निर्मळ । देह ठेवी ।।३।।

आहाराचे सूत । विचारांशी जुळे ।।
व्यासंगात मिळे । ब्रह्मसुख ।।४।।

उमजूनी घ्यावा । आहार नित्याचा ।।
आत्म्यास हरिचा । लळा लागो ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## ठेवा आनंदाचा

आनंदाचा ठेवा माझा कोणी कसा हरवेल
निसर्गदत्त स्वामित्व माझे मला गवसेल
जन्मजात आनंदाने बालपण भारावते दमली भागली
तरी प्रसन्नता सापडते
ना फिकिर, ना टेंशन मालकीण माझी मीच
सभोवार विस्तारलं खळाळते चैतन्यच
रागावले, मारले की भोंगाडा पसरायचा
आपले खरे करत धिंगाणाही घालायचा
निखळ आनंद येत उमेद ही जगण्याची दे ना रे देवा!
मोठ्यांना भेट ही बालपणीची
तुझ्या माझ्यातले अंतर इथे काय कामाचे ना!
आम्ही सारे एक आहों हे आम्ही शिकवतो ना!

अरुणा देशपांडे

## माझी शाळा

बालपणीच्या आठवणीत मी जेव्हा जेव्हा रमते सुंदर
माझ्या शाळेभोवती मनपाखरू भिरभिरते इमारतींत
शाळेच्या आम्हा खेळण्या प्रांगण होते बागेमध्ये
फुलपाखरू भुंगे सदा बागडत होते देखण्या ऐशा
इमारतीत त्या माझाही वर्ग होता वर्गामधल्या भिंतीवरती
काळा फळा मिरवित होता गुरुजन अमुचे कुट्ट फळ्यावर
मोतीयाक्षर गिरवित होते बालमनामनात सुसंस्काराचे
जणू ज्ञानरुपी कुंभ भरवित होते मधल्या सुट्टीची अवखळ
ओढ मनास होती खेळ लगोरीचा रंगताच घंटा घणघणत
होती निरागस बालपणी सवंगड्यासह मिळूनी डब्बा खात
होतो चिमणीच्या दाताने तोडूनी संत्रागोळी एकमेका
भरवित होतो कट्टीचाही एक अनोखा मग डाव रंगत
होता पण दो होण्यासाठी जराही अवधी लागत नव्हता
आठवणींच्या हिंदोळ्यावर मन माझे हुरहूरते रम्य निकोपी
जेव्हा निरागस बालपण ते आठवते

संगीता पिज्दूरकर

अर्थोद्योग

महेश देशपांडे

गेल्या १० वर्षांमध्ये प्राप्तिकर भरणाऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. ऑक्टोबरमध्ये देशातील एकूण दुचाकी विक्रीत १४.२ टक्क्यांनी वाढ झाली. दरम्यान, स्मार्टफोन निर्यातीचे मागील विक्रम मोडीत काढत आयफोन निर्यातीने मागील सात महिन्यांमध्ये ६० हजार कोटी रुपयांचा टप्पा गाठला. भारताच्या सौर उत्पादनांची निर्यात गेल्या दोन वर्षांमध्ये २० पटींनी वाढली. असाच विकासवेग अन्य क्षेत्रांमध्येही पाहायला मिळत आहे


# दिलासादायक उद्योगचित्र

मोदी सरकारच्या कार्यकाळात मध्यमवर्गीयांवरील कराचा बोजा कमी झाला आहे. विशेषत: २० लाखांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या मध्यमवर्गावरील कराचा बोजा कमी होत आहे, तर ५० लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या प्राप्तिकराचे परतावे दाखल करणाऱ्यांच्या संख्येत पाच पटींनी वाढ झाली आहे. गेल्या दशकात प्राप्तिकर भरणाऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे ही आकडेवारी दर्शवते.

सध्याच्या सरकारने लागू केलेल्या करचोरी आणि काळ्या पैशाविरोधातील कडक कायद्यांमुळे करदात्यांची संख्या वाढल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. प्राप्तिकर विभागाच्या सूत्रांनुसार, ५० लाखांपेक्षा जास्त वार्षिक उत्पदन दाखवणाऱ्या लोकांची संख्या २०२३-२४ मध्ये ९.३९ लाखांपेक्षा जास्त झाली आहे. हा आकडा २०१३-१४ मधील १.८५ लाखांपेक्षा पाचपट अधिक आहे. ५० लाखांपेक्षा जास्त कमाई करणाऱ्यांचे प्राप्तिकर दायित्व २०१४ मध्ये २.५२ लाख कोटी रुपयांवरून २०२४ मध्ये ९.६२ लाख कोटी रुपयांपर्यंत म्हणजेच ३.२ पटीने वाढले आहे. भारतीय दुचाकी बाजारासाठीही एक आनंदाची बातमी आहे. केवळ ऑक्टोबर महिन्यात दुचाकींची विक्री २१.६४ लाख युनिट्सवर पोहोचली. ऑक्टोबर २०२३ मध्ये हा आकडा १८.९६ लाख होता. 'सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरर्स'ने या संदर्भात नवी आकडेवारी जाहीर केली आहे. त्यानुसार ऑक्टोबरमध्ये देशातील एकूण दुचाकी विक्रीत १४.२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये दसरा आणि दिवाळी या दोन प्रमुख सणांमुळे चांगली खरेदी झाल्याचे ऑटोतज्ज्ञांचे म्हणणे आहे. पारंपरिकपणे, या काळात लोकांना वाहने खरेदी करण्याची इच्छा असते. या उत्सवाचा वाहन उद्योगावर सकारात्मक परिणाम होत आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये 'पॅसेंजर व्हेईकल'ने ३.९३ लाख युनिट्सची आतापर्यंतची सर्वाधिक विक्री नोंदविली.

या दरम्यान तीनचाकी वाहनांच्या विक्रीत गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरच्या तुलनेत ०.७ टक्क्यांची घट झाली आहे. काही बाजार विश्लेषकांच्या मते दुचाकींच्या विक्रीत वाढ होण्याचे कारण ग्रामीण भागातील लोकांचे वाढलेले उत्पन्न आहे. एकूणच, भारतीय ऑटोमोबाईल उद्योगाने ऑक्टोबर २०२४ मध्ये विक्रीच्या बाबतीत संमिश्र कामगिरी पाहिली. 'सियाम'च्या मते, ऑक्टोबरमध्ये भारतात एकूण ३,६७,१८५ प्रवासी वाहनांची निर्मिती झाली. यामध्ये १,२८,०९७ प्रवासी कार, २,२६,९२४ युटिलिटी वाहने आणि १२,१६४ व्हॅनचा समावेश आहे.

ऑक्टोबर २०२३ मध्ये भारतात १,५६,२५० प्रवासी कार, २,१३,३८० युटिलिटी वाहने आणि १२,७५९ व्हॅन्सची निर्मिती झाली. म्हणजेच प्रवासी कार आणि व्हॅनच्या उत्पादनात अनुक्रमे १८ टक्के आणि ४.७ टक्क्यांची घट दिसून आली आहे; परंतु ऑक्टोबर २०२४ मध्ये युटिलिटी वाहनांच्या उत्पादनात ६.३ टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली. असाच ट्रेंड



देशांतर्गत विक्रीमध्येही दिसून आला आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये २,२५,९३४ युटिलिटी वाहने विकली गेली तर ऑक्टोबर २०२३ मध्ये १,९८,३५६ युटिलिटी वाहने विकली गेली; म्हणजेच १३ टक्के वाढ झाली. 'ह्युंदाई मोटर इंडिया' वाहन उद्योगातील तेजीमुळे उत्साहित आहे. वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी ह्युंदाईने अलिकडेच पुण्यात नवीन प्लांट बांधून उत्पादन क्षमता वाढवली.

भारतीय बाजारपेठेचे चित्र लक्षात घेऊन धोरणात्मक उत्पादन केंद्र तयार करत असून मध्य पूर्व, आफ्रिका, दक्षिण आशिया आणि लॅटिन अमेरिकेत वाढणाऱ्या वाहनांच्या मागणीचा फायदा घेण्याची तयारी ह्युंदाई करत आहे. दुसरीकडे भारताच्या मोबाईल मार्केटमध्येही विक्रमी व्यवसाय होताना दिसत आहे. गेल्या सात महिन्यांमध्ये भारतात बनविलेल्या आयफोन्सच्या निर्यातीचा विक्रम सात अब्ज डॉलरवर पोहोचला आहे.

स्मार्टफोन निर्यातीचे मागील सर्व विक्रम मोडीत काढत आयफोन निर्यातीने चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांमध्ये (एप्रिल-ऑक्टोबर) ६० हजार कोटी रुपयांचा टप्पा गाठला आहे. याचा अर्थ असा की, दर महिन्याला सरासरी एक अब्ज डॉलरचे आयफोन निर्यात केले जातात. 'ॲपल' भारतातून केवळ आयफोन १४, १५ आणि १६ ची निर्यात करत नाही, तर यावर्षी ऑक्टोबरमध्ये स्थानिक पातळीवर आयफोन १६ प्रो आणि प्रो मॅक्सचे उत्पादन सुरू केल्यानंतर या मॉडेल्सचीही निर्यात करत आहे. प्रो आणि प्रो मॅक्स मॉडेल्सचे मूल्य इतर आयफोन मॉडेल्सच्या तुलनेत सुमारे दीड ते दुप्पट जास्त आहे. त्याच वेळी 'सायबर मीडिया रिसर्च' या मार्केट रिरसर्च फर्मने म्हटले आहे की, जुलै-सप्टेंबर तिमाहीमध्ये भारतातील टॅब्लेट पीसी बाजार वार्षिक आधारावर ४६ टक्क्यांनी वाढला आहे. २० ते ३० हजारांच्या दरम्यान असलेल्या टॅब्लेटच्या किमतीत गेल्या वर्षीच्या तुलनेत १०८ टक्क्यांनी लक्षणीय वाढ झाल्याचे अहवालात म्हटले आहे. ३४ टक्के शेअरसह 'ॲपल'च्या 'आयपॅड'ने या विभागाचे नेतृत्व केले. भारत सौर ऊर्जेच्या क्षेत्रातही सतत वाढ नोंदवत आहे. भारताच्या सौर उत्पादनांची निर्यात गेल्या दोन वर्षांमध्ये २० पटींनी वाढून दोन अब्ज डॉलर झाली आहे.



एका अहवालानुसार, २०२२ ते २०२४ या काळात भारताच्या सौर फोटोव्होल्टेईक (पीव्ही) उत्पादनांच्या निर्यातीत २३ पट वाढ झाली आहे. 'इन्स्टिट्यूट फॉर एनर्जी इकॉनॉमिक्स अँड फायनान्शियल ॲनालिसिस' आणि 'जेएमके रिसर्च अँड ॲनालिसिस'च्या अहवालानुसार भारतातील सौर उत्पादनांच्या क्षेत्रात ही लक्षणीय प्रगती आहे. भारतीय सोलर पीव्ही निर्यातीसाठी अमेरिका एक प्रमुख बाजारपेठ म्हणून उदयास आली आहे.

२०२३ आणि २०२४ या दोन्ही वर्षांमध्ये भारतीय सौर पीव्ही निर्यातीपैकी ९७ टक्क्यांहून अधिक अमेरिकेला गेली. 'एमएनआरआय'च्या मते, ४५३ गीगावॉटच्या एकूण वीज निर्मिती क्षमतेमध्ये अक्षय ऊर्जेचा वाटा वाढून ४६ टक्के झाला आहे. देशाची एकूण अक्षय ऊर्जा क्षमता २०० गीगावॉटच्या पुढे गेली आहे. भारताची अक्षय ऊर्जा क्षमता केवळ एका वर्षात २४.२ गीगावॉट (१३.५ टक्के) ने वाढून ऑक्टोबर २०२४ मध्ये २०३.१८ गीगावॉटवर पोहोचली आहे. दुसरीकडे भारतीय दागिन्यांच्या ई-कॉमर्स मार्केटमध्ये जबरदस्त व्यवसाय होताना दिसत आहे. विक्रेते आणि खरेदीदार ऑनलाईन ई-कॉमर्सचा आनंद घेत आहेत. एका अहवालानुसार, ज्वेलरी ई-कॉमर्स मार्केटने तीन वर्षांमध्ये २२ अब्ज डॉलरचा व्यवसाय केला आहे. पुढील दोन-तीन वर्षांमध्ये ऑनलाईन विक्री २० टक्क्यांपर्यंत वाढेल. ती सध्या एक टक्का आहे. सोन्याच्या खरेदीच्या पारंपरिक प्रवृत्तीला मोठे आव्हान पेलावे लागणार आहे, असे या व्यवसायातील तेजीवरून दिसून येते. भारतातील सणासुदीने विक्रमी व्यवसाय केला आहे. सणासुदीच्या हंगामातील विक्री १२ टक्क्यांनी वाढून १.१८ लाख कोटी रुपयांवर पोहोचल्याचे अहवालात म्हटले आहे. यामध्ये केवळ मोठ्याच नाही, तर छोट्या शहरांचाही समावेश आहे. फॅशनविश्वातील विक्रीमध्ये सर्वाधिक वेगाने वाढ झाल्याचे या अहवालात सांगण्यात आले आहे. सामान्य व्यावसायिक महिन्यांच्या तुलनेत सणांच्या काळात विक्री तिपटीने वाढली आहे. फॅशनशिवाय इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, घरगुती वस्तू आणि किराणा मालाची मोठ्या प्रमाणात खरेदी झाली आहे. अंतराळ गुंतवणुकीत भारताचे उड्डाण इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे प्रमुख एस. सोमनाथ यांनी एक महत्त्वाची माहिती देताना सांगितले की, 'इस्रो'ने खर्च केलेल्या प्रत्येक रुपयाला २.५ रुपये परतावा मिळतो. अंतराळ क्षेत्राने २०१४ ते २०२४ दरम्यान सकल देशांतर्गत उत्पादनात ६० अब्ज डॉलरचे योगदान देऊन लाखो रोजगार निर्माण केले आहेत.

एस. सोमनाथ म्हणाले की, या कामगिरीवरून हे दिसून येते की, अंतराळ क्षेत्रात भारत जगात आघाडीवरचा देश म्हणून उदयास आला आहे. २०२३ पर्यंत भारतीय अंतराळ क्षेत्राचा महसूल ६.३ अब्ज डॉलर्स इतका वाढला आहे. अवकाश क्षेत्राने ४.७ दशलक्ष नोकऱ्या निर्माण केल्या आहेत. त्यात सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील ९६ हजार नोकऱ्यांचा समावेश आहे. एकंदरीत अनेक आघाड्यांवर देशातील उद्योग आणि सेवा क्षेत्राची वेगवान वाटचाल सुरू आहे. ही गती पुढील काही वर्षे अशीच सुरू राहण्याची अपेक्षा आहे.



अमरावती
जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील वडनेर गगाई येथे १४ ऑगस्ट १९१० रोजी डॉ. गणेश त्र्यंबक देशपांडे यांचा जन्म झाला. नागपूर विद्यापीठातील संस्कृत विभागात प्राध्यापक आणि विभाग प्रमुख म्हणून कार्यरत होते. भारतीय साहित्यशास्त्र हा अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ गणेश देशपांडे यांनी लिहिला. १९५८ मध्ये प्रकाशित या ग्रंथाला १९५९ चा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला आहे. साहित्यशास्त्र आणि व्याकरण यावर आधारित असलेल्या या ग्रंथातून भारतीय साहित्याची नेमकी ओळख करून देण्याचे काम देशपांडे यांनी केले आहे.


# ‘भारतीय साहित्यशास्त्र’ नाट्य काव्य आणि साहित्यशास्त्र शिकवणारा ग्रंथ

**साहित्य शिक्षण**

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

नाट्यशास्त्रातील काव्यशास्त्र याबाबत बोलत असताना डोळे आणि कान एकाच वेळी एकच अनुभूती घेतात मात्र त्याचे पडसाद वेगवेगळे पद्धतीने उमटत असतात असे सांगून एखाद्या नाट्य कृतीचा वेगवेगळ्या अनुषंगाने पडसाद रसिकांच्या मनावर पडत असतो हे ते समजून सांगतात. रामायण महाभारत पाणिनी अशा विविध उदाहरणातून लेखकाने नाट्यशास्त्रातील काव्यशास्त्र उलगडून दाखविले आहे. ब्रह्मदेवांनी काव्यपुरुषाला काव्यविद्ये प्रवर्तन करण्याचे सांगितले आणि ही विद्या अठरा अधिकरणांत विभागली आणि आपल्या दिव्य शिष्यांना सविस्तर सांगितली. नाट्यविद्याच्या अहंकारामुळे भरत मुनीच्या पुत्रांनी ऋषीमुनींची चेष्टा करणारे नाटक बसवले. त्यामुळे त्यांनी त्या पुत्रांना शाप दिला. त्यावर उशाप म्हणून ज्ञान वाटत चला. त्यामुळे तुमचे ज्ञान कायम राहील असे भरत मुनीनी सांगितले अशा आख्यायिका मधून ज्ञान चिरंतन ठेवायचे असेल तर ते वाटले पाहिजे, एका जणांकडून दुसरीकडे ते वितरित झाले पाहिजे प्रसारित झाले पाहिजे असा विचार देशपांडे यांनी भारतीय साहित्यशास्त्र यात दिला आहे.

भारतीय साहित्यशास्त्र यात काव्यचर्चेचा स्वतंत्र संसार या प्रकरणांमध्ये लेखकाने काव्यातील अलंकार, त्यांची लक्षणे, याशिवाय काव्य निर्मितीच्या मागचे प्रयोजन यासह काव्याचे गुण काव्य विकासाचा भरतमुनी आणि भामह यांच्या काव्यविषयक विचार बंधनातून काव्यावर चर्चा घडवून आणली आहे. त्या अनुषंगाने विचार करता नेमके काव्य कसे लिहावे? त्यात नेमके काय असावे? काव्याचे प्रयोजन काय? इत्यादी बाबी सांगण्याचा म्हटल्यापेक्षा शिकवण्याचा महत्त्वाचा सोपस्कार लेखकाने या ठिकाणी पार पाडला आहे. अभिनवगुप्त म्हणतो की महाकवी व्हायचे असेल तर होऊन गेलेल्या महाकवीची पाऊले कशी पडली हे कळल्याशिवाय काव्य समृद्धीचा जीना चढता येणार नाही असे सांगून आपण काव्य गुण शिकल्याशिवाय काव्यसमृद्धी होणार नाही तसेच होऊन गेलेल्या कवींचा अभ्यास केल्याशिवाय काव्य निर्मिती सर्वोच्च शिखरावर पोहोचणार नाही अशा शब्दातून प्रा. देशपांडे यांनी कविता आणि काव्यशास्त्र यांचा अभ्यास करण्याचा विचार मांडला आहे. काव्याच्या नवीन वाटा जश्या विस्तारित होत गेल्या तसे काव्य विषयक जुने विषय, काव्य तंत्र आणि काव्याची गरज आणि परंपरा या सर्वांमध्ये परिवर्तन होत गेले. त्या होत गेलेल्या परिवर्तनाचाही आढावा प्रा. देशपांडे यांनी घेतलेला दिसून येतो. त्यात नव्याने निर्माण होत जाणार्या कविता, त्या कवितांमधील माधुर्य, त्या काव्याचा किंवा कवींचा स्वभाव गुण, लेखनगुण, लिखाण शैली अशा विविध बाबींवर लेखकाने चर्चा केली आहे. तत्कालीन विचारवंतांच्या ग्रंथाच्या आधारे तत्कालीन विचारवंतांच्या दृष्टिकोनांचा तुलनात्मक अभ्यास करून स्वतःचे मत मांडण्यातही लेखक ग. त्र्यं. देशपांडे मागे राहत नाहीत असे आपल्याला हा ग्रंथ वाचताना जाणवते. भामहास म्हणावयांचे शास्त्र म्हणजे काय आहे? ते तर



गुरुजवळ राहून घोकून घोकून शिकता येईल मात्र काव्याचे तसे नाही, काव्य निर्मिती साठी प्रतिभा आवश्यक असतेच.

काव्य हे शिकवून तयार होणारी बाब नव्हे. त्याच बरोबर गुणदोष शास्त्र ज्ञानाशिवाय कळणे शक्य नाही असेही विवेचन लेखकाने उलगडून दाखविले आहे. त्याचबरोबर भाषा शास्त्रज्ञ यांनी कवितेच्या व्याकरणाला केलेला विरोध आणि भामहाचा काव्य निर्मिती मागचा प्रपंच यासह काव्यावर परखडपणे टीका करणारे टीकाकार आणि नाट्यकाव्यशास्त्रात अभिनयाचे असलेले महत्त्व इत्यादी बाबतचा परामर्शही लेखकाने घेतलेला दिसून येतो. भारतीय साहित्यशास्त्रात अलंकाराचे महत्त्व आणि अलंकारशास्त्राची वाटचाल कशी होत गेली ते सांगत असताना वामन पंडितांचा गुणलंकार विवेक यासह कुमार स्वामींचे अलंकार व्याप्तीच्या अनुषंगाने झालेले महत्त्वाचे कार्य, काव्यामधील रस विषयक चर्चा आणि काव्यातील रसाचे महत्त्व इत्यादी बाबी लेखकाने चर्चिले आहेत. त्याशिवाय काव्यातून आनंद प्राप्तीचा अनुभव घेणे हेच काव्याचे प्रयोजन आहे असे म्हणणारे आनंदवर्धन, आपल्या काव्यगुणाचे श्रेय आपल्या पत्नीला देण्याचे साहस दाखवणारा तत्कालीन स्त्री पुरुष समानतेचा विचार ठेवणारा कनौज नगरीचा राजकवी राजशेखर यांच्या काव्यमीमांसा या ग्रंथातील विचाराच्या आधारे काव्यशास्त्रातील सूक्ष्म बारकावे मांडणे यासह काव्यप्रकाश या महत्त्वाच्या ग्रंथाचे लेखक आचार्य मम्मट यांच्या काव्य विषयक विचाराचा आणि निरीक्षणाचा आढावा लेखकाने घेतलेला दिसून येतो. संस्कृत साहित्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काव्य प्रकाश हा ग्रंथ अत्यंत मोलाचा असल्याचे लेखक सांगतात. त्यानंतरच्या काळात होऊन गेलेले महत्वाचे ग्रंथकार हेमचंद्र रामचंद्र गुणचंद्र विद्यानाथ, अप्पय्य दीक्षित जगनाथ यांच्या कार्याचाही अभ्यास लेखकाने मांडलेला दिसून येतो. साहित्यशास्त्राचा विकास कसा झाला? त्याचे टप्पे कोणते? संस्कृत काव्य आणि मराठी काव्य यातील तुलनात्मक विचार अशा अनेक बाबींवर लेखकाने भारतीय साहित्यशास्त्राच्या पहिल्या भागात आपले मत मांडले आहेत.

भारतीय साहित्यशास्त्राच्या दुसऱ्या भागामध्ये काव्यात वापरल्या जाणाऱ्या शब्दार्थाचा विचार, व्याकरणाचा विचार, वाक्यातून नेमका कोणता बोध मिळतो, शब्दातून नेमका कोणता बोध मिळतो? काव्याचा वाचार्थ कोणता आणि काव्यार्थ कोणता? अशा काव्य विषयक ज्ञानाचा उलगडा करत जाणार्या अनेक मुद्द्यांवर ग त्र्यं देशपांडे यांनी चर्चा केलेली आहे. काव्याचा लाक्षणिक अर्थ कोणता? काव्यातून प्रतिबंबित होणारा भाव कोणता? या बाबीवरही लेखकाने आपले मत मांडले आहेत. वामन पंडित ह्यांच्या मते विवेकी शिष्य हेच कवित्वाचे आणि काव्यशास्त्र ह्यांचे अधिकारी होत आणि त्यांच्या संताजी वामनाने आपला ग्रंथ लिहिला आहे. ह्या वरून आपल्या काव्यशास्त्रात गुरू शिष्य परंपरा किती महत्वाची होती ते लेखकाने सांगितले आहे असे दिसून येते. हेमचंद्र यांचे दोन शिष्य रामचंद्र आणि गुणचंद्र तसेच अभिनवगुप्ता चा शिष्य क्षेमेन्द्र यांचे उदाहरणही लेखकाने दिलेले आहे. नटाला विभाव हे काव्यवलावरूनच ज्ञात होत असतात. अनुभावांचे त्याने शिक्षण घेतले असते, आणि व्यभिचारी भाव हे नटाच्या कृत्रिम अनुभावांचे परिणाम असतात. अश्या वाक्यातून लेखक काव्य असो वा नाट्या त्यातील भाव व्यक्त करण्यासाठी शिक्षण घेणे गरजेचे असते असे लेखकाने सुचवले आहे. नट अभिनयाचे शिक्षण घेतो, आपले विभाव आठवितो, चित्तवृत्तीच्या साधारणीभावाने त्याचा हृदयसवाद होऊन त्या अवस्थेंत तो अनुभाव प्रकट करीत व आपलें भाषण विशिष्ट प्रकारे म्हणत तो रंगभूमीवर वावरत असतो. नाट्याबद्दलची त्याची जाणीव एवढीच असते.

या गोष्टीला अनुकरण म्हणतां येत असेही प्रा. देशपांडे ह्या संदर्भात लिहितात. एकंदरीत भारतीय साहित्यशास्त्र हा देशपांडे यांचा ग्रंथ भाषा विज्ञान आणि साहित्यशास्त्र यावर भाष्य करणारा असून साहित्य निर्मितीसाठी त्यातही नाट्यशास्त्र आणि काव्यशास्त्र यांचा सहज सोपा उलगडा करून सांगणारा साहित्य शिक्षण देणारा ग्रंथ आहे असे म्हणावे लागते. ह्या ग्रंथात खरे तर संस्कृत आणि मराठी काव्य-नाट्यशास्त्र ह्यातील भाषा साहित्य आणि व्याकरण ह्यासह साधारण २०० ते १७०० ह्या कालखंडातील ग्रंथकार, आणि साहित्याचा विकास ह्या बाबत ग. त्र्यं. देशपांडे ह्यांनी विस्तृत आणि सूक्ष्मपणे आढावा घेतला आहे. **(उत्तरार्ध)**

पान १ वरून

## महाराष्ट्र निवडणुका निकालांचा अर्थ...

फलोदी सट्टेबाजराची चर्चा आजही अबाधित आहे हाच त्याचा अर्थ आहे. अनिश्चितता या घटकाचा विचार न करणारा मतदार अंमलबजावणी या घटकाचा मात्र निश्चीत विचार करतो असा या निवडणुकीच्या निकालाचा अर्थ लावताना विचार नक्कीच करावा लागेल. कारण तसे पाहायला गेले तर उद्धव ठाकरे सरकार आणि एकनाथ शिंदे सरकार यांच्या योजनात फारसा काहीच फरक नव्हता. जो काही फरक आहे किंवा होता तो त्या योजनांच्या अंमलबजावणीमधे होता किंवा आहे. तसेच हे सरकार काम करण्यात यशस्वी झाले आहे हे जनता जनार्दन पर्यन्त पोचवण्यात शिंदे सरकार जास्त सक्षम ठरले असा या निकालाचा अर्थ आहे.

या निकालाचा गंमतीचा एक अर्थ असाही आहे की सरकारात प्रत्यक्ष कोण बसले आहे याला महत्व नसते असे नव्हे तर संबंधीत सरकार नेमके कोण चालवते हे मतदार नेमके ओळखून असतो. त्याला रिमोट कंट्रोल म्हणायचे की चालक - मालक, पालक म्हणायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. प्रत्येकाची गुरुदक्षिणा घेण्याचे प्रमाण व पद्धत वेगळी इतकेच!

बरेच काही बदलत असताना किंवा तसे काहीसे वाटत असताना बरेच काही मागील पानावरून पुढे चालू असेच असते हाही या निवडणूक निकालाचा एक अर्थ आहे.

१९६० च्या दशकात महाराष्ट्राच्या राजकारणाविषयी असे म्हणले जायचे की महाराष्ट्राचे राजकारण म्हणजे फक्त ५०६० घर किंवा घराणी! आत्ता या निकालानंतर असलेली २८८ आमदारांची यादी पाहिली की या परिस्थितीत सूतरामही बदल झालेला नाही हे लक्षात येते. ही परिस्थिती अबाधित ठेवण्यासाठी निवडणुकीच्या तोंडावर सोयीस्कर पक्षबदल करण्यातही यांना काहीही वावगे न वाटण्याचा साथीचा रोग सर्वपक्षीय आहे. त्यामुळे कोणत्याही पक्षाच्या निष्ठावान कार्यकर्त्यांनी आता अजून त्यांनी किती काळ सतरंज्या उचलत राहायच्या याचा मनापासून विचार करण्याची वेळ आली आहे हाही या निवडणुकीचा व त्याच्या निकालाचा खरा अर्थ आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालाचा एक आगळावेगळ अर्थ असाही आहे की यावेळच्या निवडणुकीत एक गोष्ट वेगळी आहे का याचा विचार करावा लागेल.

आपल्या पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून यावेत असा प्रचार करणे हे साहजिक व नैसर्गिक आहे. पण यावेळी पराभूत झालेल्या उमेदवारांच्या यादीकडे बारकाईने पाहिले तर हॉकी किंवा फुटबॉल सामन्यात जसे Man to Man Marking असते तसे काहीसे यावेळी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत झाले असावे का? असा विचार मनात येताना असेही वाटत राहते की, या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाचा एक अर्थ असाही नाही ना की अनेकांची नाही तरी निदान काहींची तरी राजकीय कारकिर्द आता त्या कारकिर्दीचा उपसंहार लिहू लागली आहे.

आणि तुलनेने राजकीय कारकिर्दीचा प्रभावी उपोदघात लिहीत आहेत असे फार कमी...

## ‘चक्र’ गतिमान राहावं!

यासाठी समाज जागृत करणे आवश्यक आहे, नव्हे ती काळाची गरज आहे, हे सर्वांना पटवून दिले आणि मग ही सारी मंडळी कार्यरत झाली. पू. गोविंद देव गिरी यांच्या नेतृत्वाखाली श्री शिवचैतन्य जागरण यात्रेचा महाराष्ट्रात प्रवास झाला.

ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर यांच्यासह वारकरी संप्रदायातील व इतरही अनेक धुरीणांनी आपल्या कीर्तन-प्रवचनात वरील साऱ्या मुद्द्यांच्या आधारे विवेचन करीत लोकशाहीत आपल्या मतास किती महत्त्व आहे, हे नागरिकांस पटवून देण्याचा प्रयत्न केला. या कार्यात सहभागी असंख्य स्वयंसेवकांनी घरोघर या विषयावरची पत्रके देत मतदान करण्याचे आवाहन केले. विचारवंतांनी विविध प्रसारमाध्यमांतून परिस्थितीचे गांभीर्य लोकांसमोर मांडत एकजुटीने मतदान करण्याचे आवाहन केले. या काळात असंख्य कार्यकर्त्यांचे पाय चक्राप्रमाणे फिरले. विचारांची चक्रे गतिमान झाली होती. ‘मतदार जागृती’चे अभियान चक्रासम गतिमान होते. सारा महाराष्ट्र पिंजून निघाला. ‘संघे शक्ति: कलौ युगे’ असा जो उल्लेख केला जातो, ती समाजातील ‘संघशक्ती-अर्थात सांघिक शक्ती’ कार्यरत झाली आणि तिने सद्विचारी नेतृत्वाला ऐन युद्धात दिशा दिली, बळ दिले. जणू अर्जुनासाठी हाती ’सुदर्शन’ घेणाऱ्या श्रीकृष्णाचेच दर्शन समाजातील सज्जनशक्तीने पुन्हा एकदा घडविले. ‘यदा यदा हि धर्मस्य’ असे वचन देणाऱ्या भगवंतांचा सामूहिक अवतार असेच वर्णन या सज्जनशक्तीचे करावे लागेल. हे ’सुदर्शन चक्र’ फिरत असल्यानेच समाजही भयमुक्त झाला.

‘सैनिक’ आणि ‘भक्त’ यातला नेमका फरकही लक्षात घ्यायला हवा. सैनिक राजासाठी लढतो, त्याची काही अपेक्षाही असते. पण, भक्त श्रद्धेने सेवा करतो. तिचे स्वरुप ‘**न मे कर्मफले स्पृहा।**’ म्हणजेच निरपेक्ष असते. जे या निवडणुकीच्या धामधुमीत देशभक्तांनी दाखवून दिले. कुणाचा आदेश, कुणाची आज्ञा, कुणाचे निमंत्रण या कशाचीही वाट न पाहता ज्याला जसे सुचेल तशी त्याने आपल्या क्षमतेनुसार या ‘धर्म यज्ञात’ आपल्या सेवेची ‘समिधा’ समर्पित केली आणि त्याचाच परिणाम म्हणून हे घवघवीत यश महायुतीच्या पदरी पडले. युधिष्ठिराच्या ‘राजसूय’ यज्ञात पाठीराख्या श्रीकृष्णास अग्रपूजेचा मान दिला गेला होता. विद्यमान सज्जन संघशक्तीस तो अपेक्षित नाही. पण, विजयोन्मादात सत्ताधार्यांना या शक्तीचा विसर पडू नये, एवढी अपेक्षा करणे निश्चितच गैर नसावे. अर्थात निवडणूक संपली. राजकारणाशी संबंध नसलेली कीर्तनकार, प्रवचनकार मंडळी आपापल्या नित्य उपासनेत व्यस्त होतील. पण, त्यांनी आपल्या भक्ती जागरण कार्यात राष्ट्रभक्ती व ईश्वरभक्ती या दोन्ही एकाच नाण्याच्या बाजू आहेत हे ठामपणे- उघडपणे सांगत संत तुकोबाराय व समर्थ रामदासांची परंपरा सांभाळत महाराष्ट्र हा राष्ट्राचा भक्कम आधार होईल असे पाहावे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्वतः काही करत नाही, पण स्वयंसेवक मात्र अनेक गोष्टी करतात, हेदेखील अनेकदा स्पष्ट झाले आहे. आताच्या निवडणुकीतही स्वयंसेवकांनी राष्ट्रकार्यातील आपल्या निरपेक्ष सहभागाचे दर्शन घडविले आहे.

संघ शताब्दी वर्षात मोरोपंतांच्या कल्पनेतील ही रचना पूर्ण करणे, पू. सरसंघचालकांच्या आवाहनानुसार दैनंदिन शाखांची संख्या, त्यांची योग्य उपस्थिती, उपक्रमशीलता या सर्वांचाही विचार व्हायला हरकत नाही. कोणत्याही सुविधा नसतानाचे संघकाम व अमर्याद सुविधांच्या काळातील कार्याचा, कार्यपद्धतीचा, कार्यकर्त्यांमधील कृतीशीलता व जिव्हाळा या सर्व गोष्टीचा तौलनिक विचार होणे ही गरजेचे वाटते. या सर्व गोष्टींचा विचार करून मोठ्या संख्येने व एक दिलाने स्वयंसेवक गतिशील झाले, तर समाजातील सज्जनशक्ती निश्चितच प्रभावी होईल. या शक्तीचे ‘सुदर्शन चक्र’ सतत फिरते राहिले, तर परचक्राची भीती राहणारच नाही. साहजिकच मग प्रारंभी उल्लेख केलेल्या संघगीतातील शेवटच्या ओळींचे साक्षात प्रत्यंतर आल्याशिवाय राहणार नाही.

**अजिंक्य हिंदू अजेय भारत अशी घोषणा नभास भेदित**
**हिमालयाच्या शिखरावरती ध्वजा आमुची डुलते रे।।६।।**

हे दृष्य पाहण्याचे भाग्य लाभावे यासाठी शताब्दी वर्षात शतप्रतिशत क्षमतेने प्रतिक्षण संघविचारासाठी झटणे महत्त्वाचे आहे, असे म्हणायला हरकत नाही. चला तर मग ‘संघटित सज्जन शक्तीचे सुदर्शन चक्र सदैव फिरते ठेवूया, ज्याचा धाक सदैव राजसत्तेला असेल.’ शेवटी राजदंडावर धर्मदंडाचे संयमन असणे हीच भारतीय संस्कृतीची प्राचीन परंपरा आहे.

## भ्रमाचा भोपळा फुटला

होणार आहे हे नक्की. पण, याकडे डोळसपणे बघायला कोणाकडे वेळच नाही, जो तो व्यस्त आहे त्याची पोळी भाजण्यात आणि कोणाला चुकून उपरती झालीच तर, मांजराच्या गळ्यात घंटा बांधणार कोण? हा प्रश्न वेगळाच!

## दारी येता पाखरे...

**कथा**

स्वाती पेशवे

प्रत्येक ऋतूची एक वेगळी ओळख असते. प्रत्येक ऋतू निसर्गाचा वेगळा आविष्कार दाखवत असतो. आताचा काळही तसाच आहे. हिवाळा सुरू झाला आहे. यंदाच्या चांगल्या पर्जन्यकाळानंतर चांगली थंडी अनुभवायला मिळत आहे. स्वाभाविकच आरोग्य, आहार, भटकंती, आध्यात्मिक उपासना, स्नेहसंमेलने आर्दीसाठी आनंदाची पर्वणी असून सुयोग्य संधी घेऊन या काळाचे स्वागतच करायला हवे.



एरवी भटकंती होत असली तरी हिवाळ्यातील भटकंतीची मजाच काही वेगळी. भर पावसात भिजत निसर्ग अनुभवताना येणाऱ्या मजेपेक्षा थोडी मजा पाऊस थांबल्यानंतरच्या या काळात फिरण्यातही आहे. तहान भागल्यानंतर देहाची होते तशीच अवस्था या काळात आजूबाजूच्या परिसरात बघायला मिळते. सगळीकडे संपन्नतेची छटा झळकत, ते सुख अनुभवत नवनवीन वाटांचा शोध घेण्यात दडलेले सुख अनुभवणे खरोखर आनंददायी ठरते. प्राणी, पक्ष्यांच्या निरीक्षकांसाठी तर हा काळ विशेष आनंददायी ठरतो. नानाविध पक्षीपक्ष्यांचा मुक्त संचार बघत, त्यांचे जवळून दर्शन घेत, निसर्गातील त्यांचे महत्त्व समजून घेत होणारी ही भटकंती आपल्याला त्यांच्या सुंदर सृष्टीच्या आणि निसर्गचक्राच्या आणखी जवळ घेऊन जाते. म्हणूनच नेहमीच्या भटकंतीबरोबरच हिवाळ्यात पक्षी निरीक्षणाचा आनंदही वेगळेच समाधान आणि ज्ञान देऊन जातो. या काळात स्थलांतरित पक्ष्यांचे निरीक्षण करणे, त्यांच्या प्रवासाचे वेधक चित्रण करणे, त्यांची लगबग बघणे कमालीचे सुखद असते.

स्थानिक प्रांतातील असह्य थंडीपासून वाचण्यासाठी हजारो किलोमीटरचा प्रवास करून हे पक्षिगण आपल्या अंगणापर्यंत पोहोचतात तेव्हा स्वागत न करणारे करंटेच म्हणायला हवेत. आताही असे हजारो-लाखो पक्षी आपल्या जवळच्या जलाशयांवर विसावले आहेत. त्यांच्या किलबिलाटाने परिसर गजबजून गेला आहे. भारतामध्ये स्थलांतर करून येणारे पक्षी बहुतेक थंडीतच येतात. चातकासारखे काही पक्षीच पावसाळ्यात येतात तर काही मोजक्या प्रजाती उन्हाळ्यात येतात, पण ९९ टक्के पक्षी थंडीतच इथे येतात. भारताचा संदर्भ विचारात घेतला तर या स्थलांतराचेही दोन प्रकार पाहायला मिळतात. एक म्हणजे पाण्याच्या परिसरात राहणारे पक्षी असतात, जे तलाव अथवा नदीकाठी येतात आणि दुसरा गट चिमणीसारख्या छोट्या आकाराच्या पक्ष्यांचा असतो, जे टेकड्या अथवा जंगलाच्या परिसरात मुक्काम ठोकतात. तलावाच्या काठी येणाऱ्या पक्ष्यांमध्ये बहुतकरून बदकांच्या विविध प्रजाती पाहायला मिळतात. बदकांच्या मुख्य जाती सायबेरियातून आपल्याकडे येतात. रशियाचा उत्तरी भाग, मंगोलियाचा भाग, एव्हरेस्टच्या आजूबाजूचा परिसर येथून आपल्याकडे येणाऱ्या पक्ष्यांची संख्या खूप मोठी आहे. ‘पट्टकदंब’ नावाचा एक पक्षी एव्हरेस्ट ओलांडून स्थलांतर करतो. मंगोलियातून येणारा पक्षी म्हणजे ‘चक्रवाक.’ त्याचे वर्णन कालिदासाच्या ‘मेघदूत’मध्ये आढळते. यासारख्या जवळपास ४० प्रकारच्या बदकांच्या प्रजाती या दिवसात आपल्याकडे स्थलांतरित होतात. त्यात ‘थापट्या’, ‘तलवार’सारखे पक्षी मोठ्या संख्येने असतात. पृथ्वीच्या स्तरावर बघता स्थलांतराचा एक पॅटर्न बघायला मिळतो. स्थलांतर हे नेहमीच उत्तर गोलार्धातून दक्षिण गोलार्धामध्ये बघायला मिळते. उत्तर गोलार्धात बर्फ पडायला सुरुवात झाली की, पक्षी दक्षिण गोलार्धात येतात. अमेरिकेचा भाग विचारात घेतला तर उत्तर अमेरिकेतील पक्षी दक्षिण अमेरिकेत येतात, उत्तर युरोपमधील पक्षी खाली आफ्रिकेत येतात आणि पूर्व युरोप, किरगिस्तानचा भाग आणि रशियातील पक्षी भारत आणि इंडोनेशियामध्ये येतात. म्हणजेच अमेरिकेतला पक्षी आपल्याकडे येत नाही तर लगतच्या दक्षिण भागाकडे जातो. खरे तर हे थंड प्रांतात राहणारेच पक्षी असतात. मग, ते इतका प्रवास करून पुन्हा थंडीतच का येतात, असा प्रश्न पडू शकतो. याचे उत्तर म्हणजे या काळात तेथील तापमान कमालीचे खाली उतरते. सैबेरियातील तापमान उणे ५० च्या खाली जाते. अशा वातावरणात ते जगूच शकत नाहीत. म्हणूनच त्यांना स्थलांतर करावे लागते. या काळात तेथील अन्नाचा साठा संपतो. दुसरे कारण म्हणजे एकदा विणीचा हंगाम संपला की त्यांना मूळ प्रदेशात राहण्याची फारशी गरजही जाणवत नाही. म्हणूनच वर्षातील दोन-तीन महिन्यांचा काळ तिथे व्यतित करून ते स्थलांतरास, हिवाळी मुक्कामास निघतात. म्हणजेच हे पक्षी वर्षातील ८-९ महिन्यांचा काळ बाहेरच घालवत असले, तरी मूळ त्या प्रदेशाचे म्हणून ओळखले जातात. कारण ते तिथे घरटी करतात. पक्ष्यांच्या स्थलांतराचे गणित जाणून घेणे खूपच रंजक आहे. ‘काळा करकोचा’ झेक रिपब्लिकमधून थेट उत्तर महाराष्ट्रापर्यंत येतो. पूर्व युरोपमधूनही हे पक्षी महाराष्ट्रात येतात. यातील रंजक बाब म्हणजे या पक्ष्यांची नवी पिढी कोणाच्याही मार्गदर्शनाशिवाय, कोणत्याही वाटाड्याशिवाय स्थलांतरास सुरुवात करते. विशेष म्हणजे ते अशाच मुक्कामी थांबतात जिथे त्यांच्या आधीच्या पिढ्या थांबल्या होत्या. अवघ्या एक-दोन महिन्यांच्या पिल्लांना हे ज्ञान कोण देते हे आजवर न उलगडलेले रहस्य आहे. मोठे पक्षी स्थलांतर करण्यापूर्वी दोन-तीन महिने वय असणाऱ्या या पिल्लांचा थवा स्थलांतरास निघतो आणि हजारो वर्षांपासून त्यांच्या पूर्वपिढ्यांनी अनुसरलेल्या मार्गावरून प्रवास करत उचित मुक्कामी पोहोचतो. याचा अभ्यास करताना वेगवेगळ्या थेअरीज मांडल्या गेल्या आहेत. कोणी म्हणते, पक्षी ताऱ्यांची दिशा जाणत असल्यामुळे रात्री स्थलांतर करतात. मुख्य म्हणजे रात्री स्थलांतर करताना उन्हाच्या त्रासापासून मुक्ती मिळते आणि शरीरातील ऊर्जेची बचत होते. पक्षी सूर्याची स्थिती लक्षात घेऊन दिशानिश्चिती करतात, असे काही जण म्हणतात. तिसरा गट म्हणतो, पक्षी लॅण्डमार्क लक्षात ठेवतात आणि त्यानुसार प्रवासाची दिशा ठरवतात. उदाहरणार्थ एव्हरेस्टचा किंवा एखादी नदी हा त्यांच्यासाठी महत्त्वाचा लॅण्डमार्क असतो. हे केंद्र धरून त्यांचा प्रवास सुनिश्चित होतो. बहुसंख्य पक्ष्यांचे सरासरी आयुष्य १५ ते २० वर्षांचे असते. म्हणजेच ते इतकी वर्षं नित्याने स्थलांतर करीत राहतात, पण एखादा पक्षी १९-२० वर्षांचा होतो आणि आता चार ते पाच हजार किलोमीटरचा प्रवास करू शकणार नाही हे समजते तेव्हा तो स्थलांतर थांबवतो. प्रवासात जीव जाणार हे माहीत असल्यामुळे तो वास्तव्याच्या ठिकाणीच राहणे पसंत करतो. असेच पक्षी हिवाळ्याव्यतिरिक्तच्या काळात आपल्याला बघायला मिळतात. यावरूनच पक्ष्यांना आपल्या वयाचा, शक्तीचा अंदाज असतो हे लक्षात येते. स्थलांतरादरम्यान पक्ष्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यांना शिकारी पक्ष्यांपासून धोका असतो. स्थानिक पक्ष्यांपासून धोका असतो. दूर अंतर कापताना शारीरिक क्षमता टिकवून ठेवण्याचे दिव्य त्यांना पार पाडायचे असते. पण जाऊन-येऊन १० हजार किलोमीटरचा हा प्रवास करण्याचे दिव्य पार पाडतात तेव्हा या पक्ष्यांचे (पान ६ वर)

**श्रीराम भारतीय जीवनाचा सर्वोच्च आदर्श आणि सर्वाधिक भक्तजनप्रिय उपास्य देवता आहे. या श्रीरामाची महाराष्ट्रात अनेक मंदिरे आहेत. त्यातील प्रमुख ऐतिहासिक अशा मंदिरांची माहिती घेऊ. त्यातील पहिले ऐतिहासिक मंदिर म्हणजे नाशिकचे श्री काळाराम मंदिर हे होय.**

लेखांक ४७

# महाराष्ट्रातील प्रमुख राममंदिरे
# श्री काळाराम मंदिर (नाशिक)

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५



श्री क्षेत्र पंढरपुरला 'भूवैकुंठ' म्हणतात, तसे श्रीक्षेत्र नाशिकला 'दक्षिण काशी' म्हणून भाविक भक्तांमध्ये, श्रद्धावंतांमध्ये सर्वोच्च स्थान आहे. दक्षिणवाहिनी माता गोदावरी नदीच्या काठी वसलेल्या या नगरीला 'कुंभनगरी' म्हणून हिंदू परंपरेत विशेष स्थान आहे. दर बारा वर्षांनी होणारा सिंहस्थ 'कुंभमेळा' नाशिकची खास ओळख आहे. त्रेतायुगात प्रभु रामचंद्राचे वनवास काळात या 'जनस्थान' नगरीच्या पंचवटी भागात वास्तव्य होते. राम-सीता आणि लक्ष्मणाच्या पुनीत वास्तव्याची अनेक पदचिन्हे आजही नाशिकमध्ये विद्यमान आहेत. 'श्री काळाराम मंदिर' त्या परममंगल पदचिन्हांपैकी एक आहे. आज जेथे भव्य, दिव्य, आकर्षक असे श्री काळाराम मंदिर विद्यमान आहे, तेथेच त्रेता युगात वनवासकाळात लक्ष्मणाने राम-सीतेनी बांधलेली पर्णकुटी होती, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे या काळाराम मंदिरास एक विशेष स्थान आहे. महाराष्ट्रात प्रभू रामचंद्राची अनेक मंदिरे आहेत त्यात रामटेकचे राम-लक्ष्मण मंदिर आहे, चाफळचे समर्थ रामदास स्थापित राम मंदिर आहे, नामयोगी संत गोंदवलेकर महाराज स्थापित 'थोरले राम मंदिर' आणि धाकटे राम मंदिर अशी दोन मंदिरे आहेत, पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी बांधलेले पंढरपूरच्या महाद्वार घाटावर स्थापित राम मंदिर आहे, फलटणच्या राजे निंबाळकर स्थापित राम मंदिर आहे. पण या सर्वांमध्ये नाशिकच्या काळाराम मंदिराचे स्थान एकमेवाद्वितीय आहे.

### काळाराम नव्हे 'काल' राम

नाशिकच्या 'काळाराम' मंदिराला फार मोठा इतिहास आहे. 'श्री काळाराम मंदिर' हे नाव अलिकडच्या काळात लोकरूढ झालेले नाव आहे. पूर्वी या मंदिराला 'रघुराम मंदिर', 'श्री रामचंद्र संस्थान मंदिर' म्हणून ओळखले जात होते. पण नंतरच्या काळात पंचवटीच्या पावन परिसरात अनेक रामभक्तांनी श्रीरामाची अनेक छोटी-मोठी मंदिरे बांधून पुण्यकार्याची धन्यता प्राप्त केली. या अनेक मंदिरातील रामाच्या मूर्ती पांढऱ्या संगमरवरी असल्याने आणि मूळ रघुराम मंदिरातील, गोदावरीमध्ये मिळालेल्या राम- लक्ष्मण- सीतेच्या मूर्ती काळ्या वालुकामय पाषाणाच्या असल्याने भाविक या मंदिरास 'श्री काळाराम मंदिर' म्हणून ओळखू लागले व तेच नाव कालप्रवाहात रूढ झाले, असे म्हणतात. खरे तर हा 'काळाराम' शब्द रंग वाचक नसून गुणवाचक आहे. तो शद्ब 'काळा' नसून 'काल' (कर्दनकाळ) असा कार्यवाचक आहे. ईश्वराचे वर्णन 'काळाग्नी', 'काळरूद्राग्नी' अशा शब्दामध्ये अनेक स्तुतीस्तोत्रामध्ये केलेले आहे. त्या अर्थाने हा 'कालाराम' आहे. शूर्पणखा भगिनीच्या अपमानाचा बदला घेण्यास आलेल्या राक्षस, खर, दूषण आणि १८ हजार राक्षससेनेचा प्रभू रामचंद्रांनी उग्र रूप धारण करून नायनाट केला. या उग्र रूपाला वीररूपालाच 'काल रूप' म्हणतात. राक्षसांसाठी राम कर्दनकाळ ठरला.

### काळ्या पाषाणाचे मंदिर शिल्पः महाराष्ट्र वैभव

श्री काळाराम मंदिराच्या इतिहासाचा आढावा घेताना आपणास इसवी सनाच्या ८व्या शतकात, या जागेवर एक लाकडी मंदिर होते असे दिसते. त्या लकडी मंदिराचा तत्कालिन शंकराचार्यांनी जीर्णोद्धार केला आणि नव्याने विधिवत नित्योपचाराची नवी परंपरा सुरू केली. या काळात या मंदिराला 'श्री रघुराम मंदिर' म्हणून ओळखले जात होते. आपण आज जे काळ्या पाषाणाचे कोरीव सुंदर असे 'श्री काळाराम मंदिर' पाहतो, ते इ.स. १७७८ ते १७९० अशा बारा वर्षांच्या काळात बांधलेले आहे. पेशव्यांचे सरदार श्री रंगनाथ ओढेकर यांनी श्रीमंत माधवराव पेशव्यांच्या मातोश्री गोपिकाबाईसाहेब यांच्या इच्छेनुसार या मंदिराचे बांधकाम करून घेतले. त्याकाळी त्यासाठी ३२ लक्ष रुपये खर्च आला असे इतिहासातील कागदपत्रातील नोंदीवरून कळते.

नाशिकच्या 'ओढा' भागामध्ये सरदार रंगनाथपंत जहागिरदार होते. या मंदिर निर्माण कार्यासाठी सरदार ओढेकरांच्या पत्नीनी आपली हिरेजडित नथ दान दिली होती व रामसेवेमध्ये खारुटीच्या सहभागाचे पुण्य मिळवले होते. हे मंदिर पूर्ण घडीव दगडाचे असून हा सारा काळापाषाण नाशिक जवळच्या डोंगरातून खोदून आणलेला आहे. अशा प्रकारे काळाराम मंदिराचे देखणे मंदिरशिल्प हे महाराष्ट्रातील पाषाण वैभव आहे.

इंद्राच्या ऐरावतालाही लाजवेल असे हे काळा पाषाणातील मंदिर, शिल्पकलेचा अद्वितीय, अनुपम असा देखणा आविष्कार आहे. त्र्यंबकेश्वरचे श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी बांधलेले 'त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग मंदिर' आणि नाशिकचे 'काळाराम मंदिर' या दोन्ही पाषाण शिल्पांच्या वैभवामध्ये विलक्षण साम्य आहे.

श्री काळाराम मंदिर हे पूर्वाभिमुख असून २६६ फूट लांब आणि १३८ फूट रूंद आहे. भोवती भरभक्कम दगडी तटबंदी असून चार दिशेला चार द्वारे आहेत. हे चार दरवाजे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष अशा चार पुरुषार्थाचे प्रतिक आहेत. प्रांगणातील तटबंदीला लागून कडेने अनेक ओवऱ्या आहेत. त्याला ८४ सुंदर कमानी आहेत. त्या ८४ लक्ष योनीच्या प्रतिक मानल्या जातात. सुमारे ८-१० पायऱ्या चढून मुख्य राममंदिरात जावे लागते. मुख्य मंदिरात ४० खांबाचा भव्य मंडप आहे. या मंडपास पूर्व, दक्षिण, उत्तर अशी तीन प्रवेशद्वारे असून ती सत्व, रज आणि तम या त्रिगुणांची प्रतिकरूप आहेत.

मंदिराचा गाभारा अत्यंत प्रशस्त असून गाभाऱ्यात चौथऱ्यावर श्रीराम,सीता, आणि लक्ष्मणच्या सुंदर मूर्ती विराजमान आहेत. या मूर्ती गोदावरीनदीच्या प्रवाहात सापडलेल्या स्वयंभू मूर्ती आहेत.

विशेष गोष्ट म्हणजे श्रीरामाचा डावा हात सरळ पायाकडे असून उजवा हात छातीवर आहे. पायी नतमस्तक होणाऱ्या श्रद्धावंताला श्रीराम छातीवर हात ठेवून रक्षणाचे अभय देत आहे. म्हणून हा काळराम-काळाराम 'अभयराम' सुद्धा आहे. मंदिरावर उंच शिखर असून सोन्याचा कळस चढवलेला आहे.

।। जय श्रीराम ।।

# आमची योग्यता आम्हाला कळाली...



अमृतकुंभ
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२

'सुंदर मी होणार' ही पुलंची अप्रतिम नाट्यकलाकृती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संस्थानं अखंड भारतात सहभागी झाली. लोकही स्वतंत्र बाण्यानं वागुन स्वातंत्र्याचा आस्वाद घेऊ लागली. प्रश्न निर्माण झाला तो राजवाड्यात राहणाऱ्या राजघराण्यातील वंशजांचा. त्यांच्यावर वडिलकीच्या नात्यानं चालणारी कुटुंबप्रमुखाची दडपशाही कशी मोडून काढायची? यासाठी तरुण पिढीने केलेले बंड हा विषय घेवून त्यात कला, साहित्य, संगीत हा सर्व मानवी जीवनाचा अविष्कार किती महत्वाचा, त्याशिवाय जीवन किती रुक्ष होईल? हे पटवून देण्याचा पुलंचा प्रयत्न सर्वांगसुंदर.

मराठी प्रेक्षकांनी हे नाटक डोक्यावर घेतलं. त्या नाटकावर आधारीत हिंदी चित्रपट काढण्याचा मोह एखाद्या निर्मात्याला व्हावा, हे अगदी साहजिकच होतं. पण मातृभाषेत जे रुचलं ते राष्ट्रभाषेतही पचलं पाहिजे असा काही नियम नसतो. त्यामुळं जसा विचार केला तसंच घडतं असं काहिचं नसतं. जे काही घडतं त्यात घडलेलं किती आणि बिघडलेलं किती? यावर फार विचार करत बसलं तर डोकं बिघडण्याचीच शक्यता अधिक असते. त्यामुळे शहाण्या माणसांनी ते तेवढच सहजतेनं घेणं यातच खरा शहाणपणा असतो. त्यात त्या चित्रपटाचं नाव होतं. 'आज और कल' त्या चित्रपटाच्या नावावर कोटी करुन पुलं म्हणतात, चित्रपटाचं नाव जर 'आज और कल' आहे तर प्रेक्षकांनी त्यानंतर चित्रपट पहायला का यावं? त्यांनी दोन दिवस प्रतिसाद दिला हेच खूप झाले. ही मनोवृत्ती माणसाला जगण्याचं बळ देते. हा एक छोटा प्रसंग आपल्याला खूप काही शिकवून जातो. नवोदित साहित्यिकास तर फार काही देवून जातो. पुलं म्हणतात वयाच्या सत्तरीनंतर माणसं सारखी तक्रार करतात. सकाळी उठल्याबरोबर आपल्या शरीराचा कोणता तरी अवयव दुखतोय.

आता ह्या तक्रारी खूपच लवकर सुरु झाल्या आहेत. किती लवकर तेही सांगता येतं नाही. पुलंच्या समोर आपल्या प्रकृतीची तक्रार करणाऱ्या अशा वृद्ध मनोवृत्तीच्या लोकांना ते सल्ला देतात, अहो एकदा वय झाल्यावर ज्याचे काहीच दुखत नाही. त्याने आपण मेलो असे समजावे. सतत आरोग्याच्या तक्रारी करत बसणे हा दुःखी जीवनाचा मूलमंत्र घेवून का व कशासाठी जगावे? आरोग्याच्या तक्रारी फक्त डॉक्टरला सांगा. सार्वजनिक ठिकाणी त्याचे उदात्तीकरण नको. याचे किमान ज्ञान प्राप्त झाले तर माणसं कमालं सुखी होण्याची शक्यता आहे. पुलं एकदा एका पौराणिक नाटकाला गेले. नाटकात श्रीकृष्णाची भूमिका करणारा नट दिसायला अगडबंब आणि थोराडं होता. त्याच्या पोटाचा आकार, ऊकार भलताच वाढल्यामुळे तो अगदी घेरदार दिसत होता. चालतांना तो अतिशय कष्टी होवून चालत होता. त्याची वेशभूषा पाहून याला कोणत्या दृष्टीने श्रीकृष्ण म्हणावे? तेच कळत नव्हते. तो खरं तर श्रीकृष्णाचा अपमानच होता. आयोजकांच्या विराट ज्ञानासमोर आपल्या अज्ञानाचे (?) कशाला प्रदर्शन करावे? असा विचार करुन प्रेक्षक घरी परतू लागले. तेव्हा पुलं म्हणाले, श्रीकृष्णाला अवतार का म्हणतात, हे मला आज कळाले. यावर एकच हशा पिकला. आयोजकांची पुलंच्या एका वाक्यामुळे अशी गोची झाल्याने आयोजक पुलंना बाजूला घेवून म्हणाले, अहो सर्व लोकासमोर आमची अशी पो-लखोलं करण्याची काही गरज होती का? त्यावर पुलं म्हणाले, माफ करा. ही बातमी गुप्त ठेवायची आहे याची मला अजिबात कल्पना नव्हती. या विनोदावर आयोजक हसून म्हणाले, अहो आमचा श्रीकृष्णाची भूमिका करणारा कलाकार रंगभूमीवर येण्यापूर्वीच मख्ख चेहरा करुन बसला होता. तर तो म्हणाला, माझी बायको माहेरी गेली आहे. मी त्याला म्हणालो, ही खूप आनंदाची गोष्ट आहे, अरे मग मस्त मजा करं ना त्यावर तो म्हणाला, बायको म्हणाली, आईला घेवून येते.

(पान ६ वर)

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य


थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

(भाग २४)

मागील भागात आपण रवींद्रनाथांच्या 'नष्टनीड' या लघु कादंबरीचा आढावा घेतला. आज त्यांच्या आणखी काही कादंबऱ्यांविषयी जाणून घेऊया... काव्यलेखनाला रवींद्रनाथांनी अगदी लहान असतानाच सुरुवात केली होती. परंतु कादंबरीच्या प्रांतात त्यांनी त्या मानाने बऱ्याच उशिरा प्रवेश केला. साधारणपणे वयाच्या २२ व्या वर्षी त्यांनी कादंबरी लेखनास सुरुवात केली. त्यांच्या आधी बंगालमध्ये बंकिमचंद्र चटर्जी यांनी उत्तमोत्तम कादंबऱ्या लिहून कादंबरी या साहित्य प्रकाराला प्रतिष्ठा मिळवून दिली होती. बंकिमचंद्र यांच्या 'आनंदमठ' या कादंबरीला बंगालमध्ये अतिशय लोकप्रियता लाभलेली होती.

बंकिमचंद्रांच्या इतर अनेक चाहत्यांप्रमाणे या कादंबरीचे वाचन रवींद्रनथांनी सुद्धा केले होते. त्यातूनच आपणही कादंबरी लेखन केले पाहिजे असे त्यांना वाटू लागले. 'बौ ठाकुरणीर हाट' ही त्यांची पहिली कादंबरी. ही कादंबरी म्हणजे कौटुंबिक कथाच आहे. यानंतर वयाच्या २६ व्या वर्षी त्यांनी 'राजर्षी' ही दुसरी कादंबरी लिहिली. ही त्यांची एक ऐतिहासिक कादंबरी आहे. या कादंबरीने रवींद्रनाथांचा कादंबरी लेखनाचा आत्मविश्वास वाढला. या दोन्ही कादंबर्यांमध्ये रवींद्रनथांनी स्वतः अनुभवलेल्या परिस्थितीचे चित्रण तर केलेच परंतु त्याबरोबरच त्याला आपल्या कल्पनाशक्तीची आणि प्रतिभाशक्तीची उत्तम जोड दिली. त्यानंतर त्यांची वहिनी कादंबरी देवी हिच्या मृत्यूचा त्यांच्या मनावर खोलवर परिणाम झाला आणि त्यानंतर आपल्या भावनांना मोकळी वाट करून देण्यासाठी त्यांनी नष्टनीड ही कादंबरी लिहिली. यानंतर त्यांच्या 'चौखेरबाली', 'नौका डुबी' या कादंबऱ्या वाचकांमध्ये लोकप्रिय झाल्या.

रवींद्रनाथांच्या लेखणीला 'मिडास टच' होता असे म्हणता येईल. त्यांनी ज्या-ज्या साहित्य प्रकाराला हात लावला, त्याचे सोने झालं. कादंबरी या प्रकारात लेखन करताना काही नवीन प्रयोगही त्यांनी केले. काही ठिकाणी कथा पुढे नेण्यासाठी आत्मनिवेदनाचे तंत्र वापरले. साहित्यकृतीतील सौंदर्य हे साध्य नसून साधन आहे असे ते मानत होते. तसेच साहित्यिकाने कलेचा आणि परिस्थितीचा सुरेख संगम घडवून आणला पाहिजे असे त्यांना वाटत होते. एखादी साहित्यकृती जेव्हा मानवी जीवनाशी एकरूप होते तेव्हाच तिच्यातून चिरंतन मूल्य प्रकट होतात असे ते मानत होते. यातूनच एखादी साहित्यकृती कशी असावी हे ही स्पष्ट होते. मानवी जीवन आणि त्यातील भावभावना समृद्ध करण्याचे कार्य रवींद्रनाथांच्या कादंबर्यांनी केले आहे. रवींद्रनाथांनी एकूण १४ कादंबर्या लिहिल्या पण त्यांच्या कादंबऱ्यांच्या संख्येबद्दल समीक्षकांमध्ये मतभेद आहेत कारण नष्टनीड, दुई बोन, मालंच आणि चार अध्याय यासारख्या त्यांच्या साहित्यकृतींना काही मान्यवर लेखकांनी दीर्घकथा म्हटले आहे. 'चौखेर बाली' ही त्यांची कादंबरी अतिशय वाचकप्रिय झाली.



या कादंबरीत अत्यंत गुंतागुंतीच्या मानवी भावभावनांचे चित्रण त्यांनी केले आहे. काम, क्रोध, मद, मत्सर आदी भावना किती प्रभावी असतात आणि त्यामुळे मानवी जीवनात किती परिवर्तन घडून येत असते याचे सुरेख वर्णन करणारी ही कादंबरी आहे. या कादंबरीत एक सुंदर सुस्वाभावी मुलगी आपल्या पतीच्या अकाली निधनामुळे विधवा होते आणि तिच्या नैसर्गिक भावभावना दडपल्या जातात. तारुण्यामध्ये जे सुख तिला मिळायला हवे होते, त्यापासून ती पारखी होते. तिचे जीवन म्हणजे या भावभावनांचा एक मोठा संघर्ष आहे. पूर्वीच्या काळी बालविवाह होत असत आणि बऱ्याचदा मुलीचा काहीही दोष नसताना ती विधवा होत असे अशावेळी तिच्या मनातील दाहक आणि प्रभावी वासनांचे चित्रण 'चौखेर बाली' ही कादंबरी करते. या कादंबरीने बंगाली साहित्यात मानाचे स्थान प्राप्त केले. रवींद्रनाथांचे मानवी जीवनाचे असलेले निरीक्षण आणि मानवी भावभावनांचा असलेला सूक्ष्म अभ्यास याचा पट उलगडलेला यातून दिसून येतो. मानवी जीवनात असलेले कामवासनेचे स्थान आणि त्याचे महत्त्व या कादंबरीत रवींद्रनाथ स्पष्ट करतात.

'नौका डुबी' या कादंबरीत हिंदू धर्मात असलेले वैवाहिक निष्ठेचे पावित्र्य आणि त्याची मुळे किती खोलवर रुजली आहे ते रवींद्रनाथ स्पष्ट करतात. मनुष्याचे वेगळेपण हे त्याच्या आचार विचारांवर आणि संस्कारांवर त्याचप्रमाणे आयुष्यात तो करीत असलेल्या मेहनतीवर ठरते असे ही कादंबरी स्पष्ट करते. या कादंबरीत दोन प्रकारची तरुणाई त्यांनी दाखवली आहे. त्यातील एका बाजूला असतो कमलनयन सारखा उदात्त विचारांचा आणि लढाऊ बाण्याचा तरुण आणि दुसऱ्या बाजूला रमेश, योगेंद्र, अक्षय कुमार यांच्यासारखे स्वार्थी आणि सुखलून तरुण. या कादंबरीतील कमला या तरुणीचे पात्र रवींद्रनाथांनी अतिशय सुरेख चितारले आहे. कमला ही स्त्रीच्या स्वाभिमानाचे आणि अस्मितेचे प्रतीक आहे. जीवनात येणाऱ्या संघर्षांचा सामना ती सहनशील-तेने करते पण त्याचबरोबर ती कमालीची आनंदी वृत्तीची आहे. आजही स्त्रियांना सामाजिक जीवनात दुय्यम स्थान देणाऱ्या पुरुषी मनोवृत्तीला ही कादंबरी खूप काही सांगून जाणारी आहे. यानंतर १९१० मध्ये त्यांनी 'गोरा' ही कादंबरी लिहिली. 'गोरा' ही रवींद्रनाथांची पाचवी कादंबरी आहे. या कादंबरीत राजकीय, सामाजिक, धार्मिक, जातीय अशा विविध विषयांवर रवींद्रनाथांनी कथेच्या माध्यमातून प्रतिकात्मक भाष्य केलेले आढळते. या कादंबरीतील जवळपास सर्वच पात्रे प्रतीकात्मक आहेत. तरीही त्यांच्यामध्ये एक प्रकारचा जिवंतपणा भरलेला आहे. ही कादंबरी म्हणजे व्यक्ती, समाज, राष्ट्र आणि धर्म यांच्या यांचे स्वरूप कसे असावे त्याचा एक आराखडा आहे. या कादंबरीला एक आधुनिक महाकाव्य म्हटले तरी चालेल एवढी तिची व्याप्ती मोठी आहे. गौरमोहन उर्फ गोरा हा या कादंबरीचा नायक आहे. गोरा हा एका आयरिश दाम्पत्याचा मुलगा आहे.

गोराची आई त्याला युद्धकाळा दरम्यान जन्म देते आणि नंतर तिचा मृत्यू होतो. त्यानंतर कृष्णदयाळ आणि आनंदमयी हे बंगाली दांपत्य त्याला मुलाप्रमाणे वाढवते आणि त्याचा सांभाळ करते. विनय हा त्याचा जिव्हाळ्याचा मित्र आहे. कृष्णदयाळ आणि आनंदमयी यांच्या शेजारी एक ब्राम्हो समाजाचे अनुयायी असलेले दांपत्य राहत असते. त्यांचे नाव परेशबाबू आणि वरदासुंदरी असे असते. या दांपत्याला लावण्या, ललिता आणि लता तीन मुली असतात. सुधीर नावाचा एक मुलगा असतो. याच कुटुंबामध्ये परेश बाबू यांच्या एका स्वर्गवासी मित्राची मुलगी सुचरिता आणि तिचा सख्खा भाऊ सतीश हे सुद्धा राहत असतात. या कुटुंबाशी विनय आणि गोरा यांचा परिचय होतो. विनय आणि गोरा यांच्या वैचारिक अधिष्ठानामुळे ललिता आणि सुचरिता त्यांच्याकडे आकर्षित होतात. त्याचप्रमाणे या कथेमध्ये हरीमोहिनी, पानुबाबू, शशिमुखी ही पात्रे देखील कथेच्या आवश्यकतेनुसार येतात. ही कथा रवींद्रनाथांनी अतिशय रंजक पद्धतीने सादर केली आहे. ती वाचकांना खिळवून ठेवते.

वरदासुंदरीला तिच्याकडे राहत असणारे सुचरिता आणि सतीश ही मुले आवडत नाहीत. परेशबाबू उदार मनाचे असतात तर वरदासुंदरी ही त्यामानाने संकुचित विचारांची आहे. त्यामुळे जेव्हा सुचरिता आणि सतीश दुसरीकडे राहायला जातात तेव्हा तिला आनंद होतो. तिला वाटते की सुचरिताने हरणबाबुशी विवाह करावा आणि ब्राह्मो समाजात यावे. याच दरम्यान गोरा परेशबाबू यांच्या कुटुंबात जात येत असतो. तो आणि सुचरिता एकमेकांकडे आकर्षित होतात. पण गोराच्या डोळ्यापुढे देशसेवेचे ध्येय असल्यामुळे तो या नात्यात पुढे जात नाही. परेशबाबू आणि वरदासुंदरीची मधली मुलगी ललिता स्वतंत्र विचाराची असते. ती विनयकडे आकर्षित होते आणि त्याच्याबरोबर समुद्र सफरीवर जाते.

विनय आणि ललिता एकमेकांशी लग्न करतात. या गोष्टीमुळे ब्राह्मो समाजात खळबळ उडते. गोरा हा कट्टर हिंदू असल्यामुळे त्याला जेव्हा ही गोष्ट कळते तेव्हा तो संतापतो, अस्वस्थ होतो परंतु नंतर या गोष्टीचा स्वीकार करतो.

कृष्णदयाळ मरताना गोराला आपल्याजवळ बोलावून घेतात आणि त्याला सांगतात की मी मेल्यानंतर तू माझे श्राध्द करू शकणार नाहीस कारण तू माझा मुलगा नाहीस. हे कळल्यावर गोराला प्रचंड धक्का बसतो आणि तो आपल्या आईला म्हणजे आनंदमयीला विचारायला जातो. मग त्याला त्याच्या जन्माची सगळी हकीगत कळते. आपण आयरीश आहोत हेही त्याला कळते आणि आनंदमयीच्या महानतेची त्याला कल्पना येते. या कथेत आनंदमयीचे पात्र रवींद्रनाथांनी फार सुंदर चितारले आहे आणि त्याला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. आनंदमयी ही भारत मातेचे प्रतिनिधित्व करते. ती मदर इंडियाची प्रतिमा आहे. सुरुवातीला कट्टर सनातनी हिंदू असलेली आनंदमयी आपल्या नंतरच्या जीवनात बदलते आणि उदार हृदयी होते सर्व धर्म, पंथ, जाती यांना समान मानू लागते. या कादंबरीत हिंदू आणि ब्राह्मो समाजाचा संघर्ष दाखवला आहे.

आनंदमयी ही हिंदू समाजाची प्रतिनिधी आणि परेशबाबू हे ब्राह्मो समाजाचे प्रतिनिधी दाखवले आहेत. यातील खलनायक हरणचंद्र बाबू उर्फ हरण हा आहे. ब्राह्मण कुटुंबात वाढलेला आणि संस्काराने हिंदू असलेला गोरा जन्माने मात्र आयरिश आहे. ब्रिटिशांनी भारतावर केलेल्या अन्यायाबद्दल त्याच्या मनात प्रचंड संताप आहे तो राष्ट्रभक्त आहे. आणि भारतमातेसाठी वाटेल ते करण्याची त्याची तयारी आहे. भारताची सामाजिक, आर्थिक प्रगती होण्यासाठी तो शर्थीने प्रयत्न करतो. त्याच्या रूपाने एका देशभक्ती करणार्या तरुणाचे तेजस्वी चित्र रवींद्रनाथांनी रेखाटले आहे परंतु ज्यावेळी गोराला आपण आयरिश असल्याचे कळते, तेव्हा मात्र तो मनाने खचतो आणि त्याचे प्रयत्न लुळे पडतात.

रवींद्रनाथांनी ही कादंबरी ज्या काळात लिहीली त्या काळात हिंदू आणि ब्राम्हो समाजात संघर्ष सुरू होता. त्याची पार्श्वभूमी या कादंबरीला आहे. त्या काळात असलेले जातीभेदाचे विष आजही लोकांच्या मनात खोलवर रुजलेले आहे. या पार्श्वभूमीवर रवींद्रनाथांनी रेखाटलेले आनंदमयीचे पात्र मात्र अद्भुत आहे. काळाच्या मानाने ती पुढचं विचार करताना दिसते. गोराला मुलगा मानून प्रचलित धर्म आणि जातव्यवस्थेच्या पलीकडे विचार करण्याची तिची क्षमता दिसते. म्हणूनच काही विचारवंतांनी या कादंबरीला आधुनिक महाभारताची उपमा दिली आहे. या कादंबरीवर चित्रपट आणि दूरदर्शन मालिकाही निघाल्या आहेत. यानंतर रवींद्रनाथांनी घरे बाहिरे, चतुरंग, शेषेर कविता, योगायोग, दुई बान, मालंच, चार अध्याय यासारख्या अनेक कादंबर्या लिहिल्या. एक कादंबरीकार म्हणून रवींद्रनाथांनी आपल्या भारतीय संस्कृतीला नवीन विचारांची आगळीवेगळी देणगी दिली, समृद्ध केले हे त्यांचे मोठे ऋण आहे.

# ग्रहसंकेत

## (रविवार, १ डिसेंबर ते शनिवार, ७ डिसेंबर २०२४)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १ डिसेंबर-** जागतिक एड्स निर्मूलन दिन, अमावास्या दुपारी ११.५१ पर्यंत, श्री सिध्दनाथ यात्रा पानीव, श्री भात्यायनी देवी महाप्रसाद कोल्हापूर, श्री वेताळदेव यात्रा इचलकरंजी, श्रीदेव लिंग खळनाथ वार्षिकोत्सव करंजे, प्रतिपदा श्राध्द अन्वाधान ✻ **सोमवार, २ डिसेंबर-** देवदीपावली, मार्तंडभैरव षड्रात्रोत्सवारंभ, मार्गशिर्ष मासारंभ, शावरसिध्द व सिलिसिध्ददेव यात्रा आचेगाव, वीरभद्र जयंती नाझरे ता. सांगोला, श्री देव ब्राम्हण जन्मोत्सव चिपी, देवी अनुभवानी यात्रा डामरे ✻ **मंगळवार, ३ डिसेंबर-** जागतिक दिव्यांग दिन, महाराजा यशवंतराव होळकर जयंती, गुरुभंडारा धारेश्वर ता. पाटण ✻ **बुधवार, ४ डिसेंबर-** भारतीय नौदल दिन, विनायक चतुर्थी, रामगिरी महाराज पुण्यतिथी, वीर विघ्नेश जन्मोत्सव रत्नागिरी, भोजलिंगदेव यात्रा जांभुळणी ता. माण ✻ **गुरुवार, ५ डिसेंबर-** विनायक चतुर्थी (नागपूर, चंद्रपूर आदी), सिध्दनाथ यात्रा मारुल-हवेली ता.पाटण, श्री देवी शर्वाणी दहिकाला अवसारी ✻ **शुक्रवार, ६ डिसेंबर-** नागपूजन, नागदिवे, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन, क्रांतिसिंह नाना पाटील पुण्यदिन ✻ **शनिवार, ७ डिसेंबर-** ध्वज दिन, चंपाषष्ठी, स्कंद षष्ठी, मार्तंड भैरवोत्थापन, खंडोबा उत्सव-निमगाव (म.) रेवडी, चिदम्बर रथोत्सव केंगरी मुरगोड (बेळगाव).

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** ३ (१७ पर्यंत), ६, ७ (१७ पर्यंत) डिसेंबर ✻ **डोहाळ जेवण-** २ डिसेंबर (१६ नंतर), ३ डिसेंबर (१७ पर्यंत), ६ डिसेंबर (१७ पर्यंत) ✻ **बारसे-** ५ (१३ नंतर) डिसेंबर, ६ डिसेंबर (१२ पर्यंत), ७ डिसेंबर (११ नंतर) ✻ **जावळ-** ६ डिसेंबर ✻ **गृहप्रवेश-** ६, ७ डिसेंबर

### मेष :- समस्या सुटत जातील

आयुष्यात पाठिंबा देणारी माणसं आपल्यासोबत असली की मनस्थिती सोबत परिस्थिती सुध्दा बदलते. धनस्थ गुरूचा बुधवारी बुधाशी होणारा प्रतियोग आर्थिक कामे यशस्वी करणारा आहे. गृहनिर्माण, कारखानदारी, विधी अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. नव्या विचारांना चालना मिळेल. शुक्रवारी सरकारी कामे करून घ्यावीत. समस्या सुटत जातील. शुभ ता. ३, ४, ७

### वृषभः- अपेक्षीत प्रगती

माणूस तेव्हाच नजरेतून उतरतो, जेव्हा आपल्याला सत्य माहित असंत. पण तरीही समोरची ती व्यक्ती तोंडावर खोटे बोलत असते. गुरू बुध प्रतियोग अंगिकृत कार्यात प्रगती करणारा आहे. अपजत कला- गुणांचा विकास होईल. चिंता करू नका. सर्व प्रतिकूलतेवर मात कराल. नव्या संधी लाभतील. शुभ कार्य घडतील. स्वःमतागृह टाळावा. अपेक्षित प्रगती साधता येईल. शुभ ता. २. ७

### मिथुनः- चिंता नको

राशी स्वामी बुधाचा गुरूशी होणारा प्रतियोग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. खर्च वाढले तरी प्राप्तीही तशीच समाधानकारक राहिल. कोणतीही जबाबदारी व्यवस्थित पार पाडू शकाल. नव्या संधी लाभतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. चिंता नको. शुभ ता. ४,७

### कर्कः- संगत पारखून घ्या

पाण्यासारखे बना, जे आपला रस्ता तयार करते, शोधते. राशीत मंगळ, आठवा शनि त्यामुळे पाण्याप्रमाणे स्वतःच मार्ग शोधावा व वाहते रहावे. अडचणी आल्या तरी थांबू नका. शिक्षणातून प्रगती होत जाईल. नव्या संधी विचाराने स्वीकाराव्यात. नवीन संगत पारखून घ्या. नाहीतर पुढे अडचणी येणार नाहीत. घाईने निर्णय घेऊ नका. शुभ ता. ४, ७

### सिंहः- अपेक्षित घटना

दुसऱ्याच्या मार्गात दगड बनून वाट अडविणे आपणासच प्रतिकुल राहते. बारावा मंगळ प्रतिकुल आहे. अनावश्यक खर्च टाळावा. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. ज्ञानदान, बॅंक, विमा क्षेत्रात अनुकूलता राहिल. नव्या संधी विचाराने स्विकाराव्यात. अपेक्षित घटना घडतील. सर्व प्रतिकलतेवर मात कराल. शुभ ता. २, ४

### कन्याः- वादाचे प्रसंग टाळावेत

ज्यांनी आपल्याशी दुर्व्यवहार केला असेल त्यांना एक दिवस पश्चाताप करावाच लागतो. तृतीयात रवि- बुधाची युती होत आहे. त्यामुळे अंगिकृत कार्यात समाधानकारक यश मिळेल. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. नव्या ओळखी पारखून स्विकारा. अडचणी कमी होत जातील. शुभ ता. ३, ७

### तुलाः- अडचणी सुटत जातील

आयुष्यातील निर्णय आपल्या आनंदावर आधारित पाहिजेत. इतरांच्या मतांवर नाहीत. राशी स्वामी शुक्र सुखस्थानी आहे. त्यामुळे कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. यांत्रिक क्षेत्रात प्रगती साधता येईल. सरकारी कामे करून घ्यावीत. नव्या कामांना गती मिळेल. अडचणी सुटत जातील. शुभ ता. ३, ६

### वृश्चिकः- सुसंधी लाभतील

दुसऱ्यांना खुष करण्यात जन्म गेला. जे खुष झाले ते आपले नव्हते पण जे आपले होते ते कधी खुष झाले नाहीत. राशीत रवि- बुधाची युती आहे. त्यामुळे अंगिकृत कार्यात मनासारखी प्रगती होत जाईल. महत्त्वाचे निर्णय पूर्ण विचाराने घ्यावेत. आत्मविश्वास वाढविणार्या घटना घडतील. सुसंधी लाभतील. लाभ उठवावा. शुभ ता. ६, ७

### धनुः- कला-गुणांचा विकास

वाटेवरून चालताना वाटेसारखे वागावे लागते. आपण सरळ असलो तरी वळणावरून वळावेच लागते. व्ययात रवि, बुध, आठवा मंगळ त्यामुळे सर्व बाबतीत विचाराने रहावे. घाईत निर्णय घेऊ नयेत. स्थावर वाद सामोपचाराने सोडवावेत. कला-गुणांचा विकास होत जाईल. चिकाटीने रहावे. प्रगती होत जाईल. अपेक्षित कामे होतील. शुभ ता. ४, ७

### मकरः- कार्यसिध्दी होईल

खुष राहणे प्रेशर कुकरपासून शिका. खाली आग लागली तरी तो शिट्टी वाजवितो. राशीत शुक्र व त्याच्या प्रतियोगात मंगळ त्यामुळे थोडी प्रतिकुलता राहिल. चिंता करू नका. चिकाटीने रहावे. कार्य सिध्द होईल. कौटुंबिक जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. अडचणीतून मार्ग निघत जाईल. सर्व प्रतिकुलतेवर मात कराल. शुभ ता. ३, ७

### कुंभः- स्पर्धांमध्ये यश

ज्यांनी आपल्याला साथ, वेळ, समर्पण दिले अशांचा नेहमी सन्मानच करावा. राशी स्वामी शनि राशीतच आहे. त्यामुळे धैर्याने प्रगतीची वाटचाल करू शकाल. नव्या कामांना गती मिळेल. अडचणी सुटत चालल्याने समाधान वाटेल. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावे. अनावश्यक खर्च कसोशीने टाळावा. स्पर्धांमध्ये यश मिळेल. शुभ ता. ७

### मीनः- उत्साहवर्धक घटना

संपत्ती बरोबर येणार नाही, असे लिहिणाराने लिहिले पण ती शेवटपर्यंत आपल्या उपयोगी पडते. हे लिहिले नाही. भाग्यात रवि- बुधाची शुक्रवारी युती होत आहे. शुक्रवारी होणारे एखादे काम आपणास या सप्ताहात आनंद मिळवून देईल. उत्साहवर्धक घटना घडतील. शुभ ता. ३, ७

!! शुभ भवतु !!

पान २ वरून

## ...रंग खाकीचे, चित्रपटातील!

नव्या सहस्रकात व त्याच्या आगे-मागे बदलत्या काळास अनुसरून, विशिष्ट ध्येयाने प्रेरित तडफदार पोलिस अधिकाऱ्यांना केंद्रभूत ठेवून काही उत्तम चित्रपटांची निर्मिती झाली. नव्या जाणिवा व संवेदनशीलता असलेले, तांत्रिक बाबतीत कुशल असलेले तरुण पोलिस अधिकारी वास्तवाचे पडद्यावर प्रस्तुतीकरण होते. २००१ साली सत-असत प्रवृत्तींचा चिरंतन संघर्ष संघर्ष पोलिस अधिकाऱ्यांच्या दृष्टिकोनातून मांडणाऱ्या अतींद्रिय शक्तींचा वावर असलेल्या, 'अक्स' चित्रपटात अमिताभ बच्चन यांनी इन्स्पेक्टर मनू वर्माच्या भूमिकेत कमाल केली होती. तर, १९९९ साली पाकपुरस्कृत दहशतवादाचा बीमोड करणारा व स्वत: दहशतवादाची झळ पोहोचलेला एसीपी अजयसिंह राठोड, आमीर खानने 'सरफरोश' चित्रपटात अतिशय तडफेने रंगवला होता. तर, भागलपूरच्या कैद्यांना अंध करण्याच्या पृष्ठभूमीवर आधारित अप्रतिम 'गंगाजल' (२००३) चित्रपटात अजय देवगणने डीएसपी अमितकुमारच्या भूमिकेत बहार उडवली होती. इन्स्पेक्टर दया नायकच्या (चकमक विशेषज्ञ) जीवनाशी साधर्म्य साधणारा इन्स्पेक्टर साधू आगाशे, नाना पाटेकर याने 'अब तक छप्पन' (२००४) चित्रपटात रंगवला होता. 'खाकी' (२००४) व 'देव' (२००४) चित्रपटात अमिताभ बच्चनने वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या भूमिका आपल्या विशिष्ट शैलीत जिवंत केल्या होत्या. 'देव' चित्रपटातील ओम पुरीची तेजिंदर खोसलाची भूमिका लक्षणीय..! पोलिस अधिकाऱ्यांना जनसामान्यात लोकप्रिय करणाऱ्या भूमिका म्हणजे 'सिंघम' चित्रपटातील अजय देवगणने साकारलेली बाजीराव सिंघम ही भूमिका, सलमान खानने साकारलेली 'दबंग' चित्रपटातील चुलबुल पांडे ही व्यक्तिरेखा, रणवीर सिंगने साकारलेली 'सिम्बा' (२०१८) चित्रपटातील संग्राम भालेराव ही पोलिसी भूमिका. 'फूल बने अंगारे' (१९९१) चित्रपटातील रेखा, 'अंधा कानून' (१९८१) चित्रपटातील हेमा मालिनी, 'दृश्यम' चित्रपटातील तब्बू यांनी पोलिस अधिकाऱ्यांच्या भूमिका साकारून 'हम भी कुछ कम नही' हे सिद्ध केले. 'तलाश' (२०१२) चित्रपटात आमीर खानने साकारलेला सृजनसिंह शेखावत, 'प्रतिज्ञा' (१९७५) चित्रपटात धर्मेंद्रने साकारलेला ठाणेदार इंदर या लक्षात राहिलेल्या काही पोलिस व्यक्तिरेखा. 'खादी'इतकीच 'खाकी'देखील समाजस्वास्थ्यासाठी महत्त्वाची आहे, हे निर्विवाद. (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

पान ४ वरून

## दारी येता पाखरे...

स्थलांतर करून येणारे पक्षी साधारणपणे दोनअडीच महिन्यांचा प्रवास करून आपल्यापर्यंत पोहोचलेले असतात. दरवर्षी स्थलांतराचा हा ताण घेणाऱ्या पक्षिगणांमध्ये मोठे पक्षी असतातच; पण काही अंगठ्याएवढे पक्षीही दिसतात. पण तो ही दरवर्षी अडीच हजार किलोमीटरचा प्रवास करून येतो.

एवढ्याच आकाराच्या आणखी दोन-तीन प्रजातींचे पक्षी आपल्याकडे आले आहेत. महाराष्ट्रात येणाऱ्या स्थलांतरित पक्ष्यांमध्ये 'फ्लेमिंगो' आहेत; त्याचबरोबर 'तुतारी' पक्षीदेखील आहेत. यातही वेगवेगळ्या उपजाती पाहायला मिळतात. 'धोबी' नावाचे पक्षीही मोठ्या संख्येने महाराष्ट्रात येतात. यातही पिवळा धोबी, पांढरा धोबी, करडा धोबी असे प्रकार असतात. 'तीरचिमणी' नावाचे पक्षी जंगलात येतात. वटवट्याचे काही प्रकार टेकडी अथवा जंगलांमध्ये थांबतात. 'थिरथिऱ्या' नावाचे पक्षी आता आपल्याकडे आले आहेत. त्यांना न्याहाळू या, त्यांचे अधिवास जपू या.



# सामान्य रोगांवर घरगुती उपचार

**५० सुक्या आणि ५० ताज्या 'वनौषधींची ओळख आणि सामान्य रोगावर त्यांचे घरगुती उपचार लोकांना दाखविले तर, आज जो प्रत्येक कुटुंबात मोठा औषध खर्च येतो तो अवश्य कमी होईल. यामुळे घरात औषधोपचार करण्याची सवय लोकांना लागेल. रोग झाल्यावर तागडतोब उपचार केल्यास पुढे ते वाढत नाही. आणि सामान्य रोग घरात किंवा जवळपास मिळणाऱ्या ऐषधीने बरा होणे शक्य आहे. वनौषधी ओळखण्याची व त्यांचा उपयोग करण्याची मात्र जरूरी आहे. आजच्या लेखात लहान मुलांच्या काही आजारांची माहिती घेऊया...**

### आजीचा बटवा

नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१



**डांग्या खोकलाः-** डांग्या खोकला यास वात कास म्हणतात. नेहमीच्या खोकल्याहून हा निराळा आहे. याची गणना साथीच्या रोगात होते. हा अत्यंत सांसर्गिक रोग आहे. एका रोग्याच्या वासाने हा दुसऱ्यास होतो. हा मुख्यत: १० वर्षाच्या आतील मुलास होतो. यात श्वास मार्गाचा दाह असतो.

खोकला आल्यावर श्वास घेताना एका प्रकारचा घुम असा आवाज येतो. म्हणूनच यास इंग्रजीत हुंगिंग कफ अकसे म्हणतात. वेळूची गाठ ज्याला डांग असे म्हणतात. ती उगाळून या खोकल्यात देतात म्हणून मराठीत यातला डांग्या खोकला असे म्हणतात.

याच्या दोन अवस्था आहेत. पहिली अवस्था आठ ते दहा दिवस असते. या मुदतीत थोडासा ताप येतो. कोरडा खोकला होतो. कफ फार नसल्यामुळे तो लवकर सुटत नाही. फार वेळ खोकावे लागल्याने जीव घाबरतो. मुलाचा चेहरा बदलतो, डोळे थोडे सुजलेले व पाण्यानी भरलेले दिसतात.

दुसरी अवस्था प्राप्त झाल्यावर खोकल्याच्या उबळीवर उबेळी येतात. उबळ आली म्हणजे खोकून खोकून कफ पडेपर्यंत किंवा उलटी होईपर्यंत जीव घाबरा होतो. डोळे लाल होतात. क्वचीत प्रसंगी नाकातून किंवा कफातून थोडे रक्त पडते. उबळ नाहिशी झाल्यावर मूल अस्वस्थ होते. ही अवस्था बरेच दिवस राहते. रोगास उतारा लागतो. त्यावेळी उबळीचे प्रमाण कमी होते. काहींना हा रोग दीड महिना असतो. कित्येकांना तीन महिन्यापासून सहा महिन्यापर्यंत असतो. वरचेवर उबळ येत असता पोटातील अन्न उलटी होऊन पडते. रोगी सत्वर अशक्त होत जातो. या विकारावर खालील उपाय करावेतः-

**उपायः** १) निखाऱ्यावर कलईची काटी ठेवून चांगली तपवावी. चांगली तापलेली वाटी निखार्यावरून उतरवून तीत वयोमानाने दोन वर्षापर्यंत अर्धा तोळा लोणी घालावे. ते विरघळून पातळ होते. यासच लोण्याची विरघळ म्हणतात. ती विरघळ रोग्यास द्यावी. खोकल्याची उबळ ८-६ दिवसात थांबते. २) वावडिंग, पुदिना, गोड ओवा, चोर ओवा हे चार जिन्नस प्रत्येकी पाव तोळा घेऊन त्यात पावशेर पाणी घालून अष्टमांड काढा उतरावा. त्यात मोहरी एवढा हिंग व हरबर्या एवढी डिकेमाली मिसळून द्यावा. ३) आस्कंदाचे सरबतः- अश्वगंधाचा काढा (अश्वगंधाच्या आठपट पाणी घालून चतुर्थांश काढा उरवाया. त्यात काढयाच्या दुप्पट साखर घालून सरबत करावे.) हे. सरबत एक-एक चमचा दिवसातून तीन-चार वेळा दयावे. ४) बकुळीच्या फुलांचे सरबतः वरीलप्रमाणे (आस्कंदाच्या सरबताप्रमाणे) तयार करावे. याचा उपयोग डांग्या खोकल्यावर चांगला होतो. एक-एक चमच्या दिवसातून तीन-चार वेळा द्यावे. ५) कळकींच्या **पाल्याचा काढाः-** याला एक तोळा हळद, ३ गुंजा व मध, १/२ तोळा एकत्र करून पाजावा किंवा कळकीची डांग पाण्यात उगाळून पाजावी. ६) शुध्द गंधक, शुध्द जेपाळ, सुंठीचे वस्त्रगाळ चुर्ण समभाग माक्याचे रसात चांगले घोटून मिश्रण झाल्यावर मिऱ्याएवळ्या गोळ्या कराव्यात. रोज एक गोळी द्यावी.

**कावीळः-** हा विकार बहुत करून अपूर्ण दिवसाचे मुलास दहा-पंधरा दिवसाचे आतच होतो. यामुळे मुलाचे डोळे, नखे, सर्वांग. मुत्र या सर्वांचा रंग पिवळा होतो. मुलास थोडेसे एरंडेल द्यावे, म्हणाजे रेच होऊन कावीळ कमी होते.

**बालग्रहः-** अजीर्ण, कोठ्यात वात संचय वगैरे कारणांनी मुलांना बालग्रहाचा झटका येतो. मुले अंगास आळोखे पिळोखे देतात. मुठी वळतात. डोळे (बुबळे) वर चढवून गरगर फिरवतात. तोंडास वेडेवाकडे करतात. दात खातात असे

झटके वरचेवर येतात. यावर वेखंडाचे सत्व मधातून द्यावे. ब्राह्मी पाल्याचा रस किंवा ब्राह्मी सरबत दिल्यासही उपयोग होतो.

**कान फुटणेः-** मुलांचे कान फुटून त्यात ठणका धरतो, त्यातून पू वाहतो. त्यामुळे मुले एकसारखी रडतात. प्रथम सारक औषध द्यावे. नंतर शक्तिवर्धक औषध द्यावे. पिचकाराने कान स्वच्छ धुवावा. कानात सतापा यांच्या पाल्याचा रस दोन थेंब घालावा. समुद्र फेसाचे चुर्ण मधात कालवून घालावे. पू व ठणका थांबतो.

**तोंड येणेः-** मुलाच्या तोंडात जीभ, टाळा, ओठ, घसा यावर फोड येतात. कोणताही पदार्थ खाताना व गिळताना त्रास होतो. जीभ व घसा सोलल्याने काहीही तोंडात घातल्यास झोंबतो त्यामुळे मुले काही खात नाहीत. यावर टाकणखाराची लाही मधातून चाटवावी. पोटात त्रिफळा द्यावा. उंबराच्या पानावरील फोड व जिरे दुधात वाटून मुलास द्यावेत.

**तापः-** अनेक कारणाने ताप येतो. त्यावर अतिविष, नागरमोथे व काकडशिंग यांचे समभाग चुर्ण, मध किंवा गाईचे दुधातून द्यावे.

**जीर्णज्वरः-** (अंगात मुरलेला बारीक ताप) गुळवेलीच्या कांड्या ठेचून पाण्यात तीन तास भिजवून गाळून घ्यावे. लहान मुलांना एक ते दोन चमचे द्यावे.

**हगवणः-** अजीर्ण, थंडी याने हा विकार मुलांना फार होतो. आमांश, पोटात मुरडा, भुक मंदावणे ही लक्षणे प्रथम अथस्थेत दिसतात. यावर वेखंड १ तोळा, धणे १ तोळा, मिरे अर्थ, तोळा यास २० तोळे पाणी घालून निम्मे आटवावे. एक ते दोन चमचे काढा साखर घालून तीन-चार वेळा द्यावे.

**जुनाट हगवणीवर :-** मायफळ उगाळून गाईच्या दुधातून द्यावे. रक्त पडत असल्यास पांढरे चंदन तांदळाच्या घुवणात उगाळून साखर मिसळून द्यावे.

**दूध न पचल्यासः-** अपचन, पोटफुगी, उलटी होणे यावर बाळंतशेपा १ तोळा, पावशेर पाण्यात १/८ काढा करून दिवसातून तीन-चार वेळा एक-एक चमचा द्यावा. दुधातून चुन्याची निवळी १/४ मिसळून दिल्यास चांगला उपयोग होतो.

**दात येणेः-** दात येताना कित्येक मुलांना फार त्रास होतो. ताप, खोकला, ओकारी, डोकेदुखी, जुलाब इत्यादी त्रास होतात. पिंपळी, घायटी चूर्ण, आवळकाठी याचे समभाग वस्त्रगाळ चूर्ण मधातून हिरड्यास चोळावी, डिकेमाली गाईचे दुधात उगाळून हिरड्यास चोळावी.

**जंतः-** गोड पदार्थ जास्त खाणे, अजीर्ण यामुळे जंताचा त्रास होतो. यामुळे ताप, अन्नद्वेष, अग्निआंद्य, भ्रम व जुलाब यांचा त्रास होतो. यावर सेंटोनाईन उत्तम उपाय आहे.

डाळिंबाच्या सालीच्या काढ्याचाही चांगला उपयोग होतो. एक-एक चमचा दिवसातुन तीन-चार वेळा खा. जंत न होण्यासाठी कडूनिंबाच्या अंतरसालीचा काढा द्यावा.

पान २ वरून

## जे का रंजले गंजले...

त्यांच्या प्रसिद्धीपराङ्मुख वृत्तीला त्याचा उल्लेख करणे योग्यही वाटले नसावे. त्यामुळे त्यांच्या परोपकारी वृत्तीसाठी महिपतबाबांनी दिलेल्या रसाळ ओव्यांचा खुलासा प्रमाण मानतात. जे का रंजले गांजले आपल्या अवतीभवती जे कोणी सुखाने रंगलेले असतील, दुःखाने गांजलेले असतील त्या सर्वांना जो 'आपले आहेत' असे म्हणतो, तोच खरा साधू आहे, असे ओळखावे आणि अशांच्या जवळच देव असतो, असे जाणावे. लोणी जसे आतून-बाहेरून मऊ असते. अगदी त्याचप्रमाणे संताचे चित्तदेखील मऊ असते. ज्यांना कोणीही आश्रय न देता झिडकारतात अशा अनाथांना ते आपल्या हृदयात स्थान देतात. जे प्रेम ते स्वतःच्या मुलांवर करतात. तशाच प्रकारचे प्रेम ते दास दासींवर करीत असतात. संत तुकोबा म्हणतात, अशांबद्दल काय सांगावे, ते साक्षात परमेश्वरच आहेत. संत तुकारामांनी प्रस्तुत अभंगातून खऱ्या साधूची ओळख पारखण्याची कसोटी सांगितली आहे. परोपकारी वृत्ती ज्याच्या अंतःकरणामध्ये भरलेली आहे. सुखाने ज्याचे हृदय उचंबळून जाते. दुःखाने ज्याचे हृदय हेलावून जाते. तोच इतरांच्या भावनेशी समरस होऊ शकतो. त्यालाच फक्त साधू समजावे व त्याच्याजवळच भगवंताचा वास असतो, असे समजावे. लहान-मोठा हा भेद न मानता पौर्णिमेचा चंद्र ज्याप्रमाणे सर्वांना सारखीच शांती देतो; अगदी त्याचप्रमाणे परोपकारी उत्तम अथवा अधम हा भाव मनात न आणता दयार्द्र अंतःकरणाने दुःखितांचे दुःख निवारण करतो. पाण्याचा स्थायिभाव स्वतःचे अस्तित्व नाहीसे करून आपल्या ओलाव्याने सुकू लागलेल्या गवताचे रक्षण करणे आहे. तद्वत सन्मुख आलेल्या पीडितांचे जो रक्षण करतो. कळवळीने श्रमपरिहार करताना जो आपले सर्वस्व देऊनही काहीच दिले नाही, असे मानतो त्यास साधू समजावे. वाहत आलेले पाणी ज्याप्रमाणे वाटेतील खळगे भरल्याशिवाय जसे पुढे जात नाही, तसेच समोर आलेल्या श्रांत, गरजू जीवाला संतोषित केल्याशिवाय तो पुढे जात नाही. पायाला काटा रुतला असता जीवाला जशी व्यथा होते, तसेच परोपकारी जीवांचेही पुढीलांचे दुःख पाहून मन कळवळते. संत तुकारामांच्या भूतदया-परोपकाराचे स्वरूप असेच होते. परंतु, त्यांच्या परोपकारी वर्तनाचे मर्म तत्कालीन समाजाला कळले नाही. त्यामुळे लोकांनी त्यांना वेड्यात काढले होते. त्याकडे तुकोबांनी कधीही लक्ष दिले नव्हते. तुकारामांनी जशी द्रव्येषना सोडली होती. त्याप्रमाणेच लोकेषणाही सोडली होती. तुकोबा माणसांचे मालक झाले नाहीत. तर, ते खऱ्या अर्थाने सर्वांभूती वास करणाऱ्या भगवंताचे सेवक झाले होते. त्यासारखे सर्वश्रेष्ठ दुसरे कोणतेही पुण्यही नाही. त्याचबरोबर निरपराधी जीवाला अनाठायी दुःख देणे हे मोठे पाप समजावे. नीतिशास्त्राच्या दृष्टीने या पाप-पुण्याला कशाचीही जोड नाही. वेदविहित सत्य धर्माचे आचरण हाच खरा स्वधर्म आणि असत्य धर्माचे आचरण हा अधर्म मानावा, असा उल्लेख पूर्वमीमांसाशास्त्रात आहे. सर्व धर्मांचे सार हेच आहे. हरिनाम चिंतन हाच इह-परलोकी सद्‌गतीचा मार्ग आहे. हरिनामाला विन्मुखता ही अधोगती समजावी, असा मुक्तिशास्त्राचा सिद्धांत आहे.

पान ५ वरून

## आमची योग्यता आम्हाला कळाली...

नाटकाच्या वेळेपर्यंत पोहचते. मी त्याच्या चेहऱ्याकडे न पहाता, एका सेवकाला त्वरित सांगुण समोर दोन खुर्च्यांची व्यवस्था केली. त्याची बायको आणि सासू समोर बसल्या. याने पहिला प्रवेश केला. सासू समोर दिसताच याच्या तोंडून संवाद बाहेर पडतच नव्हता. हा आत आल्यावर मला म्हणाला, माझी सासू बायकोसोबत समोर कशी? मी म्हणालो, अरे तूच तर सांगितले होते ना मला. तो म्हणाला, अहो मी माझी अडचण सांगितली, तुम्ही तर माझी अडचण आणखीच वाढवली. यावर मी मनसोक्त हसलो. तसा तो आणखीच गर्भगळीत झाला. त्यावर देशपांडेसाहेब तुमची अशी कोटी. आता नेमके त्याचे काय झाले असेलं? त्यावर पुलं म्हणाले, आता काहिही झाले असले तरी त्याची चिंता तुम्ही कशाला करता! जे काही होईलं ते तुम्हाला यथावकाश कळेलचं. यावर नाटकाचे आयोजक पुन्हा मनसोक्त हसले. पारंपारिक पद्धतीने विवाह जुळवतांना काही लोक कुळ, गोत्र, नाडं, जुळनारे गुण किती? याची खूपच बारीकसारिक चौकशी करत होते. अद्यापही काही ठिकाणी ते चालते, पण प्रेम विवाह म्हटल्यावर बऱ्याच गोष्टी माफ असतात. काही झाले तरी जुळवणेच महत्वाचे. तसे ते जुळलेलेच असते. पण शेवटी ते आम्ही कसे जुळविले. जुळवून मुळीच घेतले नाही. हा त्यातला प्रेस्टीज पॉईंट. पुढे आईवडिलही अभिमानाने सांगतात, आमची तशी परवानगी होतीचं. आमची मुलगी काय आमच्या शब्दाबाहेर थोडीचं आहे. वगैरे, वगैरे....असाच एक प्रेमविवाह बेळगावचे मराठे आणि मिरजेचे मराठे यांच्यातला. प्रेमविवाह असल्यामुळे सर्व शास्त्र अगदी बाजूला. या लग्नाची निमंत्रण पत्रिका पुलंना आली. पुलंनी शुभेच्छा पत्र लिहिले. आपले आमंत्रण मिळाले. आनंद झाला. लग्नास येवू शकत नाही. वधूवरांना शुभाशीर्वाद. बाकी मुलींनं घराण्याच नाव राखलं हो. असं म्हणून शेवटी घेतलेला चिमटा फार लक्षात ठेवण्यासारखा. पूर्वी लकडी पुलावरुन स्मशानभूमीत जळणारी प्रेतं दिसायची. दुरवरुन ह्या दिसणाऱ्या ज्वाळा कशाच्या? हा प्रश्न नेहमीच अनेकांना पडायचा. त्या वेळी चित्रपट दिग्दर्शक दत्ता धर्माधिकारी यांचे चित्रपट खूप चालायचे. मायमावल्या त्यांच्या चित्रपटास गर्दी करुन दत्ताजींच्या पदरात भरभरुन दानं टाकायच्या. त्यात त्यांना रडवणारे मृत्यूप्रसंग भरपूर असायचे. एखाद्या महान साहित्यिकाची प्रस्तावना आपल्याला मिळाल्यास आपण लगेच महान साहित्यिक होवू, त्यामुळे साहित्य वर्तुळातील मोठ्या साहित्यिकांची प्रस्तावना घेण्याची आज चढओढ लागलेली दिसते. आपल्या साहित्याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन आपण करु शकत नसलो तरी आपले साहित्य सुरुवातीला किती मोठ्या साहित्यिकाकडे घेवून जावं, याची किमान समज आपल्याला असली पाहिजे. ते तारतम्य बहुतेक नवोदित गमावून बसल्यामुळे अशा फसगतीला त्यांना समोर जावे लागते. ते स्वत:ला ओळखायला शिकतील तेव्हा त्यांची योग्यता त्यांना कळेलं आणि त्यांच्या प्रगतीला सुरुवात होईलं, असे मला वाटते.

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# जीवनात पाऊल टाकताना !

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २४३



तसे तर आपण सर्वजण आईच्या गर्भातून बाहेर येताना जीवनात पाऊल टाकतो. पण सुरुवातीच्या काळात पालक, शिक्षक, स्वजन यांच्या सावलीत ती वाढ असते. सगळीकडे संरक्षक कुंपणे, अडचण आलीच की मदतीचे हात, सर्वप्रकारचे (आर्थिक, कौटुंबिक, सामाजिक, बौद्धिक) पाठबळ आणि दुःखद प्रसंगी आपल्या व्यक्तींचे खांदे! मोठं लोभस आणि सुरक्षित, निर्धास्त जीवन असतं सुरुवातीला. रोटी, कपडा, मकान या मूलभूत गरजाच नव्हे तर शिक्षण, प्रवास, करमणूक यासारख्या परिघावरच्या गरजाही पुरवायला पालक आणि नातेवाईक असतातच. मुळात जे जे आवश्यक असते ते ते मिळत जाते- मागून, न मागता ! बरेचदा ते कष्टार्जित नसल्याने त्याची फारशी मातब्बरी वाटत नाही. काहींना तर ते वंशपरंपरागत हक्काचे वाटते.

वयाची वाटचाल शाळेकडून महाविद्यालयाकडे सुरु झाली की थंडगार सावलीतून बाहेर उन्हाच्या झळांची सुरुवात जाणवायला लागते. मनाविरुद्ध व्हायला सुरुवात होते, क्वचित काही गोष्टी लादल्या जातात. नेहेमीचे अग्रक्रम क्वचित नाकारले जातात. प्रसंगोपात्त गृहीत धरलेले विशेषाधिकार, मक्तेदारी, सवलती मिळतातच असे नाही. महत्वाचे म्हणजे तू आता मोठा झालाय/ झाली आहेस अशा वाक्यांची पेरणी केव्हातरी कुबड्या काढून घेते आणि आता मर्यादित अर्थाने का होईना, स्वबळावर वाटचाल सुरु करा अशी जाणीव करून दिली जाते. हे अवलंबित्व टप्प्याटप्प्याने काढून घेतले जात असताना स्वतःची वाट तुडवायला सुरुवात करावी असे सूचक इशारे मिळायला लागतात. मी काय तुला आयुष्यभर पुरणार आहे कां असे भावनिक आवाहन असतेच मध्ये मध्ये दोर कापण्यास समर्थ!

खरं तर इथेच हाथ छुटे भी तो रिश्ते नहीं छूटा करते असं आश्वासक वर्तन पालकांकडून अभिप्रेत असते, पण अर्धकच्च्या अवस्थेत पाण्यात सोडले जाते. म्हणूनच औपचारिक शालेय/महाविद्यालयीन शिक्षण संपल्यावर खऱ्या अर्थाने आयुष्यात पाऊल टाकताना पदवीदान समारंभ (दीक्षांत विधी) आयोजित केला जातो. पाश्चात्य देशांमध्ये याला ग्रॅज्युएशन सेरेमनी म्हणतात. आणि तिथूनच अनौपचारिक शिक्षणाला सुरुवात होते. चार भिंतींबाहेरचे अभ्यासक्रम सुरु होतात. छापील पुस्तके नाहीत, फळा-खडू नाहीत, शिक्षक नाहीत, परीक्षेचे स्वरूप माहित नाही, नक्कल करणे शक्य नाही कारण प्रत्येकाच्या वाट्याला येणारी प्रश्नपत्रिका वेगळी. सुरुवातीला भांबावून जायला नक्कीच होतं, नाकातोंडात पाणी गेल्यावर गुदमरायला होतं. सगळ्यांच्या वाट्याला कमी अधिक फरकाने हीच परिस्थिती येते. त्यांतून सावरणे, डोळ्यांवरची झापडं दूर करीत आयुष्य आहे तसे स्वीकारणे यात सकारात्मकतेचा फार मोठा वाटा असतो.

स्वतःच्या समजांना, गैरसमजूतींना ठामपणे आव्हान देत आपल्यापुरते प्रकाशमार्ग शोधणे हेच आपल्या हाती असते. अशावेळी जीवनाचे धडे शिकताना नवीन पिढीची गरज, विचारधारा आणि दृष्टिकोन महत्वाचे ठरतात. त्यांच्यासमोर व्यक्तिगत आणि व्यावसायिक जीवनात कोणते आदर्श असतात याची जाणीव महत्वाची ठरते. तरुण मंडळी शिक्षण संपल्यावर कारकिर्दीची सुरुवात करण्याकडे कल असताना साहजिकच पगार (आर्थिक आघाडी), पद (सामाजिक स्तर) आणि जीवनमान हे त्यांचे अग्रक्रम असतात. शिक्षण संपल्यावर पुढे आयुष्याची ३०-४० वर्षे हातात असतात आणि त्याची स्वप्ने डोळ्यात असताना भावी नियोजन करणे हेही तितकेच महत्वाचे असते. चित्रपटाच्या/नाटकाच्या भाषेत याचे वर्णन संहिता ते पडदा / रंगमंच हा प्रवास असे करता येईल.

### त्यासाठी काही मार्गदर्शक तत्वे -

#### (१) नीतिमूल्ये -

आयुष्यात आपल्यासाठी सर्वात महत्वाचे काय असते? प्रश्न सोपा वाटतो पण त्याचे उत्तर सहजी सापडणार नाही. अंतःकरणात खोलवर जपलेली तत्वे ज्यांना उमगली आहेत त्यांनाच ही नीतिमूल्ये स्पष्ट शब्दांत उलगडून दाखविणे शक्य आहे. यांची यादी तयार करून सतत नजरेला दिसेल अशी ठेवली तर त्यांचा विसर पडणे शक्य नाही. वयाच्या अलीकडील टप्प्यावर हे दस्तावेजीकरण करून ठेवणे गरजेचे असते. म्हणजे तिशीत काय साध्य करायचे आहे, चाळीशीत डोळ्यांसमोर काय ध्येय आहे, पन्नाशीच्या आसपास कशावर समाधान मानायचे, साठी गाठल्यावर आणि औपचारिक सेवानिवृत्ती जवळ येऊन ठेपल्यावर अजून किती उडान बाकी आहे याचा मागोवा घ्यायचा या सगळ्या प्रवासात नीतिमूल्यांचे गाठोडे अत्यावश्यक.

वरील मैलांच्या दगडांपाशी पोहोचल्यावर यशापयशाचा लेखाजोखाही तितकाच प्रेरणादायी असावा. कर्तृत्व मोजायचे निकष साधारणपणे समाजाने ठरविलेले असतात- चारचाकी गाडी, पाच किंवा सहा आकडी मासिक वेतन, स्वतःचे घर इत्यादी इत्यादी सुखवस्तू चित्रे मोजमापासाठी समाज मांडून ठेवतो. पण या ऐहिक क्षेत्रांपलीकडील मापदंड म्हणजे पद, जबाबदाऱ्या समर्थपणे हाताळणे, विविध क्षेत्रांमध्ये नेत्रदीपक यश मिळविणे असेही आपली ओळख ठरतात. एखादी साहित्यिक व्यक्ती अभिमानाने प्रकाशित झालेल्या पुस्तकांची यादी सांगते, एकदा कलावंत किती चित्रपट/नाटकांमध्ये भूमिका बजावल्या किंवा दिग्दर्शन केले याचा पुरावा सादर करतो, कोणी एक मिळालेल्या राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवांकित झालेला असतो वगैरे वगैरे! कर्तृत्व कोठल्याही क्षेत्रात गाजविता येते, फक्त डोळ्यांसमोर सुस्पष्ट हेतू असावेत. मग परिचय पत्र (बायोडाटा) भरून जातो.

अर्थात येथे कर्तृत्वाची व्याख्याही समजून घेतली पाहिजे, कारण ती कालसापेक्ष असते. भूतकाळातील गाजवलेले क्षण भविष्यातही रस्ता प्रकाशित करतीलच असे नाही. उदा.- मानव संसाधन विकास क्षेत्रातील वरिष्ठ पदाच्या मुलाखतीत समजा प्रश्न विचारला- तुम्ही आजपर्यंत काय कमावलंय, ज्याचं तुम्हाला वर्णन करता येईल, ज्याचा तुम्हांला अभिमान वाटतोय? एक उमेदवार उत्तर देईल- आजपर्यंत मी दहा संप / टाळेबंदी यशस्वीपणे हाताळले आहेत. त्याच्या दृष्टीने हे नक्कीच दैदिप्यमान आणि अभिमानस्पद आहे. दुसरा उमेदवार सांगेल- गेल्या वीस वर्षांच्या माझ्या कारकिर्दीत मी एकदाही कामगार संघटनेला संप/काम बंद अथवा टाळेबंदी अशी वेळच येऊ दिलेली नाहीए. अशावेळी स्वाभाविकपणे दुसऱ्या उमेदवाराची निवड केली जाईल. आजच्या जगात संप/ मोर्चे/ कामगार चळवळी अस्तंगत होत चाललेल्या असताना जी व्यक्ती कामाचा/ उत्पादकतेचा एकही तास वाया जाऊ नये यावर कटाक्षाने भर देत संबंधही चांगले राखते तीच अधिक योग्य ठरते. मग जीवनाला अधिष्ठान देणारी ही नीतिमूल्ये कोणती? सोप्प्या शब्दात सांगायचे तर ज्या तत्वांशी आपण तडजोड करणेच शक्य नाही, जी प्राणतत्वे खंबीरपणे आपल्या महत्वाच्या निर्णयांच्या पाठीशी असतात. आपल्या तत्वांशी तडजोड न करता आपण काहीही कार्य केले तर आपल्याला ऊर्जा लाभते. याउलट तडजोड केली, मूल्ये पायदळी तुडविली तर आपण शिणतो, स्वतःच्या नजरेतून उतरतो आणि वाळीत टाकले जाऊ शकतो. लोकांचा आपल्यावरील विश्वास उडतो. काही हवंय म्हणून आपण मूल्ये जपत नसतो, तर ती आपली ओळख असते. आपण नेहमी कसे असतो याची ती पोचपावती, खूणगाठ असते. ही मूल्ये आपल्यासाठी ग्लोबल पोझिशनींग सिस्टिम (जीपी एस ) चे काम करतात.

आपल्या नीतिमूल्यांचा परिचय हाच जीवनातील क्रांतिकारी क्षण असतो कारण त्यांच्या अनुषंगाने भावी वाटचाल केली तर रस्ता चुकण्याचे भय उरत नाही. विशेषतः आयुष्यातील तीन महत्वाच्या निर्णयांचा हा पाया असतो-

(अ) जोडीदाराची निवड
(ब) व्यवसाय अथवा अर्थार्जनाची वाट
(क) आपला भवताल आणि आसपासची मंडळी

हे जुळून आले की समजावे आपण मूल्यांच्या वाटेवरून योग्य दिशेने निघालोय. नंतर यांच्याशी कदापि तडजोड करू नये. भलेही तो पर्याय सोपा, सुलभ, आकर्षक वाटत असेल तरीही. सतत बदलणाऱ्या परिप्रेक्ष्यात समूहाच्या मागे धावणे सोप्पे वाटते खरे पण त्यामुळे निर्णयांचा स्थिर पाया मात्र डळमळीत होऊ शकतो. नीतिमूल्ये आपल्यासाठी होकायंत्र असावे, बदलांच्या वादळात सांभाळून घेणारे शीड असावे आणि प्रामाणिकपणे पथदर्शी असावीत. भलेही एकटे पडलो तरीही निवडलेल्या मूल्यांचे बोट सोडू नये.

**(२) उपजीविकेसाठीच्या अर्थार्जनाआधी अध्ययन-** तारुण्यात प्रवेश करताना वेतन कमी असते आणि सुरुवातीला कितीही कर्तबगारी दाखविली तरीही कौतुक वाट्याला येत नाही. मग उतावीळपणे नोकरी बदलण्याची उबळ येऊ शकते. वरचे पद, जास्त पैसे यांची प्रलोभने वाटेवर ठायीठायी असतात. विशेषतः काही मित्रांना या मार्गाने जाऊन तात्कालिक लाभ झाले असतील तर अशी हाव सुटणे स्वाभाविक असते. ही थोड्या अंतराची स्प्रिंट नसून दीर्घपल्लयाची मॅरेथॉन असते. सत्य हेच असते, विशीत असताना आपण जे अध्ययन करतो, तेच आपल्या अंतिम यशस्वितेची व्याख्या करते. त्या वयात विकसित केलेली नाती दूरवर सोबत करतात. म्हणून रोख कमाईच्या मागे धावू नये. वयाच्या एका टप्प्यानंतर पैसे आपल्यामागे धावतात.

आसपास दिसणाऱ्या यशस्वी लोकांच्या कारकिर्दीचा मागोवा घेतला तर दिसून येते, त्यांनी सुरवातीच्या काळात आपल्या क्षमता विकसित केल्या आणि नंतर ते विषय तज्ञ झाले. नामांकित संस्थांमध्ये अनुभव घेणे, चांगले प्रशिक्षण मिळविणे आणि परिपूर्ण मार्गदर्शकांबरोबर काम करणे ही यशस्वी माणसांची त्रिसूत्री असते. पद, पैसे, सन्मान हे आपोआप मिळत जाते. तेथे संयम आवश्यक कारण काही गोष्टी उशिरा वाट्याला येतात. एक मात्र सत्य आहे- आयुष्य ठरविणाऱ्या, प्रवाहांचे ओघ वळविणाऱ्या सगळ्याच घटना विशीत संभवत नाहीत. आयुष्य लॉटरी नसते म्हणून तिथे पैजा लावणे व्यर्थ असते. विशीत असताना गुंतवून ठेवणारे, विकसित करणारे, प्रेरणादायी काम शोधावे. संभवतः त्यात आनंद सामावलेला असतोच. पण सदासर्वकाळ ती अपेक्षाही धरणे व्यर्थ. आपल्याला अधिक चांगले करणारे वरिष्ठ, वातावरण शोधावे आणि तेथे आपल्या क्षमतांना घासून पुसून धारदार करावे. चांगले प्रशिक्षणाचे कार्यक्रम आणि चांगले प्रशिक्षक शोधावेत आणि त्यांच्या हाती स्वतःला सुपूर्द करावे. इतरांना मिळतेय तितके किंवा स्वतःच्या अपेक्षेइतके वेतन मिळायलाच हवे हा अट्टाहास सोडावा. शिकण्यावर आणि स्वतःच्या विषयातील अपरिहार्य तज्ञ बनण्याचे स्वप्न बघावे. मग आपले मोल वाढते आणि यथावकाश भरपूर वेतन मिळते. फक्त त्यासाठी उतावीळपणा ऐवजी संयम आणि दीर्घकालीन उद्दिष्ट्य बाळगावे.

#### (३) संघर्षाचा सन्मान -

आपण सगळेच कष्टाळू, बुद्धिमान असतो. आपल्यापैकी काहीजण असंख्य अडचणींचा सामना करून यशस्वी झालेले असतात. वास्तव जीवनात वाट्याला येणारं सगळं सोपं नसतं. पदोपदी परीक्षा घेतल्या जातात, प्रश्नपत्रिका अवघड असतात, तयारी कमी झालेली असू शकते, अभ्यासक्रमाच्या बाहेरचे विचारले जाऊ शकते आणि यासाठी तैय्यार असावे लागते. ज़िंदगी हर कदम इक नई जंग हैं या ओळी मनात सतत ठेवाव्या लागतात आणि शांत डोक्याने परिस्थितीला सामोरे जावे लागते, हाताळावे लागते. त्याशिवाय स्वतःचीच ओळख पूर्णपणे होऊ शकत नाही. मनुष्य हा क्षमतांचे गाठोडे असतो असं मानले जाते पण बऱ्याच क्षमता आपल्या अंगी आहेत हेच माहित नसल्याने पटकन शरणागतीचा पांढरा झेंडा हाती घेतला जातो. प्रयत्न न करताच हे मला जमणार नाही असे जाहीर करणे म्हणजे स्वतःवरील अविश्वास. पालक-शिक्षक आपल्या अपेक्षांनुसार मार्गदर्शन करतातच असे नसते. आपल्यासाठी मार्ग तयार करणे यापेक्षा मार्गासाठी आपल्याला तयार करणे हे महत्वाचे. काम किंवा दैनंदिन जीवन काहीवेळा असह्य होऊ शकते. फक्त आव्हान आहे म्हणून ते सोडून देणे याचा अर्थ माझ्या मनासारखं नाही म्हणून मैदान सोडणे असा होतो. खडतरपणा वाट्याला येतो कारण संघर्ष हा माणसाच्या विकासाचा टप्पा असतो. त्या सगळ्या प्रसंगी आतमधील स्थितिस्थापकत्व जपून ठेवणे हेच श्रेयस्कर. एखादी गोष्ट प्रयत्न करण्याजोगी नाही हे पटल्यावरच सोडून द्यावी अन्यथा पाठपुरावा सुरूच ठेवावा. सर्वात मोठ्या निराशेच्या क्षणानंतर कर्तृत्वाचे दिवे झळाळून निघत असतात. स्थितिस्थापकत्व नैसर्गिक असलं तरीही ते सुप्तावस्थेत असतं आणि त्याला ललकारावं लागतं. त्यासाठी पहिलं म्हणजे शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त असणे. नियमित व्यायामाने ताणतणाव कमी होतात, मूड सुधारतो, ऊर्जा वाढते आणि निद्रेची गुणवत्ता सुधारते.

**दुसरे -** असुविधाजनक अवस्थेत स्वतःला ठेवणे शिकायला हवे. दरवेळी नियमित काम करतानाही प्रयोग करावेत, वेगळा मार्ग चोखाळावा. भाषा वेगळी असेल, जवळ नकाशा नसेल अशा प्रदेशात कधीमधी जाऊन स्वतःला चाचपावे.

श्रोत्यांसमोर बोलण्याची संधी मिळाली तर ती सोडू नये आणि निर्धास्तपणे मतप्रदर्शन करावे. व्यासपीठावर जाऊन बोलण्याची भीती कमी करावी. आव्हाने स्वीकारून, अपरिचित परिस्थिती /व्यक्ती यांना हाताळावे. मनोभूमी आणि एकाग्रता हा शेवटचा टप्पा. नवं सत्य, नवं वास्तव, नवी परिस्थिती मान्य करावी, भलेही ती आधीच्या परिस्थितीपेक्षा कमअस्सल असली तरीही. हेही दिवस जातील या सत्यावरील समजूत अढळ ठेवावी.

आपल्या नियंत्रणात काय आहे आणि काय आपण बदलू शकत नाही हे जाणले की ऊर्जेचा स्रोत कोठे वळवावा याचे मार्गदर्शन आपोआप होते. प्रगतीसाठी दमदार पण मोजून पावले टाकावीत.

**(४) पश्चात्ताप टाळणे -** पश्चात्ताप हा नकारात्मक व्यक्तिमत्वाचा दागिना असतो. तो जुन्या निर्णयाविरुद्ध मानसिकता घडवितो आणि त्याचवेळी भावी कृतींसाठी प्रेरणाही ठरतो. आयुष्याच्या अंतःकाळी आपण केलेल्या कृतींपेक्षा न केलेल्या कृतींबद्दल अधिक हळहळतो. काही उदाहरणे-

**न सुरु केलेला व्यवसाय**

कुटुंबीय अथवा मित्रपरिवारासमवेत न केलेली सहल भीतीपोटी स्वजनांशी न साधलेले/ टाळलेले संवाद नावडत्या व्यक्तीला तिच्या तोंडावर न सांगणे दरवेळी निर्णय बरोबरच असतील असे नाही, शोधत असलेली उत्तरे सापडतीलच असे नाही पण म्हणून माघार घेणे अयोग्यच. समोर आलेल्या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा मग पश्चात्तापाला कमी वाव मिळतो. मागे वळून बघायलाही फुरसत मिळत नाही. संधी बरेचदा अनपेक्षितपणे येते म्हणून सदैव तयार असणे हे भले.

**सरतेशेवटी -**

प्रत्येक गोष्ट आपण जशी करतो तशीच हरेक गोष्ट करीत असतो.

विश्वसंचार
मल्हार कृष्ण गोखले

# रशियाच्या हाकेला उत्तर कोरिया धावला



तत्कालीन सोव्हिएत राष्ट्राध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह हे १९५५ साली भारताच्या दौऱ्यावर आले होते. त्यावेळी तिबेटच्या प्रश्नावरून भारत आणि चीन यांच्यात खूपच तणाव निर्माण झाला होता. भारत आणि चीन यांच्या सरहद्दींच्या दरम्यान असलेला तिबेट हा स्वायत्त प्रदेश चीनने गिळला होता. त्या मुद्यावरून विरोधी पक्षांनी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांना धारेवर धरले होते. तसे पंडित नेहरू कुणाला घाबरत नव्हते. कारण १९५२ च्या स्वतंत्र भारताच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्ष प्रचंड बहुमताने सत्तारूढ झालेला होता.

स्वतः पंडित नेहरूंची वैयक्तिक लोकप्रियता केवळ अफाट होती. त्यामुळेच त्यांना जराही विरोध सहन होत असे. बहुधा याचा उल्लेख त्यांनी क्रुश्चेव्ह यांच्याकडे केला असावा. त्यामुळे भारत भेटीवर आलेल्या क्रुश्चेव्ह यांनी जाहीरपणे उद्‌गार काढले की, ''तुम्ही कसलीही काळजी करू नका. सोव्हिएत संघ तुमचा मित्र आहे. या हिमालयाच्या शिखरावर उभे राहा आणि आम्हाला हाक मारा. आम्ही तुमच्या मदतीला धावून येऊ.'' ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनने आकस्मिकपणे भारतावर आक्रमण केले. साहजिकच भारताने सोव्हिएत रशियाला हाक घातली. क्रुश्चेव्ह यांनी मदतीला न येता उलट आपली अलिप्तता घोषित केली. यावर त्यांना त्यांच्या १९५५ सालच्या भरघोस भावनिक घोषणेची आठवण करून देण्यात आली. राजकारणी आणि त्यातही साम्यवादी राजकारणी किती बिलंदर असतात पहा. क्रुश्चेव्ह भारतीय प्रतिनिधीला उत्तरादाखल म्हणाले, ''आम्ही तुमचे मित्र आहोतच, पण चीन आमचा भाऊ आहे.'' आता भारताचा नाईलाज झाला. भांडवलशाही देश, शोषण करणारा देश वगैरे गाळीव शिव्या देऊन ज्या अमेरिकेचा रात्रंदिवस उद्धार करण्यात काँग्रेसवाल्यांना ब्रह्मानंद होत असे, त्याच अमेरिकेसमोर मदतीसाठी तोंड वेंगाडण्याची पाळी आली.

अमेरिकेने तत्परतेने भारताला मदत केली. शस्त्रास्त्रे, अन्नधान्य, यंत्रसामग्री, शस्त्रांचे आणि यंत्रांचे सुटे भाग अशी ही मदत होती. याचा अर्थ तत्कालीन अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडी हे मोठे दयाळू, प्रेमळू, कनवाळू वगैरे होते, असा गैरअर्थ कुणी काढू नये. चीन हा उघडच साम्यवादी म्हणजे अमेरिकेचा शत्रू होता. तर भारत, कसा का असेना, लोकशाही देश होता. भारताचा पराभव होऊन तो दुर्बळ होणे आणि चीन विजयी होऊन सबळ होणे, हे अमेरिकेच्या जागतिक सत्ताकारणाच्या दृष्टीने अनुकूल नव्हते. म्हणजे कोंबड्यांच्या झुंजीत कोणताही कोंबडा मरता कामा नये. त्यांनी थोडा दम खाऊन, पुन्हा शक्ती कमावून पुन्हा झुंजले पाहिजे. झुंजत राहिले पाहिजे. त्यामुळेच ही मदत फुकट दिलेली नव्हती. फक्त सवलतीच्या दरात आणि सावकाशीने तिची परतफेड करायची होती.

१९६३ पासून पुढे जवळ-जवळ १९७० पर्यंत भारतातले लोक 'मिलो' नावाचा लाल रंगाचा अमेरिकन गहू खात होते. हा निकृष्ट प्रतीचा गहू अमेरिकेत माणसे खात नाहीत, तर डुकरांना खायला घालण्यात येतो. मदतीच्या हाकेला धावण्याची अशी एकेक गंमत असते.

असो. तर, उत्तर कोरिया या साम्यवादी देशाचा हुकूमशहा किम जाँग उन याने आपल्या १० हजार सैनिकांची एक तुकडी रशियाच्या मदतीला युक्रेनमध्ये धाडली आहे. हे सैनिक युक्रेनमध्ये पोहोचले असून लवकरच ते प्रत्यक्ष 'ॲक्शन'मध्ये सहभागी होतील, अशा बातम्या आहेत.

आता गंमत पहा हं! रशिया हा एक अवाढव्य देश आहे. आशिया आणि युरोप हा दोन्ही खंडांमध्ये अफाट पसरलेल्या या देशाचे एकूण क्षेत्रफळ आहे सुमारे १ कोटी ७० लाख चौरस कि.मी. लोकसंख्या आहे सुमारे १४ कोटी ३८ लक्ष आणि सैन्य आहे सुमारे २० लक्ष तर उत्तर कोरियाचे क्षेत्रफळ आहे सुमारे १ लाख २० हजार चौरस कि.मी. लोकसंख्या आहे सुमारे २ कोटी ६२ लाख आणि सैन्य आहे सुमारे १० लाख. थोडक्यात, उत्तर कोरिया हा रशियाच्या एखाद्या प्रांतापेक्षा, नव्हे जिल्ह्यापेक्षाही लहान आहे. अशा स्थितीत रशियाच्या मदतीला उत्तर कोरिया धावला, असे म्हणणे हास्यास्पद आहे; प्रत्यक्षात ते तसे नाही. कारण जेमतेम दोनअडीच कोटी लोकसंख्येचा हा देश १० लाखांचे सैन्य सज्ज ठेवतो; एवढेच नव्हे तर तो अण्वस्त्रसंपन्न आहे आणि सतत नवनव्या लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी करून तो त्याचा शिवशेजारी देश दक्षिण कोरिया नि समुद्रापलीकडचा शेजारी देश जपान यांना धमक्या देत असतो. म्हणजेच अप्रत्यक्षपणे या धमक्या अमेरिकेला असतात. आता युक्रेन युद्धात अमेरिका आणि तिचे मित्र देश युक्रेनला मदत करत आहेत. रशियात आता साम्यवादी

राजवट नाही. त्यामुळे आणि अन्यही कारणांमुळे चीन निदान उघडपणे तरी रशियाला मदत करत नाही. अशा स्थितीत अण्वस्त्र सज्ज उत्तर कोरियाने रशियाला मदत करण्यासाठी रणभूमीवर सैनिक उतरवणे हे एक प्रकारे तिसऱ्या जागतिक महायुद्धाचे संकेत असू शकतात. जर्मनी हा देश साधारणपणे युरोप खंडाच्या मध्यावर आहे. १९४५ साली हिटलरच्या जर्मन फौजांनी व्यापलेला एक-एक युरोपीय देश मुक्त करायला सुरुवात झाली. पश्चिमेकडून अँग्लो-अमेरिकन सेना आणि पूर्वेकडून सोव्हिएत सेना पुढे-पुढे घुसत, एक-एक व्याप्त देश मुक्त करत अखेर खुद्द जर्मन प्रदेशातच एकमेकींसमोर उभ्या राहिल्या. त्यामुळे अँग्लो-अमेरिकेच्या प्रभावाखालचा पश्चिम जर्मनी आणि सोव्हिएत प्रभावाखालचा पूर्व जर्मनी अशी जर्मनीची उभी फाळणी झाली.

कोरिया हे एक द्वीपकल्प आहे. तुम्ही शाळेतल्या भूगोलात कदाचित एक गोष्ट पाठ केली असेल- बाल्टिक समुद्रावरच्या सेंट पीटर्सबर्ग उर्फ लेनिनग्राडवरून ट्रान्स सैबेरियन रेल्वे सुरू होते आणि सुमारे १० हजार कि.मी. अंतर

तोंडून ती जपानच्या समुद्रावरील व्हलाडीवोस्टॉक या प्रसिद्ध बंदरात समाप्त होते. तर, या व्हलाडीवोस्टॉक शहराजवळ चीन, रशिया आणि कोरिया या तीन देशांच्या सरहद्दी एकमेकींना भिडतात. दुसऱ्या महायुद्धात जर्मनीचा दोस्त असलेल्या जपानने संपूर्ण कोरिया देशासह पॅसिफिक महासागरातला फार मोठा प्रदेश व्यापला होता. जनरल डग्लस मॅक्आर्थर या प्रसिद्ध सेनापतीच्या नेतृत्वाखाली अमेरिकन नौदल आणि भूदल यांनी जपानविरुद्ध प्रचंड प्रतिचढाई सुरू केली. कोरियन द्वीपकल्प सामरिकदृष्ट्या महत्त्वाचे; शिवाय ते रशियाच्या भूमीला जोडलेले आहे, हे लक्षात घेऊन रशियानेही कोरियावर प्रतिचढाई सुरू केली. त्यामुळे कोरियाचा दक्षिण भाग अमेरिकेच्या ताब्यात आला तर उत्तर भाग रशियाच्या ताब्यात राहिला. म्हणजे कोरियाची आडवी फाळणी झाली. दक्षिण कोरियामध्ये अमेरिकेने लोकशाही व्यवस्था आणली. त्यामुळे निवडणुका होत राहिल्या. सरकारे बदलत राहिली. जपानप्रमाणेच दक्षिण कोरिया या अमेरिकेच्या मित्राने विज्ञान-तंत्रज्ञानात खूप प्रगती केली. १९८८ साली दक्षिण कोरियाची राजधानी सेऊल शहराने ऑलिम्पिक स्पर्धांचे

यजमानपद भूषविले. उत्तर कोरियात १९४८ साली सोव्हिएत प्रभावाखालचा राष्ट्राध्यक्ष किम इल सुंग याची राजवट जी एकदा सुरू झाली, ती थेट १९९४ साली त्याच्या मृत्यूनेच संपली. ४६ वर्षांच्या प्रदीर्घ हुकूमशाहीत उत्तर कोरियाने लष्करी विज्ञान तंत्रज्ञानात भरपूर प्रगती केली. १९५० साली किम इल सुंगने दक्षिण कोरियावर आक्रमण करून त्याला संपवण्याचा प्रयत्न केला, पण ते जमले नाही.

या कोरियन यादवी युद्धात भारताचे सैन्य पथक शांती सेना म्हणून गेले होते. अतिशय कर्तबगार मराठी सेनापती लेफ्टनंट जनरल शंकरराव पाटील-थोरात हे या शांती सैन्याचे प्रमुख होते. भारतीय सैन्याने आपली कामगिरी अर्थातच चोखपणे बजावली. उत्तर कोरियाचा पहिला हुकूमशहा किम सुंग १९९४ साली मरण पावल्यावर घराणेशाहीच्या साम्यवादी परंपरेनुसार त्याचा मुलगा किम जाँग इल हा आपोआपच राष्ट्राध्यक्ष बनला.

दक्षिण कोरिया, जपान आणि अमेरिकेसह लोकशाही जगाला सतत अणुयुद्धाच्या धमक्या देत राहणे हा त्याचा आवडता छंद होता. किम जाँग इलच्या कारकीर्दीतला एक महत्त्वपूर्ण राजकीय बदल म्हणजे, तोपर्यंत सोव्हिएत रशियाबरोबर घट्ट मैत्री ठेवून असणारा उत्तर कोरिया आता अधिकाधिक चीनकडे झुकू लागला. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे १९९१ साली सोव्हिएत रशियाचे साम्यवादी साम्राज्य लयाला जाऊन आता तो 'रशियन फेडरेशन' या नावाचा लोकशाही देश बनला होता. सोव्हिएत व्यवस्थेमुळे टिकून असलेली पूर्व जर्मनी, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, रुमेनिया, बल्गेरिया इत्यादी देशांमधली साम्यवादी सरकारे लोकक्षोभामुळे उलथून पडली होती. पण चीनमधले साम्यवादी सरकार मात्र पूर्वीच्याच निरंकुशपणे सत्ता गाजवत होते. त्यामुळे किम इल सुंगने चीनशी जवळीक करायला सुरुवात केली आणि किम जाँग इलने ती प्रक्रिया पूर्ण केली.

१७ वर्षे सत्ता गाजवून २०११ साली किम जाँग इल मेला नि किम जाँग उन हा त्याचा मुलगा सत्तारूढ झाला. गेली १३ वर्षे तो राष्ट्राध्यक्ष आहे. नवनवीन क्षेपणास्त्रांच्या चाचण्या करून लोकशाही जगाला भेडसावत राहण्याची व्यापाची परंपरा तो देखील उत्तम रीतीने चालवतो आहे. १९९९ सालापासून व्लादिमिर पुतिन हे रशियाच्या सर्वोच्च पदावर घट्ट पकड बसवून आहेत. वरकरणी त्यांची राजवट साम्यवादी नसली, तरी त्यांची एकंदर कार्यपद्धती ही हुकूमशाहीच आहे. मुख्य म्हणजे ते अमेरिका आणि युरोपच्या विरोधात आहेत. तेव्हा त्यांना पाठिंबा देण्यासाठी सैन्य पाठवून आपल्या सैनिकांना प्रत्यक्ष रणांगणाचा मौल्यवान अनुभव देणे आणि राजकारणात रशियाचा मित्र म्हणवून घेणे, असे किम जाँग उनचे विविधांकी उद्दिष्ट असावे. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

विशेष

डॉ. प्रा. गायकवाड
ज्येष्ठ अभ्यासक

# उत्तम थंडी आणि कृषी अर्थकारण

यंदा पावसाळ्यात उदंड पाऊस झाला असला, तरी अधिकच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे बरेच नुकसानही झाले. दुसरीकडे निवडणुकांमुळे घोषणांचाही मोठा पाऊस पडला. मात्र आताच्या रबी हंगामाचा विचार करता या दोन्हीतून चांगला परिणाम मिळविण्यासाठी विचार तसेच कृती करणे गरजेचे आहे. खरिपामध्ये बहुतेक पिकांचे नुकसान झाल्यामुळे आता रबी हंगामातून कसे पैसे मिळतील, अधिकची कमाई कशी करता येईल याचे मार्गही शेतकऱ्यांनी तपासून पाहायला हवेत.

यंदा थंडी चांगली पडत आहे. म्हणूनच रबी पिकांना असणारी ही अनुकूल स्थिती आश्वासक म्हणावी लागेल. यंदा आंब्याला चांगला मोहोर येण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे गहू, हरभरा, वाटाण्यासारखी थंडी आवश्यक असणारी पिकेही खूप चांगली येतील. विचार करायचा तर उत्तरेच्या तुलनेत महाराष्ट्रात मोहरीचे पीक घेतले जात नाही. मात्र यंदाची स्थिती बघता शेतकऱ्यांनी मोहरीची लागवड केल्यास त्यांना सुखद बातमी मिळण्याची शक्यता आहे. इथे लक्षात घ्यायला हवे की, आपल्याकडे आधीच तेलबियांची कमतरता आहे. ती भरून काढण्यासाठी आपण ७५ हजार कोटी रुपयांचे खाद्यतेल आयात करत आहोत. या वर्षी खाद्यतेलाचे भावही वाढताना दिसत आहेत. त्यामुळेच रबीमध्ये शेतकऱ्यांनी तेलबियांची पिके घेतली तर आर्थिक लाभ होऊ शकतोच; खेरीज देशाचे परकीय चलनही वाचू शकते.

आपल्याकडे रबीमध्ये घेतले जाणारे तेलपीक फक्त करडई आहे. त्यामुळे त्या बरोबरीने मोहरीच्या पिकाची लागवड केली तर जास्त फायदा मिळू शकेल. वाटाण्याचा विचार केला तर आपल्याकडून उत्तरेकडून मोठ्या प्रमाणात वाटाणा येतो. मात्र इथेही वाटाण्याचे पीक मोठ्या प्रमाणात घेतल्यास शेतकऱ्यांना चांगले पैसे मिळू शकतात. हे लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी 'बोन व्हिले' नामक जातीच्या लागवडीकडे लक्ष द्यायला हवे. उत्तरेकडे लावला जाणारा या जातीचा वाटाणा महाराष्ट्रातही चांगल्या प्रकारे येऊ शकतो. आर्केल नामक जातीचा वाटाणा आपल्याकडे चांगल्या प्रकारे रुळला आहे. तेव्हा त्याचे पीक घेऊन उत्तम अर्थार्जन साधणे सहजशक्य आहे. मुख्य म्हणजे वाटाणा हे अवघ्या ६० ते १०० दिवसांचे पीक आहे. याचाही शेतकऱ्यांनी लाभ घ्यायला हवा. अलिकडे हरभरा डाळीचे भाव मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहेत. हे लक्षात घेता शेतकऱ्यांनी हरभऱ्याच्या लागवडीवरही लक्ष केंद्रित करायला हवे. असाही आपल्याकडे हरभरा चांगलाच येतो. दोन प्रकारचे हरभरे असतात. एक मोठा अर्थात काबुली हरभरा तर दुसरा मध्यम आकाराचा. महाराष्ट्रातील बहुसंख्य शेतकरी काबुली हरभरा करत नाहीत. आपल्याकडे प्राधान्याने लहान हरभराच केला जातो. त्यामुळे आता हरभऱ्याची पेरणी करताना शेतकऱ्यांनी काबुली हरभऱ्याचा अवश्य विचार करावा. कारण या हरभऱ्याला अधिक भाव मिळतो. नेहमीचा हरभरा पेरून तेवढे पैसे मिळत नाहीत. हे लक्षात घेऊन या हरभऱ्याच्या जाती निवडण्याचे काम आता शेतकऱ्यांनी करायला हवे. त्यासाठी पंजाब कृषी विद्यापीठ वा उत्तरेकडील कृषी विद्यापीठांकडून माहिती घेण्यासही हरकत नाही. बियाणे उत्पादकांनीही या जाती महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. नवीन सरकारने यावर भर दिला तर आणखी चांगले होईल. थोडक्यात, हरभऱ्यापासून चांगला पैसा मिळवण्याची ही संधी शेतकऱ्यांनी दवडता कामा नये. विशेष म्हणजे यंदा थंडी चांगली असल्यामुळे चांगल्या प्रतीचा हरभरा येणार आहे. त्यावर घाटी आळी आदी संकट येण्याचा संभव नाही. यावेळी रब्बी पिकांवर कीड आणि रोगांचे प्रमाणही कमी राहणार आहे. त्यामुळेच शेतकऱ्यांनी या हंगामाचा चांगला फायदा करून घ्यावा. गव्हाकडे शेतकऱ्यांचा फारसा कल नसतो. या पिकाला जास्त अवधी लागतो. खेरीज पाणीही जास्त लागते. पण थंडी चांगली असेल तर गव्हाचे पीक भरघोस येते आणि भावही चांगला मिळतो. खेरीज चांगल्या थंडीमुळे पिकाचा दर्जाही चांगला राहतो. जास्त उत्पादन आल्यामुळे शेतकऱ्यांना चांगला फायदा मिळतो. हे सगळे लाभ लक्षात घेता यंदा शेतकऱ्यांनी गव्हाकडे दुर्लक्ष करता कामा नये.

> शेतकरी सगळी शेती कामे उत्तम प्रकारे करतो. तो उत्तम मशागत करतो. उत्तम खते घालतो; पण बाजार व्यवस्था जमत नसल्याने तो खरा मार खातो. जसे की, यावेळी कांद्याचे भाव ७० रुपयांवर गेले आहेत. ते आणखी वाढण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. हे लक्षात घेता आता शेतकऱ्यांनी कांद्याबाबत विचार करून निर्णय घ्यायला हवा. कांद्याची निर्यात खुली झाल्याची बाब त्यांनी विचारात घ्यावी.

मुबलक पाऊस पडल्यामुळे या वर्षी शेतकऱ्यांच्या विहिरी पूर्ण भरल्या आहेत. बोअरवेलला भरपूर पाणी आहे. नद्यांना पाणी आहे. या अधिकच्या पाण्याचा उपयोग करून घेत चार पैसे जास्त मिळवून देणारी पिके घेण्याचा विचारच ठेवायला हवा. अर्थात बरेच शेतकरी चांगला नफा मिळवून देणाऱ्या जातींबद्दल अज्ञानी आहेत. पिकांच्या जातींबाबत कृषी खाते वा विद्यापीठांकडून आवश्यक तेवढा प्रचार आणि प्रसार केला गेला नाही. त्यामुळेच शेतकऱ्यांनी पुढाकार घेऊन ही माहिती मिळविणे गरजेचे आहे. हे सगळे करत असताना शेतकऱ्यांनी बाजाराचा अंदाजही घ्यायला हवा. उदाहरणार्थ, बाजारात वाटाण्याच्या हिरव्या शेंगांना जास्त पैसे मिळतात. त्यामुळे त्यांची तोड करून हॉटेल व्यावसायिकांना पुरवल्या तर शेतकरी अधिक नफा मिळवू शकतील. शेतकरी सगळी शेतीकामे उत्तम प्रकारे करतो. तो उत्तम मशागत करतो, उत्तम खते घालतो. पण त्याला बाजार व्यवस्था काही जमत नाही आणि तेथेच तो खरा मार खातो. जसे की, यावेळी कांद्याचे भाव ७० रुपयांवर गेले आहेत. ते आणखी वाढण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. हे लक्षात घेता आता शेतकऱ्यांनी कांद्याबाबत विचार करून निर्णय घ्यायला हवा. कांद्याची निर्यात खुली झाल्याची बाब त्यांनी विचारात घ्यायलाच हवी. यावेळी कधी नव्हे ते सरकारने शेतकऱ्यांवर उदार होऊन कांद्याची निर्यात खुली करण्याचा निर्णय घेतला आहे. पावसाळ्यातला कांदा टिकत नसल्यामुळे साठवता येत नाही. मात्र या हंगामातील कांदा साठवता येतो, टिकवता येतो. दुसरे म्हणजे भारत, पाकिस्तान आणि बांगलादेश कांदा उत्पादनामध्ये अग्रणी असून जवळपासच्या सगळ्या आखाती प्रदेशातील कांद्याची मोठी मागणी भागवून चांगला नफा मिळवणे त्यांना सहजशक्य आहे. म्हणूनच यंदा निर्यातीच्या दृष्टीने शेतकऱ्यांनी फायदेशीर ठरणाऱ्या कांदा लागवडीचा विचार केला पाहिजे. पूर्वीप्रमाणे त्यांनी पेरणी करून कांदा करू नये; कारण यामुळे कांद्याचा आकार आणि प्रत हवी तशी राहत नाही. हे लक्षात घेत निर्यातयोग्य कांदा करण्यासाठी त्यांनी रोपे तयार करूनच कांद्याचे उत्पादन घ्यावे. यामुळे त्यांना उत्तम दर्जाचा चांगला कांदा बाजारात पाठवता येईल. रबी हंगामासाठी कांद्याच्या वेगळ्या जाती आहेत. शेतकऱ्यांनी त्याचाही विचार करायला हवा. या जातीच्या कांद्याचा रंग चांगला असतोच; खेरीज प्रतही उत्तम असते. निफाडच्या कांदा संशोधन केंद्राने अशा जाती शोधल्या आहेत. तेव्हा माहिती घेत शेतकऱ्यांनी या कांद्याची लागवड केल्यास आर्थिक गणित बसवणे शक्य होईल. आंब्यासाठीही चांगली थंडी पडणे अनुकूल ठरते. आधी उल्लेख केल्याप्रमाणे यंदा थंडी चांगली पडली आहे. हिवाळ्याच्या चार महिन्यांच्या काळात ती चांगलीच राहण्याचा अंदाज आहे. हे लक्षात घेता शेतकऱ्यांनी आंबा पिकाकडेही जातीने लक्ष देणे गरजेचे ठरेल. या काळात त्यांनी आंब्याच्या मोहोराची काळजी घ्यायला हवी, कारण त्यावर रोग पडण्याची शक्यता असते. तुडतुडे, भुरी रोगामुळे मोहोर गळून पडतो. त्यामुळे हा धोका लक्षात घेऊन तसे दिसल्यास योग्य फवारण्या करून मोहोराची काळजी घेतली तर आंब्याचे प्रचंड आणि दर्जेदार उत्पादन घेणे कठीण नाही. निसर्गाची अनुकूल साथ राहिली तर महाराष्ट्रातील शेतकरी देशाचीच नव्हे, तर जगातील आंबाशौकिनांची रसनातृप्ती करेल एवढा आंबा पुरवू शकेल. खेरीज आंब्याची निर्यात करून त्यांना चांगले अर्थार्जनही साधता येईल. त्यामुळेच आंबा निर्यातीसंदर्भात वेगवेगळ्या देशांच्या नियमांची, मानांकनांची, प्रतवारीची माहिती घेऊन त्यांच्या निकषांमध्ये बसणारे पीक घेतल्यास शेतकरी मालामाल होणे फारसे अवघड नाही.



परराष्ट्रकारण

अनय जोगळेकर

# निमित्त 'जी२०'चे, आव्हान ऊर्जासुरक्षेचे...




**पंतप्रधान नरेंद्र मोदी ब्राझीलच्या रिओ दी जनेरिओ येथे आयोजित करण्यात आलेल्या 'जी२०' परिषदेत सहभागी होण्यासाठी ब्राझीलच्या दौर्यावर गेले असता, तत्पूर्वी त्यांनी आफ्रिका खंडातील नायजेरिया आणि गयानालाही भेट दिली. त्यानिमित्ताने नरेंद्र मोदी यांच्या दौऱ्याचे महत्त्व अधोरेखित करणारा हा लेख...**

गेल्या वर्षी 'जी२०' परिषदेचे यशस्वी आयोजन केल्यानंतर भारताने या परिषदेचे नेतृत्व ब्राझीलकडे सोपवले. 'जी २०' गटाचे स्थायी मुख्यालय नसल्यामुळे वर्षभरासाठी यजमान देश या गटाचे कामकाज पाहतात. त्यात मागील वर्षाचे तसेच पुढच्या वर्षीचे यजमान देश त्यांना मदत करतात.

पुढच्या वर्षी दक्षिण आफ्रिकेत 'जी२०' परिषद पार पडणार आहे. त्यामुळे भारत, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिकेवर या परिषदेची जबाबदारी होती. गेल्या वर्षी यजमानपद भूषवताना भारताने 'जी२०' परिषदेला 'लोकांची परिषद' बनवले. यानिमित्ताने देशाच्या कानाकोपर्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्या तुलनेत ब्राझीलच्या यजमानपदाचे वर्ष कधी पूर्ण झाले, हे कळलेही नाही. यावर्षी सदस्य देशांच्या सर्वोच्च नेत्यांच्या परिषदेची चार सत्रांमध्ये विभागणी करण्यात आली होती.

पहिल्या सत्रात भूक आणि गरिबीविरुद्ध लढा देण्यासाठी 'जागतिक आघाडी'ची स्थापना करण्यात आली. दुसर्या सत्रात 'जागतिक संस्थांमधील प्रशासन यंत्रणेतील सुधारणा' हा विषय होता. तिसर्या सत्रात 'चिरस्थायी विकास आणि प्रदूषणकारी ऊर्जेकडून स्वच्छ ऊर्जेकडे' हा विषय होता. समारोपाच्या सत्रात पुढील वर्षाच्या परिषदेचे यजमानपद दक्षिण आफ्रिकेकडे देण्याची औपचारिकता पार पडली.

परिषदेच्या पार्श्वभूमीवर मोदींनी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन, ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टारमर, इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी, इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवी सुबिआंतो, इजिप्तचे अध्यक्ष अब्देल फतह अल सिसी यांच्यासह महत्त्वाच्या जागतिक नेत्यांशी भेट घेऊन द्विपक्षीय चर्चा केली. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडन यांच्याशीही नरेंद्र मोदींनी चर्चा केली.

ब्राझीलमधील परिषदेवर अमेरिकेतल्या निवडणुकांचे सावट होते. अवघ्या दोन आठवड्यांपूर्वी अमेरिकेत पार पडलेल्या निवडणुकांमध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी ऐतिहासिक विजय मिळवला. केवळ अध्यक्षपदच नाही, तर सिनेट आणि प्रतिनिधीगृहात रिपब्लिकन पक्षाला बहुमत मिळाले. अमेरिकेतील सत्तांतराचे ब्राझीलवर खूप मोठे परिणाम होणार आहेत. ब्राझीलचे माजी अध्यक्ष आणि सध्याचे अध्यक्ष लुला यांचे प्रतिस्पर्धी जाइर बोल्सोनारो हे डोनाल्ड ट्रम्प यांच्या अतिशय जवळचे आहेत.

सुप्रसिद्ध उद्योजक आणि अमेरिकेच्या सरकारच्या खर्चाला कात्री लावण्यासाठी डोनाल्ड ट्रम्प यांनी नेमणूक केलेले एलॉन मस्क आणि ब्राझील सरकार यांच्यामध्ये 'ट्विटर'वरुन खडाजंगी झाली होती. लुला यांच्या विजयानंतर ब्राझीलच्या सर्वोच्च न्यायालयाने 'ट्विटर'वर दोन आठवड्यांची बंदी घातली. तसेच, कंपनीला ५० लाख डॉलर्सचा दंड ठोठावला. 'जी२०' परिषदेच्या दरम्यानही लुला यांच्या पत्नीने एलॉन मस्क यांच्याबद्दल अपशब्द वापरले.

'जी२०' परिषदेला उपस्थित चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग, जर्मनीचे ओलाफ शोल्झ, फ्रान्सचे इमॅन्युएल मॅक्रॉन, कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो या सगळ्यांसाठी ट्रम्प यांचा विजय आणि अमेरिकेशी असलेल्या संबंधांवर होणारा परिणाम हा काळजीचा विषय आहे. त्यामुळे या परिषदेच्या निमित्ताने एकमेकांशी आणि अमेरिकेशी संवाद साधण्याची चांगली संधी मिळाली. अमेरिकेचे अध्यक्ष जो बायडन यांचा कार्यकाळ पुढील वर्षी २० जानेवारीला समाप्त होणार आहे, तोपर्यंत ते मोठे धोरणात्मक निर्णय घेऊ शकत नसले, तरी आपल्या कारकिर्दीत घेतलेल्या निर्णयांना पुढे रेटण्याचा प्रयत्न करत आहेत. ब्राझीलला जाण्यापूर्वी नरेंद्र मोदींनी अध्यक्ष बोला अहमद टिनुबु यांच्या निमंत्रणावरुन नायजेरियाला भेट दिली. यापूर्वी २००७ साली पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी नायजेरियाला भेट दिली होती. नायजेरिया लोकसंख्येच्या बाबतीत आफ्रिकेतील सर्वात मोठा देश आहे. नायजेरियाची लोकसंख्या सुमारे २० कोटी असून, २०५० सालापर्यंत ती ७० कोटी होईल असा अंदाज आहे. नायजेरियाच्या लोकसंख्येपैकी सुमारे ५३ टक्के मुस्लीम असून, ४५ टक्के ख्रिस्ती धर्माचे पालन करतात. भारताप्रमाणे नायजेरियातही सुमारे एक शतकभर ब्रिटिशांची वसाहत होती. दक्षिण आफ्रिकेच्या खालोखाल नायजेरिया आफ्रिकेतील दुसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे. नायजेरिया जगातील सर्वात मोठ्या तेल उत्पादक देशांपैकी एक असून, भारत आणि नायजेरिया यांच्यामधील व्यापारात भारताकडून केल्या जाणार्या तेलाच्या आयातीचा मोठा वाटा आहे.

सुमारे २०० भारतीय कंपन्यांनी नायजेरियामध्ये २७ अब्ज डॉलर्स गुंतवणूक केली आहे. या भेटीत नायजेरियाने नरेंद्र मोदींना 'ग्रॅण्ड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द नायजर' हा दुसरा सर्वोच्च सन्मान दिला. यापूर्वी हा सन्मान ब्रिटनच्या राणी एलिझाबेथ यांना देण्यात आला होता. व्यापार, शिक्षण तसेच कौशल्य प्रशिक्षण आणि माहिती-तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये उभय देशांतील सहकार्याला मोठा वाव आहे.

ब्राझीलहून परतताना नरेंद्र मोदींनी गयानाला भेट दिली. दक्षिण आफ्रिकेच्या उत्तर किनार्यावर वसलेल्या देशाला भेट देणारे ते भारताचे पहिले पंतप्रधान ठरले. ब्रिटनकडून १९६६ साली गयानाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच भारताने तेथे आयुक्तालय स्थापन केले होते. गयानाने सर क्लाइव लॉइड, रोहन कन्हाय, कार्ल हुपर ते शिवनारायण चंदरपॉल असे अनेक प्रसिद्ध क्रिकेटपटू दिले आहेत.

गयानाची लोकसंख्या अवघी आठ लाख असून, त्यातील ४० टक्के भारतीय वंशाचे आहेत. गयानाचे अध्यक्ष महंमद इर्फान अलीसुद्धा भारतीय वंशाचे असून २०२३ साली १७व्या प्रवासी भारतीय दिवसाचे ते प्रमुख पाहुणे होते. भारत आणि गयानातील सांस्कृतिक संबंधांचा प्रदीर्घ इतिहास असला, तरी गेल्या काही वर्षांमध्ये त्याला आर्थिक परिमाणही प्राप्त झाले आहे.

व्हेनेझुएलामध्ये साम्यवादी हुकूमशाही असून त्यांच्याकडील सैन्याची संख्या एक लाखांहून अधिक आहे. गयानाच्या लष्करात अवघे पाच हजार सैनिक असून त्यांना स्वतःच्या आर्थिक हितसंबंधांचे रक्षण करणे अवघड आहे.

व्हेनेझुएलाने अनेक दशकांपासून अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांच्या विरोधात बंड पुकारले असून, त्याला रशिया, इराण आणि चीनसारख्या देशांचा पाठिंबा आहे. भारताचेही व्हेनेझुएलाशी चांगले संबंध असले, तरी गयानाच्या भारताकडून मोठ्या अपेक्षा आहेत.

आजवर भारताने गयानाला विविध क्षेत्रांमध्ये भरीव मदत केली आहे. तेथील ३० हजार घरांमध्ये भारताकडून सौरऊर्जा पुरवण्यात आली आहे. भारताने गयानाला 'हॅल २२८' विमान पुरवले असून, भारतीय कंपन्यांनी समुद्रात जाण्यासाठी धक्का बांधून दिला आहे. गयानातील ८०० विद्यार्थ्यांना भारताने उच्च आणि तंत्रशिक्षण दिले असून, 'वॅक्सिन मैत्री' कार्यक्रमाच्या अंतर्गत ८० हजार लसीही पुरवल्या होत्या. आरोग्य, शिक्षण आणि संरक्षण क्षेत्रातही भारत आणि गयानामधील सहकार्याला मोठा वाव आहे. आगामी काळात भारताची खनिज तेलाची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढणार असून, त्यासाठी नायजेरिया आणि गयानासारख्या देशांशी चांगले संबंध असणे महत्त्वाचे असणार आहे. मोदींच्या दौऱ्याच्या निमित्ताने गयानामध्ये दुसऱ्या 'भारत कॅरिकॉम' परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. 'कॅरिकोम' या कॅरेबियन देशांच्या गटात २० देश असून पहिल्यांदाच ही परिषद कॅरेबियन देशात पार पडत. भारताला जागतिक महासत्ता होण्यासाठी अटलांटिक आणि प्रशांत महासागराच्या किनाऱ्यावर मोक्याच्या ठिकाणी असलेल्या तसेच द्वीपराष्ट्रांशी विशेष संबंध महत्त्वाचा आहेत.